श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.



मार्च १९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

—: कार्यकारी संपादक :—

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---

**वर्ष ६५ वे]** **किंमत १ रुपया** **[अंक १२ वा**

**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**

---

— कार्यालय —

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

३

करितें प्रणाम माई सरस्वती।
सर्वां बुद्धिदात्री जननी तूं।।
उगम वाणीचा चहूं तुझे ठायीं।
ऋषी मुनी पायीं झाली रत।।
ब्रम्हतनये तूं सर्वांग सुंदरी।
ठेवीं मजवरी कृपादृष्टि।।
जेथें पडे भीड भक्तांची तुजला।
पावसि हांकेला दासी म्हणे।।

४

नमन माझे सद्गुरु सांइराया।
नसे शक्ती मम अंगिं गूण गाया।।
भक्तिविरहित मी असें ज्ञानहीन।
शरण चरणीं हा येत दास दीन।।

५

अहो अधिकारी तुम्ही साधुसंत।
माझा प्रणिपात घ्या हो आजी।।
जगाच्या कल्याणा किती हो झटलां।
लावुनियां दिला मार्ग बरा।।
नसे कांही व्याप नाहीं घरदार।
नाहीं हो जोजार केला तुम्हीं।।
दास हात जोडी तुमच्या चरणीं।
माझी विनवणी ऐका जी हो।।

६

जयांचे उदरी घेतला मी जन्म।
करितों नमन तयां आधी।।
किती ममतेनें पाळीलें पोषिलें।
प्रेमें खेळविलें कटी खांदी।।
घरची गरीबी वेतन लहान।
कैसें सांवरून घेतलेंत।।
कैसें ऋण फेडूं होऊं उतराई।
धन्य बाप आई दास म्हणे।।

७

सद्गुरुकृपेनें बोललो जे बोल।
चाखुनी पहाल गोडी कळे।।
अनेक उपाधी येती प्रपंचांत।
होतें भयभीत मन तेव्हां।।
अनुपम वल्ली प्रेम अनुपान।
भावें करा पान अमृत हें।।
दास म्हणे कोणी करायाचा सौदा।
माझे बाबा दादा भाविक हो।।


या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साईलीला — मार्च १९८७

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | अवती भोवती साई साई | — कु. शिला तुळसकर | ७ |
| ३ | ब्रह्मज्ञान कथन - १ | — श्री.मु.ब. निंबाळकर | ८ |
| ४ | गुरुकृपा | — श्री. जीवन मोरे | १२ |
| ५ | श्री साईनाथांचा शरणार्थी (२०) | — श्री. वि.बा. खेर | १३ |
| ६ | भाव सुमने | — श्री. प्रशांत देवकर | १७ |
| ७ | श्री बाबांचा गुरुमार्ग | — श्री. चकोर आजगांवकर | १८ |
| ८ | श्री साईसत्चरित-परमार्थ प्राप्तीचे साधन | — कु. नीता लिंगरकर | २१ |
| ९ | श्री साईबाबांचा एक पैसा | — शालीनी देसाई | २२ |
| १० | तुझे गीत गाण्यासाठी साई तुझ्यादारी आलो | — श्री. रमाकांत पंडित | २६ |
| ११ | नको नको चित्ता गुंतू मायाजाळी | — श्री. वि.म. हटवार | २७ |
| १२ | सत्यशिल साई माझे | — श्री. गुरुनाथ मालडीकर | २८ |
| १३ | सर्वसाक्षी श्री साईबाबा | — सौ. उषा अधिकारी | २९ |
| १४ | साईमाझा | — श्रीमती पुष्पलता दाभोळकर | ३१ |
| १५ | साईदरबारातील नवरत्ने -६ | — | ३२ |
| १६ | गोड नाम ते श्री सिद्धसाई | — कु. शकुंतला नायकर | ३७ |
| १७ | जे घडते ते बऱ्या करिता | — श्री. अनिल रसाळ | ३८ |
| १८ | साई किर्ती | — सौ. सुशिला साळुंखे | ३९ |
| १९ | भक्ति | — सौ. उषा जोशी | ४० |
| २० | कृपेची सावली | — कु. सुरेखा होबळे | ४१ |
| २१ | ग्रंथ परिचय | — श्री. सुनील राणे | ४१ |
| २२ | श्री खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | — साईनंद | ४३ |
| २३ | भीषण दुर्घटनेतून बाबांनीच वाचविले | — श्री. विनायक लेले | ४४ |
| २४ | थोर महात्म्ये | — श्री. बबन डी. येरम | ४५ |
| २५ | विशुद्धावस्था | — श्री. शाम जुवळे | ४६ |
| २६ | ज्ञानेश्वरांचे अभंग आणि ध्वन्यार्थ | — श्री. पांडुरंग भाटकर | ४७ |
| २७ | ऑल इंडिया साई समाजाचे यशस्वी अधिवेशन | — साईनंद | ५० |
| २८ | बाबांनी मला जिवदान दिले | — श्री. सुरेंद्र कोळेकर | ५१ |
| २९ | विष हे अमृत झाले | — सौ. माधवी देशपांडे | ५२ |
| ३० | बाबांनी हाक ऐकली | — सौ. लिना भांगले | ५३ |
| ३१ | बाबा, पुन्हा कधी हो येणार? | — कु. तेजस्विनी तारळेकर | ५४ |
| ३२ | कल्पतरु | — सौ. जयवंती कदम | ५५ |
| ३३ | श्रद्धा आणि सबूरी | — श्री. रमेश कुलकर्णी | ५६ |
| ३४ | मला सोडविणारी ती व्यक्ती कोण होती? | — श्री. बी.व्ही. सावन्त | ५७ |
| ३५ | संस्थानचा 'अंधत्व निर्मूलन' कार्यक्रम | | ५८ |
| ३६ | शिरडी वृत्त | | ५९ |
| ३७ | रेल्वे बुकिंग आऊट एजन्सी | | ६३ |
| ३८ | घोषणा | | ६४ |

# शिरडीचा खराखुरा प्रसाद बाबांची उदी



## संपादकीय

साईभक्तांनो, सध्या आपण अणुयुगात वावरत आहोत. नवनवे शोध लागत आहेत त्यापासून मानवाचे कल्याण एका दृष्टीने होत आहे तर दुसरीकडे या शोधातूनच मानवाचे अकल्याण होत आहे. शहरा-शहरातून अपघात व प्रदूषणेही त्यात भर घालीत आहेत आणि या सर्वांमुळे मानवी आयुष्य वाढण्याऐवजी ते कमी होण्याच्या मार्गावर आहे असे म्हणावे लागते. नवनवीन रोग उत्पन्न होऊ लागलेले आहेत व त्यावर उपचार करण्यासाठी रुग्णालये व इस्पितळातून वाढत्या स्वरूपात गर्दी दिसत आहे. सरकारी-निमसरकारी इस्पितळातून रुग्णांच्याकरिता खाटा अपुऱ्या पडू लागलेल्या आहेत व त्यामुळे रुग्णांची सोय दोन खाटांच्या मधे जमिनीवरच बिछाना घालून करण्यात आलेली दृष्टीस पडते. श्री साईनाथ शिरडीत असताना एवढी ही अशी परिस्थिती नव्हती. त्यावेळी श्री साईबाबांकडे नाना प्रकारचे लोक येत असत. त्यात अनेक प्रकारचे रोगी, लंगडे, पांगळे, आंधळे वगैरे लोकांचाही भरणा असे. ज्यांचे रोग नाना उपाय करून असाध्य ठरले, अशा दुर्दैवी लोकांचा त्यात समावेश झालेला असे. बाबांनी तो अमूक रोगी किंवा महारोगी म्हणून त्याला कधीही दूर केले नाही. उलट पक्षी त्याच्याबद्दल त्यांना जास्तीत जास्त प्रेम वाटत असे. आपल्या ठायी असलेल्या दैवी सामर्थ्याच्या किंवा औषध पाण्याच्या बळावर त्यांना ते रोगमुक्त करीत असत. ''ज्यासि आपंगिता नाही त्यासी धरी जो हृदयी'' या मार्गाने सतत जाणारे ते होते.

श्री बाबांच्या हातून त्या काळात रोग निवारणाचे कार्य किती तरी व्यापक प्रमाणात घडून आले आहे. तेच कार्य त्यांच्यामागे आजही घडावे असे आम्हास वाटते.

बाबांच्या काळात जे रोग निवारणाचे कार्य त्याच्या हातून पार पडले, त्यापैकी काही दाखले येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटतात.

श्री महाराज कित्येक वेळा औषध देऊन रोग निवारण करीत असत. परंतु ती औषधे मात्र थोडी विचित्र वाटत असत. बाबा औषधे देतात तेव्हा ते हकीम आहेत असाही काही लोकांचा समज झालेला होता. मुद्दाम औषधांच्या निमित्ताने पण लोक त्यावेळी त्यांचेकडे येत असत. परंतु म्हणतात ना श्रद्धा तसे फळ मिळाल्याशिवाय रहात नाही.

श्री बाबांची औषधे देण्याची पद्धत मोठी विचित्र होती. सध्याच्या जगाला ती चमत्कारिक वाटेल पण बाबांच्या त्या पद्धतीने गुण मात्र शंभर टक्के येत असे. त्यांनी दिलेली विचित्र व भयंकर वाटणारी औषधे घेऊन रोगी खडखडीत बरे झाल्याचे दाखले आहेत.

एकदा बाबांच्याकडे एक रोगी आला. तो त्यांचा भक्त होता. त्याचे डोळे लाल लाल झालेले व सुजलेले होते. त्याकाळी गावात जवळपास डॉक्टर नव्हता मग करायचे काय? तो भक्त बाबांच्या जवळ आला, मोठ्या भक्तीभावाने आला व त्याने आपले दुःख त्यांना सांगून तो रडू लागला. एखाद्या डॉक्टरकडे गेला असता तर डॉक्टरने त्याचे प्रथम डोळे धुतले असते व त्याच्या डोळ्यात जरूर ते औषध घातले असते. पण मग बाबांनी काय केले? त्यांनी आपल्या पद्धतीनुसार थोडे बिबे मागवून घेतले व ते चांगले ठेच ठेच ठेचविले आणि त्या लगद्याचे दोन गोळे बनवून त्यांनी त्या गृहस्थाच्या डोळ्यात चांगले कोंबले व नंतर फडक्याने डोळे घट्ट बांधून टाकले! दुसरा दिवस उजाडताच त्यांनीच डोळ्यावरील पट्टी सोडून टाकून डोळ्यावर पाण्याची संथ धार सुरू ठेवली व डोळे साफ पुसून काढले. परिणाम काय झाला? डोळ्यांवरची सूज उतरली होती व ते पांढरे स्वच्छ झालेले होते.

डोळ्यांसारखा शरीराचा अत्यंत नाजूक अवयव. त्यात बिब्ब्यांचा लगदा कोंबण्याची कल्पना आपणास मोठी विचित्र वाटते नाही का? परंतु संतांचे दैवी मार्ग हे असतात. त्यांच्या लीला ह्या अशा प्रकारच्या असतात.

एकदा नागपूर येथे रहाणारा, रक्तपितीने पिडलेला एक ब्राह्मण शिरडी येथे बाबांच्या दर्शनार्थ आला. त्याने आपले बिऱ्हाड चावडीत ठेवले होते. बाबांनी त्याला तेथे खुशाल राहू दिले. रोज माधुकरी मागून तो आपला उदरनिर्वाह करीत असे. बाबा तोंड धुण्यासाठी निघाले म्हणजे त्याच्या मागोमाग जाऊन त्यांच्या जवळपास बसत असे. बाबांनी तोंड धुतलेले जे पाणी वाहत जाई ते घेऊन तो आपल्या सर्वांगाला चोळून चोळून लावत असे. त्याचा हा उपक्रम कित्येक महिने चालू होता. हळूहळू त्याची पहिली त्वचा जाऊन त्याठिकाणी दुसरी त्वचा आली. त्याची रक्तपिती साफ गेली व तो निकोप होऊन आपल्या घरी गेला.

कल्याण येथील नारायणदास नावाचे एक गृहस्थ पक्षघाताने आजारी होते. ते आपल्या जिवास अतिशय कंटाळून गेले होते. शेवटी त्यांना शिरडीस बाबांच्या दर्शनास जाण्याची बुद्धी झाली. त्यांचे भोग संपत आले होते. शिरडीस बाबांचे दर्शन घेऊन त्यांनी साठे वाड्यात मुक्काम ठोकला. पुढे त्यांचा आजार वाढत जाऊन त्यांना हालचालही करता येईना. त्यांचे सर्व काही अंथरूणातच होऊ लागले. मग काय त्या हाल अपेष्टांस पारावार!! कर्मगती मोठी विचित्र असते. कुठचा रहाणारा आणि कुठे येऊन पडला, त्याच्या जवळपास कुणी जाईचना. लोक त्याचेपासून दुरदूर पळू लागले. एकदा तर हे गृहस्थ आपल्या घाणीतच गडबडा लोळत होते. अरेरे! नको ते हाल असे वाट्यास येणे. काय करणार बिचारा! बाबांच्या कानापर्यंत ही खबर गेली. ती ऐकल्याबरोबर बाबा त्यांच्याकडे लगबगीने आले व त्यांनी आपल्या हातांनी त्यांना घाणीतून उचलले व त्याची जरूर ती सुश्रुषा करण्यास त्यांनी सुरुवात करताच अनेकांचे हात त्या दुर्दैवी प्राण्यास लागले. प्रत्येक जण त्याची सेवा करण्यासाठी पुढे सरसावू लागला. बाबांची कृपा दृष्टी वळल्यावर काय कमी पडणार आहे! तो त्यानंतर चार-सहा महिन्यांनी चांगला ठणठणीत बरा होऊन आपल्या घरी पण गेला.

जुन्नर तालुक्यात नारायण गावी भिमाजी पाटील या नावाची व्यक्ती राहात असे. हा गृहस्थ छातीच्या विकारापासून फार आजारी होता. हा त्याचा विकार वाढत जाऊन क्षयापर्यंत गेला. त्याने सर्व तऱ्हेची पथ्ये व औषधे घेतली पण काही उपयोग झाला नाही. मनुष्य स्वभाव असा आहे की मोठया संकटात सापडल्यावर त्याला परमेश्वर आठवावयास लागतो. त्याप्रमाणे त्याने नारायणाचे नाव घेण्यास सुरुवात केली. त्यास शिरडीस साईबाबांचेकडे जाण्यास एका गृहस्थाकडून माहिती मिळाली. त्याप्रमाणे तो शिर्डीला आला व द्वारकामाईत जाऊन बाबांच्या पायावर लोटांगण घेऊन रडू लागला. बाबांचे दयाळू अंतःकरण द्रवले व त्यांनी त्यास राहण्यास सांगून सर्व चिंता विसरून जाण्यास सांगितले. हा रोगी पाच पाच मिनिटांनी रक्त ओकत असे. पण द्वारकामाईत आल्यापासूनच त्याचे ओकणे थांबले. पुढे बाबांनी त्यास भिमाबाई नावाच्या बाईच्या घरात रहाण्यास सांगितले. हे घर अतिशय घाणेरडे होते. पण बाबांची आज्ञा! ती मोडणे ठीक नाही. असा विचार करून तो तेथेच राहिला. तेथे रहात असताना त्याला दोन स्वप्ने पडली. एका स्वप्नात त्यांनी स्वतःस लहान मुलाप्रमाणे पाहिले व छडीचा मार खाताना दिसले. मास्तरांनी दिलेली कविता पाठ केलेली नव्हती म्हणून ही शिक्षा होती. दुसऱ्या स्वप्नात कुणीतरी आपल्या छातीवर मोठा धोंडा खालीवर फिरवीत आहे व त्यामुळे आपल्याला फार वेदना होत आहेत. ह्या स्वप्नानंतर तो पूर्ण बरा झाला व आपल्या घरी परत गेला. नंतर तो पुष्कळ वेळा शिरडीस आला. तो बाबांची श्री. सत्यनारायणाची पूजा करू लागला.

महिन्यातून एकदा जुलाबाचा काढा बाबा करीत असत. त्यात सोनामुखी व इतर बरेच पदार्थ ते घालीत. तो सकाळपासून संध्याकाळ पर्यंत एका मोठ्या भांड्यात उकळत पडलेला असे. संध्याकाळी ते टमरेल टमरेल त्यातील एकेकांना पिण्यास देत व त्यावर अर्धा शेर फुटाणे खावयास देत. अशा प्रकारची औषधे बाबा देत व त्याचा परिणाम फलदायी होत असे. त्यांनी कुणाचाही अनादर केला नाही व कोणत्याही रोगाचा रोगी असल्यास त्यास ते बिनधास्त औषधपाणी देत व रोगी खडखडीत बरा होत असे. प्लेग व महामारी (कॉलरा) रोगांच्या साथीपासून देखील त्यांनी गावाचे रक्षण केलेले आहे ही गोष्ट तर साईभक्तांना माहितच आहे. पण या परिपाठाचे खंडन झाले. कारण एका रोग्यास ते औषध देत होते व त्यास पथ्य पाळण्यास सांगितले होते. ते पथ्य त्या रोग्याने पाळले नाही व त्यात त्याचा मृत्यू झाला. त्या वेळेपासून त्यांनी औषध देण्याचे बंद केले; व आपण प्रज्वलीत केलेल्या धुनीतील उदी देण्यास सुरुवात केली. प्रत्येक भक्तास ते उदी देऊ लागले. त्यांच्या त्या उदीत इतके सामर्थ्य होते की तिच्यापासून सर्व रोग व मनःकामना पूर्ण होऊ लागल्या. अजुनदेखील बाबांनी पेटविलेली धुनी द्वारकामाईत पेटत ठेवलेली आहे. भक्त मंडळी तिच्यातील उदी घेऊन जातात व तिचा प्रभावही अनुभवास येतो. ज्यांना केवळ कुचेष्टाच करावयाची आहे ती मंडळी म्हणतात की, लाकडांचा हा अपव्यय आहे. पण म्हणणारे काहीही म्हणोत भक्तमंडळींना बाबांच्या धुनीतील बाहेर येणाऱ्या उदीचा चांगलाच उपयोग होऊन फायदा मिळत आहे. शिरडीस

गेल्यानंतर श्री. बाबांचा खरा खुरा प्रसाद जर कोणता असेल तर तो हाच होय. तो सर्रास सर्वांना मिळावा यासाठी संस्थानची अधिकारी मंडळी पण झटत असतात. बाबांच्या या उदीचा सदुपयोग मात्र सर्वांनी करावा हीच तळमळीची इच्छा.

# अवती भोवती साई साई

जळी तळी पाषाण काष्टी,<br>
सर्व व्यापी असे साई दृष्टी ॥ १ ॥<br>
ओंमकारातून साई प्रगटले,<br>
दीन दुबळ्यांचे दैवत जाहले ॥ २ ॥<br>
साईच माझे माता पिता,<br>
साईच कर्ता आणि करविता ॥ ३ ॥<br>
संकटसमयी हाक मारीता,<br>
आपुल्याच सामर्थ्याने करी सांगता ॥ ४ ॥<br>
जन्मजन्मान्तरी माझे एकच दैवत,<br>
'साई-साई' असे राहो मुखात ॥ ५ ॥<br>
ज्याने केली असे निंदास्तुती,<br>
त्याला दाखविली चमत्काराकृती ॥ ६ ॥<br>
तो ही जाहला लिन साई चरणी,<br>
साईचा लागे सदा ध्यास मनी ॥ ७ ॥<br>
साई माझा दयासिंधु,<br>
दिन अनाथांचा बंधु ॥ ८ ॥<br>
धन्य जाहले मी जीवनी,<br>
परी एकच ध्यास असे मनी ॥ ९ ॥<br>
पावन पवित्र शिर्डी क्षेत्री,<br>
दिसेल का हो मजला साई नेत्री ॥ १० ॥<br>
एकच स्वप्न राही अन्तरी,<br>
वाट पाहीन मी जन्मजन्मांतरी ॥ ११ ॥

**— कु. शिला मदन तुळसकर**
बी १८/१, पि ॲन्ड टी क्वार्टर,
सहार, अंधेरी (पूर्व),
मुंबई नं. - ४०० ०९९.

# श्री साईंचे सत्य चरित्र — अध्याय १६ वा
# ब्रम्हज्ञान कथन — १

**गद्य अनुवाद — श्री. मु.ब. निंबाळकर**
ले. कर्नल (निवृत्त)
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट, बंड गार्डन,
पुणे-४११ ००१.

(जानेवारी १९८७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'ब्रम्हज्ञान कथन - १' या लेखातील उर्वरित भाग)

आत्मा हा नित्य (सदा असणारा), प्राचीन (फार जुना) व अमर आहे. जन्म-मृत्यू हे विकार त्याला बाधत नाही. ॐ कार हे अक्षर त्याचे चिन्ह आहे. त्याला आदि व अंतही नसून तो सततच असतो. ज्याची शरीर हाच आत्मा अशी दृष्टी आहे, जो स्वतःला वेगळा व सृष्टीला वेगळा समजतो, त्याला कष्ट करूनही आत्म्याचे अनुभवजन्य ज्ञान प्राप्त होत नाही. वाणी आदि सर्व इंद्रियांचा लय करा व मन दृढ (खंबीर) करा. नंतर त्या मनाचाही लय (क्षय) करून बुद्धिला पकडा. प्रकाशस्वरूप जी ज्ञान देणारी बुद्धि तेथे मन एकाग्र करा. मनासकट सर्व इंद्रियसमूह एका बुद्धिच्या स्वाधीन असतात. मातीच्या घड्यास जशी आदिकारण माती तशीच इंद्रियांना बुद्धि. ती तशीच त्यांना सदा व्यापून असते. अशा बुद्धिला महत्तत्वांत (समष्टि बुद्धिमध्ये) मिसळावे व महत्तत्व आत्म्यांत समर्पावे. अशी गोळाबेरीज केली म्हणजे आत्म्याचे स्वरूप निश्चितपणे कळते. मग रूपे, मृगजळ व सापाचा आकार हे केवळ दृष्टीचे दोष बनतात. ज्याला संपूर्णता नाही व विशेषताही नाही आणि ज्याला जन्ममृत्यू बाधत नाहीत त्या आत्म्याच्या दर्शनाशिवाय आपले हित साधले जात नाही, असे साधुजन सतत बोलत असतात. सर्व कार्यांना कारण आहे परंतु हा आत्मा स्वतःच उत्पन्न झालेला असून त्याला कारण नाही. हा पूर्वीही नवा व त्रिकालबाधित असून प्राचीन (फार जुना) आहे आणि स्वभावतःच बुद्धिला अगोचर आहे. (बुद्धिच्या आवाक्याच्या बाहेर आहे.) हा आकाशाप्रमाणे अभंग व जन्ममृत्युच्या पलिकडला आहे. याचे 'ॐ प्रणव' हा आश्रय आहे व तो स्वतः वजनमापाशिवाय व आधाराशिवाय आहे. (ओ. ९३-१०२)

परब्रह्म (निर्गुण निराकार) हे जाणले पाहिजे व अपरब्रह्म (सगुण साकार) हे प्राप्त केले पाहिजे आणि त्याचे प्रतीक 'ॐ' याचे सदा ध्यान केले पाहिजे व उपासना केली पाहिजे. सर्व वेदांचे सार तेच प्रणवस्वरुप 'ॐ'कार व त्याचा जो अर्थपूर्ण निश्चय तोच (वेदांच्या) महावाक्यांचा विचार. वेद जे स्वतः प्रतिपादन करतात जे (साधन करणारे) लोक अत्यंत प्रयत्नाने व ब्रह्मचर्य पाळून मिळवितात, त्यालाच ॐ पद असे म्हणतात. असो. त्या पदाची वाटचाल जरी बिकट असली तरी ती दृढ अभ्यास करणाऱ्याला परम गुरुकृपा झाल्यावर अत्यंत सुगम होते. अत्यंत स्थूल अशा इंद्रियांपासून अनुक्रम धरून सूक्ष्म विवेकापर्यंत (नित्यानित्य विचारापर्यंत) पोहोचल्यावर प्रयत्नशील साधकाला त्याची प्राप्ती होते. हे सर्व तपांचे सार व ॐ शब्दाने व्यक्त असे अक्षर ज्याचा नुसता

उच्चार केला तरी (त्याच्या) अर्थाचे तत्व मनात स्फुरते व ज्याचे आवर्तन (वारंवार पठण) केले तर साक्षात्कार होतो. (ओ. १०३-१०८)

सर्वव्यापी, चैतन्ययुक्त व वृद्धि आणि क्षय हे विकार नसलेला आत्मा जो जाणील तो सद्‌गुरुचा भक्त धन्य होय. अध्यात्म (मनापासून), अधिभूत (पंचमहाभूतांपासून) व अधिदैव (देवांपासून) या त्रिविध तापानीं (दुःखाने) सदैव तापलेले लोक हे भाग्य कसे भोगू शकतील? हे वैभव तर फक्त संतांचेच. अविद्येपासून या संसाराची उत्पत्ति होते व त्यापासून सुटका व्हावयाचे साधन म्हणजे ब्रम्ह व आत्मा हे एक आहेत ही वृत्ति ज्याची प्राप्ती याठिकाणी होते. जेव्हा विषय व संकल्प यांनी शून्य अशी स्थिती होईल, जेव्हा "अहं ब्रह्मास्मि" (मी ब्रह्म आहे) या महावाक्याच्या आवृत्तीने बुद्धिची तशी प्रवृत्ति होईल, जेव्हा गुरुवचन व शास्त्र यांच्या प्रचीतिने अंतर्बाह्य कर्म करण्याची मनासह प्रवृत्ति शांत होते, तेव्हा आत्मज्ञानाचा लाभ होतो. तेव्हाच यथोचित दर्शनाची प्राप्ती होते, विषय व द्रव्य इत्यादि जड वस्तूंपासून निवृत्ति मिळते, अविद्या वगैरेच्या हृदयग्रंथी तुटतात आणि अव्यक्ती प्रवेश मिळतो. कवडाशातील (भोकातून येणाऱ्या उजेडाच्या किरणातील) अतिसूक्ष्म कण, त्याहूनही सूक्ष्म असलेला अणू आणि त्या अणूपेक्षाही अतिशय सूक्ष्म आत्मा अशी त्याची निश्चित कल्पना केली जाते. मोठ्यात मोठे म्हणजे ब्रह्मांड पण आत्मा त्याहूनही मोठा असाही समज आहे. परंतु ह्या सर्व सापेक्ष (तुलनेसाठी) कल्पना. (खरे पाहता) आत्मा प्रमाणाच्या पलिकडे आहे व सूक्ष्मत्वाने सूक्ष्मापेक्षा सूक्ष्म आणि मोठेपणाने मोठ्यापेक्षा मोठा असा आहे. (त्याच्या बाबतीत) नाम व रूप या उपाधीच समजाव्यात. तो सदा परिपूर्ण व उपाधीशिवायचा आहे. त्याला ना जन्म, ना मरण व मूळ आणि कारणही नाही. तो आजन्म, नित्य, कधीही नाश न पावणारा व पुरातन आहे आणि सहज प्राप्त होण्यासारखा नाही. 'ॐ'कार प्रतीक असलेले जे ब्रह्म तेच त्याचे मूळ स्वरूप आहे. श्रुति (वेद) व स्मृति (इतर पुराणे व शास्त्रे) यानाही दुर्गम असलेला तो काय सरसकट सर्वांना सुगम होईल? त्याचे वर्णन करता वेद थकले, तपस्वी वनवासी झाले, उपनिषदांनी हात टेकले व कुणालाच नीट निदान झाले नाही. आत्मस्वरूपाच्या ठिकाणी पोहोचायला अभेदाचे (आत्मा व परमात्मा एकच आहे याचे) दर्शन घडविणारा आचार्यच (गुरुच) हवा. तेथे इतरांचा काय पाडाव? नुसते तर्क करणाऱ्यांना तर तेथे थाराच नाही. ते भ्रमरूपी भोवऱ्यात गरगर फिरतील. शास्त्र व आचार्य यांच्याविना इतरांची तत्त्वबुद्धि तेथे स्थिरावत नाही. स्वतःच्या बुद्धिचे कल्पनारूपी तारे चौऱ्यांशी लक्ष (पुनर्जन्माचे) फेरे चुकवू शकत नाहीत. पण शास्त्र व आचार्यरूपी चंद्र मात्र एकच पुरतो आणि मग अंधार किंचित्‌ही उरत नाही. जे इतरांना कष्टाने साधत नाही ते सद्‌गुरुची कास दृढ धरून ठेवणाऱ्याला अगदी थोड्या प्रयत्नाने साधते. सविद्या त्याला प्रकाशित करते व अविद्या कार्यासहित बाजूस सरते. सच्चिदानंद स्वरूप स्थिर होते व स्वस्वरूप स्थिति अवतरते. त्यालाच मोक्ष असे दुसरे नाव आहे. हेच जीवाचे अपेक्षित ध्येय आहे, ज्याकरिता ज्यांची ब्रह्मयोगाकडे प्रीति आहे व जे अंतर्मुख आहेत ते फार कष्ट करतात. स्वस्वरूपी चंचल झाले की

विषयांची खळबळ उडते. स्वस्वरूपी निश्चल राहिले की विषय शांत होतात. जो स्वस्वरूपापासून तोंड फिरवितो, त्याच्या समोर विषय सदा उभे राहतात. पण जो स्वस्वरूपाकडे पाहतो, त्याच्यापासून विषय तोंड फिरवितात. मोक्षाचीच मात्र जो इच्छा करतो, दुसरी कसलीही इच्छा मनात ठेवत नाही, व इह (या पृथ्वीलोकाचा) किंवा परलोकाचा किंचित्‌ही लोभ धरत नाही, तोच मोक्षाचा अधिकारी आहे. यातील एका लक्षणाने जरी कोणी उणा (कमी) असेल तरी तो मुमुक्षु (मोक्षाची इच्छा करणारा) नव्हे हे स्पष्ट जाणा. अहंकार गळल्याशिवाय, लोभाचे उच्चाटन झाल्याशिवाय व मन निरिच्छ झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान ठसत नाही. देह हा आत्मा आहे, अशी जी बुद्धि तीच माणसाला भ्रमात टाकते. कुठल्याही वस्तु विषयी आसक्ति असणे हेच बंधनाला कारण होते. विषयांविषयी कल्पना व इच्छा सोडा म्हणजे ब्रह्म हाती येईल. निराकार परब्रम्हचा साक्षात्कार मिळविणे हे कठिण कर्म आहे. म्हणून सगुण परब्रह्माच्या वर्णनाचे वर्म जाणून बुद्धिवान लोक त्यालाच आपला धर्म समजतात. (ओ. १०९-१३३)

आत्मा सर्व भूतांमध्ये गुप्तरितीने वास करतो हे तत्त्व वेदांती जाणतात. परंतु याचा सर्वांनाच अनुभव येईल असा पुरावा कुठे आहे? आधी चित्त शुद्ध लागते, आणखी बुद्धि दर्भाच्या टोकासारखी तीक्ष्ण लागते. तेव्हाच हा अत्यंत पवित्र आत्मा कृपावश होऊन प्रकट होतो. आत्मा सदा (जन्म, वृद्धि, नाश वगैरे) विकाराशिवाय आहे. आत्मा ज्याने जाणला आहे तो धैर्यवान, बुद्धिमान, शोक नसलेला व सदा संसारातून मुक्त असतो. येथे प्रवचन करण्याची युक्ति किंवा ग्रंथ समजण्याची शक्ति चालत नाही. वेद व श्रुति यांच्या ज्ञानानेही काही उलगडा होत नाही. आत्मा नित्य व विकाररहित आहे आणि शरीर अनित्य व त्याची अवस्था (स्थिती) कायम न टिकणारी आहे असे जाणून, जो आपले हित साधतो तोच खरा योग्य व अयोग्य कार्याविषयी जागृत होय. आत्मज्ञानीला सदा कसलीच भीति नसते. तो स्वतःला एकेकटाच व या जगात स्वतःशिवाय दुसरे काही नाहीच असे समजतो. (अशा प्रकारे) दुजेपणाचा ठाव-ठिकाणाच पुसून काढला की, शोकाचा नाश निश्चित फळास येतो. आत्मा जरी जाणण्यास अवघड तरी प्रवचने ऐकून त्याचे ठिकाण सापडत नाही. केवळ बुद्धि काय करेल? तरीपण (योग्य) उपायांनी तो जाणण्यास सुलभ होतो. ज्याला स्वतःला इतर कुठली कामना (इच्छा) नाही व ज्याची आत्मज्ञान हीच मात्र कामना आहे व जो आत्म्याची सतत आराधना करतो त्यालाच त्याचा श्रेष्ठ लाभ होतो. किर्तन वगैरे ऐकताना 'तोच मी आहे' अशा अभेद्य दृष्टीने जो पाहतो व हेच ज्याचे सतत ध्येय राहते त्यावर आत्मा अनुग्रह करतो. जो सदा वाईट आचरण करण्यास आसक्त असतो, जो सदा अशान्त व अस्थिर असतो, ज्याचे चित्त एकाग्र नसते अशा ज्ञानी माणसाला देखील तो पावत नाही. श्रुति व स्मृति यांनी प्रतिपादिलेले योग्य कर्म जो करतो व अयोग्य कर्म सोडून देतो, ज्याचे चित्त सदा एकांतात (स्वस्थ) असते त्याच्या आधीन आत्मा असतो. वाईट आचरणापासून जो विरक्त, आचार्य व गुरु यांच्या पदी जो नम्र व फलाच्या इच्छेपासून जो निवृत्त त्यालाच हा आत्मा प्राप्त होतो. विषयांविषयी निष्काम झाल्याशिवाय, केवळ आत्म्याविषयी कामना

धरल्याशिवाय आणि वृत्ति शांत झाल्याशिवाय आत्माराम पावणे कठिण. जिज्ञासूचे तपाचरण पाहून जेव्हा आत्म्यास कृपा उपजेल तेव्हाच तो स्वतःचे स्वरूप प्रकट करेल. गुरुच्या मदतीशिवाय त्याला पावणे सोपे नाही. तरी स्वस्वरूप प्राप्त करण्यासाठी साधकाने श्रवण, मनन वगैरे करावे, अभेद्य भावाचे नीट अनुसंधान (लक्ष्य) ठेवावे तरच आत्मलाभ सुखाने होईल. संसार हा सर्व अज्ञानमय आहे, त्याचा पसाराही अज्ञानमूलक आहे. ज्ञानाशिवाय मोक्षास थारा नाही हे जरा समजून घ्या. शास्त्रांच्या अनुभवाला अनुमान आणि युक्ति यांची शक्ति लागते. ज्ञान मात्र संसाराचा लय झाल्यावरच उत्पन्न होते. दुसऱ्या कशानेही शक्य नाही. मोठा साधू असो की नीच पापी असो, जीवात्मा हाच परमात्मा हे जो जाणून वागतो तोच खरा साधू, तोच भेदरहित आत्मा होय. ब्रह्म व आत्मा एक आहेत हे जे ज्ञान तोच ज्ञानाचा कळस होय. एकदा आत्मज्ञान झाले की सर्व अज्ञान नाहीसे होते. पूर्ण आत्मज्ञान झाले की मग जाणण्याचे काहीच उरत नाही. साक्षात्कारामुळे त्याचेकडून हाताल्या वस्तुंप्रमाणे सर्व काही जाणले जाते. त्याला आत्मज्ञानाचे फळ म्हणजे संसाराची संपूर्ण निवृत्ति, परमानंदाची तात्काळ प्राप्ति व मोक्षाचा सुकाळ प्राप्त होतो. (ओ. १३४-१५४)

आत्मा सूक्ष्मापेक्षाही सूक्ष्म व महान्‌पेक्षाही महान्‌ आहे. परंतु असे बोलणे ते फक्त त्याची सर्वव्यापकता बुद्धिला कळण्यासाठी. तो स्वतः सूक्ष्मही नाही व महान्‌ही नाही. हा नुसता सापेक्षभाव आणि कल्पनेचा खेळ. तो तर ब्रह्मदेवापासून ते गवताच्या काडीपर्यंत सर्व चर व अचर वस्तूंत भरलेला आहे. हे त्याचे (आत्म्याचे) अस्तित्व बुद्धित सामावून घेण्यासाठी (वेदांती) त्या अमर्यादितालाही वाचेने मर्यादित करतात. केवळ बुद्धिवैभवाच्या योगाने खरे वर्म हाती लागत नाही. साधु संतांच्या आणि सद्‌गुरुच्या संगतीने व त्यांच्या सेवेपासून होणाऱ्या कृपेने त्याची प्राप्ती होते. ब्रह्माचे सविस्तर वर्णन पोथ्या पुस्तकांत काय थोडे भरलेले आहे? परंतु सद्‌गुरुकृपा जोवर होत नाही तोवर (आत्मा) या जगाचा शेवट झाला तरी हाताशी चढत नाही. नित्य व नैमित्तिक कर्म करून जोपर्यंत मन शुद्ध संस्कारांनी युक्त होत नाही तोपर्यंत ब्रह्माचा अनुभव मुळीच गवसत (हाती लागत) नाही. ब्रह्मच फक्त नित्य आहे व बाकी सर्व अनित्य आहे आणि जे जे सर्व दृष्टीला दिसते ते सतत टिकणारे नाही हे सत्य आहे, त्रिवार सत्य आहे. ब्रह्माचा वक्ताही दुर्मिळ तसाच श्रोताही दुर्लभ आणि प्रेमळ व अनुभवशील सद्‌गुरु तर कठीणच सापडायला. ब्रह्म काय वाटेवर पडले? जे (योगी) पर्वताच्या गुंफांत दडले, यमनियमांत (योगाच्या पहिल्या दोन पायऱ्यांत) अडकले व ध्यानधारणी (योगाच्या सहाव्या व सातव्या पायऱ्यांत) गढले (तल्लीन झाले) अशांना देखील गुरुकृपा झाल्याशिवाय ब्रह्म दिसत नाही, ते तुझ्यासारख्या मुर्तिमंत लोभाला कसे बाबा लाभेल? ज्यास उदंड द्रव्यासक्ति त्यास ब्रह्मज्ञानप्राप्ति कल्पांतीपण घडत नाही. ही गाठ निश्चित बांधून ठेवा. परमार्थाचे श्रवण करताना विषयांचे चिंतन व प्रपंचाचा सतत विचार करीत राहिले की साक्षात्करण देखील तसेच (अर्धवट) मिळते. अंतःकरणाला मल (राग द्वेषादि विकार), विक्षेप (भ्रम किंवा मनाचा गोंधळ) आणि आवरण (आच्छादन किंवा दुर्बोधता) हे तीन दोष

असतात. निष्काम कर्मे करून मलाचे निमूर्लन होते व उपासनेने विक्षेप धुऊन निघतो. अशाप्रकारे स्वकर्म व उपासना करून कर्त्याचे चित्ताला परिपक्वता येते आणि मल व विक्षेप यांचा नाश होऊन फक्त आवरण शिल्लक राहते. हे सर्व अनर्थांचे बीज 'आवरण', ज्ञान प्रकट झाल्यावर जसा सूर्य उगवल्यावर अंधाराचा नाश होतो तसे नाश पावते. सत्याच्या (ब्रह्माच्या) ज्ञानाचे अगाध वगैरे लक्षणांनी जे वेदांतनिष्णांत जनांनी वर्णन केले ते हे ब्रह्म, ज्ञानी माणूस स्वस्वरूपी लीन झाला की स्वतः होऊनच त्याच्या ठिकाणी चमकते. थोडा अंधार व थोडे चांदणे असताना एकटा वाटसरू रानात चालताना तुटलेल्या झाडाच्या खोडालाच चोर समजून भितीने तेथेच लपतो. त्याला वाटते,'मी एकटाच आहे व जवळ पैसा आहे. तो चोर तर वाटपाड्यासारखा टपून बसला आहे. आता विचार कसला करायचा? जीवाचा भरवसाच नाही?' तोच दुरून दिव्याचा उजेड येतो व खोडाचे खरे स्वरूप प्रकट होते. वाटसरूची भीति नाहीशी होते व स्वतःला झालेला चोराचा खोटा भास त्याला कळतो. (ओ. १३३-१७३)

असो. या ब्रह्माच्या प्राप्तितील अडचणी श्रोत्यांना सांगितल्या. पुढील अध्यायात श्रेयाचे इच्छा करणाऱ्यास श्रेय स्वतःचे रूप प्रकट करेल. हेमाड साईंच्या चरणी लोळण घेतो व तोंडात येईल ते बडबडतो. साईकृपा जे बोलायला लावते ते भोळे भाविक ऐकोत. (ओ. १७४-१७५)

सर्वांचे कल्याण असो. अशा प्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंतांनी रचलेल्या श्री साई समर्थ यांच्या सत्य चरित्राचा 'ब्रह्मज्ञान कथन' या नावाचा सोळावा अध्याय संपूर्ण झाला.

।श्री सद्‌गुरु साईनाथांना अर्पण असो- सर्वत्र शुभ असो ।

# गुरुकृपा

आलो शरण साईनाथा।
दाविल्या मोक्षाच्या वाटा ।। धृ ।।
काम, क्रोध, मद, मत्सर भारी।
तयाचेही दमन करी सत्वरी ।। १ ।।
विषय वासना सांडूनी सत्वरी।
निज प्रकाश भांडार दावियले ।। २ ।।
आत्मरूपी साईनाम दावियले।
निजानंदी सुख भांडार भरले ।। ३ ।।
आत बाहेर काही न उरले।
दावियले विश्व रूप ।। ४ ।।
साईदास जीवन म्हणे।
झाली गुरुकृपा झालो साईरूप ।। ५ ।।

— **श्री. जीवन विठ्ठलराव मोरे**
मराठवाडा ग्रामीण बँक शाखा
पिंपळा, मु.पो. पिंपळा (कडा),
ता. आष्टी, जि. बीड.

# श्री साईनाथांचा शरणार्थी (२०)

लेखकः ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादकः वि. बा. खेर

एकदा दुपारी आरती व भोजना नंतर बापुसाहेब जोग मला म्हणाले, "वामनराव चला, या बैलगाडीत बसा. बाबा राहत्याला खुशालशेठकडे गेले आहेत. आपण सुद्धा तेथे जाऊया." जोगांच्या पत्नी त्यांच्यासह होत्या व ते दोघेजण व मी गाडीत बसलो. वाटेत एके ठिकाणी गाडीचे चाक चिखलात रुतून बसले. ते पाहून बापुसाहेब मला म्हणाले, "तुम्हाला सिद्धी प्राप्त झाल्या आहेत असे सर्व म्हणतात. म्हणून या चाकाला स्पर्श करा नी चाक चिखलातून निघून गाडी चालू झाली तर मी लोकांचे म्हणणे खरे मानेन." असे म्हणून त्यांनी माझ्याकडून गाडीला स्पर्श करविला व त्यांच्या श्रद्धेनुसार चाक लगेच बाहेर निघून गाडी आपोआप चालू लागली. हे पाहून बापुसाहेब म्हणाले, "लोक सांगतात ते काही खोटे नाही. तुमच्या जवळ काही तरी आहे." पण मला स्वतःला या सर्व गोष्टीची काहीच किंमत नव्हती. माझे लक्ष या गोष्टीवर नव्हते, परंतु बाबा ज्याच्यावर कृपा करतात त्याला सर्व प्राप्त होते, ह्या त्यांच्या श्रद्धेचा प्रत्यक्ष पुरावा बाबांनी अचूक दिला.

नदी ओलांडून गाडी राहत्यात एका बाजूला उभी राहिली. तसे आम्ही खाली उतरून खुशालभाऊंच्या घराकडे जाऊ लागलो. तेथे एका बाजूला बाबांना मी पाहिले. मी त्यांच्या मागे मागे गेलो. एका मोठ्या हॉलमध्ये सर्कस व नाटकगृहात ज्या प्रकारे पूर्वी बसण्याची सोय करत किंवा माझ्याकाळी कॉलेजात बसण्याची सोय असे, त्याप्रमाणे तीन बाजूंना बसण्यासाठी बाके होती. तिन्ही बाजूंच्या बैठकी स्त्री-पुरुषांनी गच्च भरलेल्या होत्या. चौथी बाजू रिकामी होती. त्या बाजूला जमिनीवर एक लहान, वर उघडा परंतु चारी बाजूंनी पितळेच्या सळ्या असलेला पिंजरा होता. एकत्र झालेल्या जमावाने बाबांना खूप प्रेमाने वंदन केले. बाबा उभे होते तेथूनच त्यांनी उभ्या उभ्या सर्वांच्या अभिवादनाचा नमस्काराने स्वीकार केला व पिंजऱ्याच्या बाहेर येऊन खुशालभाऊकडे गेले. त्या हॉलविषयी मी नंतर शिरडीला खूप पूसतपास केला, १९५७ मध्ये पण परत चौकशी केली, परंतु राहत्याला असा काही हॉल असल्याचे कोणालाच ठाऊक नव्हते. बापुसाहेब जोगांबरोबर या विषयी माझे काही बोलणे झाले नाही. जे दृश्य मी पाहिले त्या संबंधी त्यांनी किंवा त्यांच्या पत्नीने काहीच उद्गार काढले नाहीत. त्यावरून मला असे वाटते की हे दृश्य केवळ बाबांनीच मला दाखविले. बाबांच्या दर्शनासाठी जमलेल्या लोकांची संख्या कमीत कमी हजार एक असेल. त्या लोकांनी दर्शन घेताना जी शांती व शिस्त पाळली ती खरोखरीच प्रशंसनीय होती. एवढेच नव्हे तर विरळ अशी दृग्गोचर होणारी ही शांती व शिस्त अनुकरणास पात्र म्हणून माझ्या चित्तावर कायमची छाप बसली.

तेथून बाबांच्या मागे मागे आम्ही खुशालशेठकडे गेलो. बाबा आपल्या गादी-तक्क्याच्या आसनावर बसले. मी, काकासाहेब वगैरे त्यांच्यासमोर बसलो. खुशालशेठने आगमनार्थ

स्वागत करून व पूजा अर्चा करून, फळांनी भरलेले ताट बाबांसमोर ठेवले. मी बाबांच्या अगदी समोर बसलो होतो. त्या ताटातून एक केळे उचलून मी सोलले व बाबांना दिले. त्यातील अर्धे स्वतः खाऊन बाबांनी बाकीचे अर्धे मला परत केले. माझे हे करणे पाहून सर्व विस्मित झाले आणि खास करून काकासाहेब! त्यांनी ही गोष्ट राधाकृष्णआईला शिरडीला गेल्यावर सांगितली असेल तेव्हा माझ्या देखत ती म्हणाली, "मग वामनला येथे एवढे प्रेम दाखविण्यापासून कोण प्रतिबंध करतो? काय प्रेम फक्त शिरडी बाहेरच दाखवायचे असते?" माझ्या चित्तात असे काहीच नव्हते. मला ज्याप्रमाणे आतून आदेश आला त्याप्रमाणे मी बाबांना केळे दिले ते त्यांनी खाल्ले. या वरून तो आदेश खरा होता, त्यांचाच होता हे मानण्यास हरकत नाही.

खुशालशेठकडून निघून बाबा नदीच्या पलीकडे जेथे गाडी होती तेथे चालत गेले. मी पण तेथे पोचलो तसा आवाज आला, "मागे हो, मला कवटाळून घोड्यासारखा चाल." म्हणून मी बरोबर मागे समरेषेत उभा राहिलो व त्यांच्या कमरेला दोन्ही हातांनी कवटाळून घोडा जसा चालतो त्याचे अनुकरण करून चाललो असेन तसे बाबांच्या पायांजवळ एका हिरव्या कपड्यात वेटाळलेले (शीर, तोंड, धडासहित) अख्खे शव पाहिले. हे पाहून मला वाटले की बाबांनी येथे कोणी राक्षस फकीराला मारले असावे. नंतर बाबा गाडीत बसले व त्यांच्याबरोबर गाडीत काकासाहेब तसेच नार्वेकर बसले. आम्ही गाडीमागे थोड्या अंतरापर्यंत पळत चाललो होतो तेव्हा बाबा मला म्हणाले, "अरे काट्यात का चालतोस? नीट सडकेवर चाल." त्यानंतर मला समजले की बाबा खुशालभाऊकडे त्या दिवशी वामनराव नार्वेकरांना खुशालभाऊकडून काही कर्ज उसने पैसे मिळवून देण्यासाठी गेले होते. नार्वेकरांना कर्ज मिळाले की नाही, किंवा काय झाले, ते जाणून घेण्यास न थांबल्यामुळे ह्या वेळेपर्यंत मला काही कळले नाही.

कृष्ण भगवान अशाच रीतीने राक्षसांना मारण्यास वृंदावनाला गाई चरायला नेत असेल असे या घटनेनंतर मला नेहमी वाटे. जे राक्षसदमन मला बाबांनी प्रत्यक्ष दाखविले ते मला नाही वाटत माझ्या पाठीमागे चालणारे किंवा बाबांसह चालणारे काकासाहेब किंवा नार्वेकरांनी पाहिले असेल. काय हे दृश्य दाखवून बाबा मला असे सांगत होते, 'तू येथून निघून जा. या फकीराने राधाकृष्णआईला मारून टाकले आहे. बघ, माझ्या चरणाजवळील तिचे शव. झाले सुद्धा असेच. वैकुंठराव येऊन मला मुंबईला घेऊन गेला. मुंबईहून मी मोता येथे गेलो. तेथे मला शिरडी सोडल्यानंतर एकवीस दिवसांनी समजले की राधाकृष्णआईने स्वतःच्या जीवनाचा अंत घडवून आणला.

एका सकाळी बाबांच्या नावाचे उच्चारण-नामस्मरण चालू होते व ते नामस्मरण करता करताच बाबांच्या पायां पडलो. त्यावर बाबा म्हणाले, "अरे अजून ते आहेच का?" यामुळे मी विचारात पडलो. काय बाबा त्यांच्या 'साईनाथ' नामस्मरणाने प्रसन्न नाहीत, नाखुश आहेत, आणि मला दुसरे कुठले नाव घेण्यास सांगत आहेत? ज्या मंत्राचा मी बाबांच्या सांगण्यावरून जप करत होतो तो मोठ्या आवाजासहित जणुकाय मस्तकातून निघून वर आकाशात समष्टीत मिसळून गेल्याचे मी या अगोदर लिहिले आहे. नानावल्लीने

माझ्या डोक्यावर पथ्थराचे दोन घाव केले त्यावेळी तो म्हणाला होता, "सतार वाजवता येत नाही तर हातात कशाला घेतलीस?" यामुळे ज्या मंत्राचा जप मी करत होतो त्याविषयी माझ्या चित्तात शंका उत्पन्न तर झालीच होती. त्यातून बाबांनी स्वतःच्या नामोच्चरणाविषयी मला नापसंती दर्शविली त्यावरून मी खूप विचारात पडलो की आता कोणाचे स्मरण करावे? कुठला मंत्र जपावा? परंतु याबाबतीत स्पष्ट सूचना मिळेपर्यंत मी बाबांकडून मिळालेला मंत्रच चालू ठेवला.

यानंतर सात वर्षांनी म्हणजे १९२३ च्या ऑगस्टमध्ये मी मोता गावी सॉलिसिटरच्या परीक्षेच्या अभ्यासासाठी राहिलो होतो. त्यावेळी पहाटेस पाच वाजता उठून बाबांनी दिलेल्या मंत्राचा ध्यानासहित मी जप करीत असे. त्यासाठी १९११ साली बाबांकडून प्रासादिक करून घेतलेला फोटो तोंडासमोर ठेवी व दृष्टी फोटोवर असे. असे करता करता सप्टेंबर महिना उजाडला व मोताहून निघण्याची वेळ जवळ आली. त्याच्या चार-पाच दिवस अगोदर एका सकाळी वरीलप्रमाणे जप-ध्यान करत असता बाबांच्या आकृतीवर तेवढाच एक तेजस्वी ओम् पाहिला. फोटोवर बाबांचे नाव होते. त्या नावावर सुद्धा एकाक्षरी मंत्राचे आवरण दिसले. तो तेजस्वी प्रणव जेथे जेथे नजर जाई तेथे तेथे दिसू लागला. पूर्वी जशी बाबांची आकृती सर्वत्र दिसे त्याप्रमाणे आकाशात, पृथ्वीवर, वृक्षांवर, पथ्थरात सर्वत्र प्रणव दिसू लागला. यावरून काय समजायचे? आता माझी खात्री झाली की बाबांची इच्छा मी हा एकाक्षरी मंत्र जपावा अशी आहे. या अनुभवाने स्पष्ट झाले की बाबाच देहत्यागानंतर प्रणव स्वरुपाने आहेत. असे कित्येक दिवस झाल्यावर माझ्या स्वेच्छेने प्रणव दिसण्याचे बंद झाले.

बाबांची इच्छा स्पष्ट जाणवली तरी एकाक्षरी मंत्र जपण्याचा निश्चय एकदम झाला नाही म्हणून श्रीराम व श्रीकृष्णांच्या नामांचा मंत्र तसेच नवार्णव मंत्र वगैरे पण काही काळ जपले. विशेषतः स्वप्नसूचित एका कृष्णमंत्राच्या जपाची १९४२ मध्ये सुरुवात करताच लगेच हृदयातून जणुकाय एक आंगठा निघून उंच उभा राहिलेला दिसला व तुकारामाने ज्याला अंगुष्ठप्रमाण म्हटले आहे त्या आत्म्याची मला आठवण दिली. म्हणून त्या मंत्राचासुद्धा उपयोग केला. संन्यास घेतल्यावर तर कुठल्याही गोष्टीचा विचार करण्याचे उरत नाही कारण संन्याशांचा तर एकाक्षरी मंत्रच आहे असे शास्त्र एकस्वराने सांगते. संन्यास घेतल्यावर अहंकार टाळण्यासाठी विष्णुसहस्त्र नामाचे पठण करण्याचा अंतरिक्ष आदेश मिळाला. ते करता करता स्पष्ट झाले की एकाक्षरी मंत्र सगुण-निर्गुणसूचक आहे व संन्याशांच्यासाठी सुद्धा हा मंत्र शास्त्रसंमत आहे व तो विनासंकोच करावा. म्हणून १९५७ नंतर तर हाच माझा मंत्र झाला. एका उपनिषदावरून पण स्पष्ट होते की अपरोक्ष ज्ञान देण्याअगोदर गुरुप्रणालीकाच अशी आहे की एकाक्षर मंत्राचा उपदेश करावा व त्यानंतरच महावाक्याद्वारा अपरोक्ष ज्ञान द्यावे. या प्रणलिकेस अनुसरून बाबांनी मला संन्यास घेण्याअगोदर तीस वर्षे एकाक्षरी मंत्राचा साक्षात्कार दिला होता.

१२ डिसेंबर, १९५३ रोजी डाकोरहून अहमदाबादला जाऊन, १४ डिसेंबर रोजी तलोदला शंकराच्या देवालयातील पूजाराच्या दिवाणखान्यात मुक्काम होता. तेथे ६ जानेवारी,

१९५४ च्या सुमारास जागृत अवस्थेत, उघड्या जबड्याच्या सिंहावर आरूढ झालेल्या भवानीदेवी-उमादेवीचे सुंदर दर्शन झाले. नंतर लगेच गूढ रीतीने उपनिषद द्वारा महावाक्ये भगवान शंकराने सशडंग दाखवून पक्का अनुभव दिला. शंकराने ओळख देऊन, १९२३ साली प्रणवाचा उपदेश तुला केला होता व त्याचे सर्वव्यापी स्वरुप सुद्धा प्रत्यक्ष दाखविले होते त्याच्या अनुसंधनाने आता तुला महावाक्याचा देत आहे असे सांगितले. सन १९२३ मध्ये ओम्‌कार प्रत्यक्ष दाखवून जणु काय यज्ञोपवित दिले होते. आता ह्या महावाक्याचे प्रबोधन करीत आहे. 'ततो ब्रह्मोपदिष्टं वै सच्चिदानंद लक्षणम्, जीवन्मुक्तस्सदाध्यायन् नित्यत्वं विहरिष्यसि'' संन्याशाला महावाक्याचा उपदेश आचार्य करतात त्याप्रमाणे यथाविधी करून, तुझ्या गुरूचे नाव शुकदेव (व्यासपुत्र), असे सांगितले. शुकदेवाला उपदेश श्री भगवान शंकराने केला होता म्हणून तो शुकदेव तुझा गुरू आहे असे बाबांनी सांगितले. यारीतीने माझा परम गुरू शंकर भगवानच आहे.

१९१६ च्या आसपास घडलेली एक घटना आठवते ती नमूद करण्यासारखी आहे. एका रात्री दीक्षित वाड्यात काकासाहेबांच्या हॉलमध्ये मी झोपलो असता एक दुःखद स्वप्न पडले व 'आता मी असं करणार नाही' म्हणत मी जागा झालो. या स्वप्नाची उत्पत्ती म्हणजे संप्रदायाविरुद्ध निर्गुणाचा उपदेश मी न बघता, जाणता व तपासता पुढील शब्दात केलेला उपदेशः जसा काचेचा प्याला काचेच्या भुक्यापासून निराळा नसतो, सोन्याचा दागिना, अलंकार वास्तविक सोनच असतं, मातीचं घर वास्तविक मातीच असते, त्याप्रमाणेच हे जग वास्तविक जग नसून परब्रह्मच आहे, वगैरे सांगून, हे जग मुळात नाहीच असा उपदेश केला तो अनधिकाऱ्याला केला यासाठी सजा होती हे मी स्वप्नातून जागृत अवस्थेत आल्यावर लगेच समजलो. त्यानंतर मी निर्गुण, निरंजन परब्रह्माचा उपदेश करण्याचे बंद केले. वैकुंठरावला परब्रह्म तत्वाचा अत्यंत महत्वाचा उपदेश केला ते बाबांना किंवा परमकृपाळु परमात्म्याला पसंत पडले नाही. त्याचे कारण वैकुंठराव अनधिकारी होता अथवा असा उपदेश मुकुंदराजाच्या 'परमामृत'च्या खालील पक्तींविरुद्ध होताः

हे शास्त्र गौप्य करावे, कवणा स्फुट न सांगावे,
तुले तुवां अनुभवावे, गुरुगम्य हे ।। १८ ।।
गुरु संप्रदायाची वाट, न धरितां करीशिल प्रकट
तरी गुज घेउनी चावट, होतील बहु ।। २१ ।।

वरील सूचनांचा अनादर झाल्यामुळे परमेश्वर नाराज होऊन दुष्ट स्वप्नाचा दुःखद अनुभव मला आला.

याच्याउलट एक दुसरा अनुभव आहे. एका भक्ताच्या आग्रहवशात् मी त्याला 'जय जय रामकृष्ण हरि'चा मंत्र दिला. १९१६ मध्ये त्या संबंधी मला विचार करता सुचले, 'अरे आपण अधिकार बघितल्याशिवाय मंत्र दिला. याच्यामुळे भविष्यात काही शिक्षा भोगावी लागेल.' अशा विचारग्रस्त दशेत पावसाचे थेंब पडत असल्यामुळे मी शाळेच्या ओसरीत बसलो होतो. तेथे थोड्याच वेळात राधाकृष्णआई श्वेतवस्त्र परिधान करून तिकडून श्वेतवस्त्राच्या चिंध्या घेऊन जाताना दिसली. या रीतीने दर्शन देऊन तिने मला असे

जाणवून दिले–'वामन, जसे माझे, परिधान केलेले वस्त्र, व माझ्या हातातील चिंध्या या एकाच स्वरुपाच्या रंगाच्या आहेत, तसेच तुझे व माझे स्वरुप एकच आहे. तू त्याला माझा मंत्र दिलास त्यात काय बिघडले? माझ्या प्रेरणेनेच व माझ्या स्फुरणानेच असे झाले आहे, काही चिंता करू नकोस.'

वरील दुःखद स्वप्न व जागृतीत दर्शनद्वारा राधाकृष्णआईने दिलेल्या आश्वासनावरून आज ता. ८-७-५९ रोजी एका स्पष्ट निर्णयावर मी पोचलो आहे की निरंजन, निराकार, शुद्ध, बुद्ध, परब्रह्माचा उपदेश कोणाला करण्याचा माझा अधिकार नाही. माझा अधिकार फक्त सगुणरूप धारण केलेल्या अवतारांचे नामस्मरण करविण्याचे किंवा त्या नामांचा मंत्र देण्याचा आहे, यापेक्षा अधिक नाही. म्हणून शक्यतो अवतारांच्या नामाचा मंत्रसुद्धा अपरिहार्य असलयास द्यावा. होऊन गेलेल्या अवतारांचे तसेच आपल्या गुरूचे स्मरण, कीर्तन, भजन इत्यादि करून-करवून जनतेत भक्तीचा प्रचार करण्याचा मला आदेश दिसतो, ही गोष्ट आता अचूकरीत्या हृदयात कोरलेली राहो, ही परम कृपाळु प्रभु गुरुजी साईनाथांना माझी प्रार्थना.

संन्यास घेतल्यानंतर या भक्तीचाच प्रचार करण्याचा आदेश आहे, ही गोष्ट, सन १९५४, जून १३, ज्येष्ठ शुद्ध द्वादशीला, श्री. पणशीकरांनी बारा दिवसांचा उपवास करून त्यांच्या मंडळाने तयार केलेल्या पादुका मला बळजबरीने त्यांच्या मंडळाच्या सदस्यांसह स्वखर्चाने स्टेशनवरून वाजत गाजत मिरवणुकीने येऊन विधिःपुरस्सर अर्पण केल्या, त्यावरून बिलकुल स्पष्ट होते. सगुण भक्तीचाच प्रचार करावा हाच माझा धर्म आहे, ही गोष्ट मला आता पक्की समजली आहे व याविषयी काडीचीही शंका माझ्या मनात उरलेली नाही.

# भाव सुमने

भाव सुमने माझी साई
तुमच्या चरणी अर्पितो
आर्शीवाद द्या आता
साई! साई! स्मरतो

नाम तुमचे मुखी
येता जाई दिवस सुंदर
तुमचे मुख देवा
देखणे नयन मनोहर

शिरडीचा तू साई
असशी श्री गणेशा
आर्शीवाद देवूनी
दुःख हरी विघ्नेशा

कल्पतरु तू भक्तांचा
संकट करशी दूर
तुझ्या चरणी ठेवता माथा
येतो भरून उर.

— श्री. प्रशांत भ. देवकर
भांडूप (पूर्व), मुंबई-७८.

# श्रीबाबांचा गुरुमार्ग

— **श्री चकोर आजगांवकर** एम्.ए.
उपसचिव, शिक्षण खाते, महाराष्ट्र,
वाय ११/१७०, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

या विषयावर गेल्या '**गुरुपौर्णिमा**' विशेषांकात थोडीफार चर्चा केली. अनेक भक्त व वाचक यांची याबाबत अधिक मार्गदर्शनासाठी पत्रे आल्याने या विषयावर अधिक सुस्पष्ट व सुबोध विचार मांडीत आहे.

**बाबांचा पंथ :** श्रीबाबांनी धुळे न्यायालयाच्या कमिशनपुढे बोलताना आपला पंथ कबीर पंथ असल्याचे अगदी स्पष्ट सांगितले होते. आपले गुरु व्यंकुशहायांच्या प्रेमळ मार्गदर्शनाचाही ते वारंवार उल्लेख करीत. साईसच्चरितात चार शिष्यांची एक रुपकालक गोष्ट त्यांनी सांगितल्याचे नमूद केलेले आहे. त्यातील एक शिष्य कर्मयोगी आहे, तर दुसरा मनोलयाचा मार्ग आचरणारा ज्ञानयोगी आहे, तिसरा शिष्य प्रयत्नवादी व गुरुशास्त्रग्रंथविरोधी आहे, चौथा शिष्य मात्र भक्ति व श्रद्धावान आहे. साईगीतायनकार म्हणतात,

> **"मज ठाऊक नव्हते कर्म, योग वा ज्ञान**
> **परि अंगि न होता देहबुद्धि अभिमान**
> **उरि उसळत होता श्रद्धावान महान"**

**गुरुकृपा :** असा हा शिष्य भन्नाट साधनामार्ग हिंडून विकल झाल्यावर श्री गुरुदेवांना शरण गेला आणि त्या शरणभावातून गुरुदेव प्रगट झाले व हृदयातील अज्ञानतम ओसरले. श्री साई गीतायनाच्या शब्दात सांगावयाचे तर :—

> **"अर्पिला गुरुंच्या चरणी माझा देह**
> **मनबुद्धि आणिक अहंकार संदेह**
> **बांधिली मनाची मोट, शमविला दाह!"**

श्री गुरुंच्या कृपेने मनाचा लय झाला, संकल्प विकल्प विरले, मन उन्मन्न झाले, ती सच्चिदानंद ज्योती प्रगटून हृदय तेजाने भरून गेले! थोडक्यात 'श्रद्धा व सबुरी' या दोन चाकांच्या रथावर श्री जगद्गुरुंना अनन्यशरण समर्पण बुद्धीने बसविल्यावर जीवनरथाचे सारथ्य त्यांनी स्वीकारले व आत्मज्योतीचे दर्शन घडवून तुरीयातीत निरंजन अवस्थेला नेऊन पोहोचविले. या अनन्यशरण श्रद्धाभावाबद्दल बाबा आपले परम सख्यभक्तीचे प्रतीक असलेले श्री. शामा यांना म्हणत : "या धुनीसमोर बसून मी खोटे बोलणार नाही. शामा, जे भक्त गुरुशरण झाले, गुरुंच्या नामरूपात रंगले, गुरुगीतगायनात दंगले. त्यांचा प्रपंचभार मी गुरुस्वरूपात उचलतो. ते भक्त मला परमप्रिय आहेत." गीतेच्या १२ व्या अध्यायातील भगवंताच्या भावावेशात बाबा म्हणतात :

> **"भक्त कार्यकल्पद्रुम**
> **मी करुणा अमृतोपम**
> **मीच मंत्र मृत्युंजय, मीच मोक्ष तीर!** (श्रीसाईगीतायन)

**गुरुशरणता :** दुसरे ज्ञानी भक्त नानासाहेब चांदोरकर यांनाही बाबा म्हणत असत की, "अरे नाना! तू लोभ मोह अभिमान, कर्तेपणाचा अहंकार सोडून कर्तव्यकर्म आचरण्यात कसर करू नकोस. तू समसाम्य बुद्धीने जगाकडे पहा. सुवर्णमाती यांत तात्त्विकदृष्ट्या भेद नाही, हे समजून घे. फलाशा व कर्मातील आसक्ती सोड." गीतेतील श्रीकृष्णाच्या उपदेशाचा हा अनुकार श्री साईकृष्णाने केला असून तो "**भूतांत भासुं दे भगवंताचे भान**" अशा वासुदेवात्मक जगत् दृष्टीने पहावयास शिकवतो. श्रीगुरुंसारख्या कल्पवृक्षासमोर उभे राहिल्यावर त्या सरकारचे दान मागून घ्या. तो मोक्षधनाचा दाता आहे. माझ्या सरकारचे (श्रीदत्तगुरुंचे) धन वावरं वावरं भरून पडलेलं आहे. ते अवधूत गुरुचे अक्षयधन मागा. या संचित, प्राक्तन व प्रारब्धाच्या खेळात असे क्षण परतणार नाहीत. "**अवधूताचे अक्षयधन घे मागूनि अपरंपार**." गुरुरूप बाबा जेव्हा घरोघर भिक्षा मागावयास येतात, तेव्हा त्या गुरुतत्त्वाकडे एक भिक्षेकरी फकीर म्हणून पहायचे नसते. या जगाच्या महोदर स्वामीला तुम्ही स्वतःचे असे काही देऊ शकत नाही. श्रीसाईगीतायनाच्या शब्दात एकच मागायचे असते :

**"असा क्षण फिरून परते न**
**करावे सर्वस्वच दान —**
**बुद्धि, मन, अहंकार चित — वहावे चरणि कृपावंत**
**अलौकिक घडे लौकिकात — मागती भिक्षा भगवंत**

**कर्म, भक्ति, ज्ञान :** श्री चांदोरकरांना बाबा सांगत, "अरे नाना, संसार म्हणजे बायका-पोरे नाहीत! तर सबंध पचेंद्रियांचा व्यापार आहे. मनातील वृत्ती तरंग आहेत. संसार सोडून तू दूर कुठे जाणार? प्रारब्धाच्या तरंगात श्रद्धा सबुरीने शांत राहून ते प्रारब्ध संपव. अहंकार वृत्तीमध्ये मिसळून त्यात वाढ करू नकोस. भोगात विरक्त रहा. त्यागात तृप्त रहा, फळाविण कर्म करण्याचा अधिकार गाजव. विश्वरूपा नाटकात रंगूनही आतून अलिप्त रहा.

**या विश्व नाटकी रंगावे अंगांठा,**
**परि अंतर्यामी नसो कुणाचा संग**
**हा विवेक होतो साधनमोक्ष पदाचे**
**मग जिणेच होते पंथराज मुक्तीचे**
**घरदारही बनते दिव्य रूप देवाचे**
**संसार न उरतो, उरतो मोक्षाकार** (श्रीसाईगीतायन)

दासगणूंनाही बाबा सांगतात,

**"नामसुधा रस प्यावा**
**हरि गावा, हरि घ्यावा**
**मंथुनिया हा प्रपंच प्रेमामृत प्यावे** (श्रीसाईगीतायन)

प्रेममय गुरुभक्तीचा महिमा वर्णिताना बाबा सांगत की, अवघे जीवनच प्रेम बनू दे! संसाररूप कालियाच्या स्पर्शाने काळवंडलेली कालिंदी अमृतमय प्रेमाने धवल बनू दे. या काळ्या या यमुनेशी गौर गंगेचे मिलन घडू द्या!

**नाथपंथी साधना :** बाबांचा पंथ नाथपंथाशी व कबीरपंथाशी समांतर होता, हे पूर्वीच्च सांगितले आहे. त्यातील हा गुरुमार्ग आहे. गुरुभक्तीचा, गुरुप्रीतीचा, गुरुकृपेचा आणि गुरुगौरवाचा! गुरुध्यानातून शिष्यासच गुरु व्हायचे आहे. ज्योतीतून ज्योत लावायची आहे. "**ध्यानमूलं गुरोमूर्ति**" हा गुरुगीतेतील गुरुमार्गाचा प्राण आहे. आपल्या गुरुमार्गाचे विवेचन करताना बाबा नेहमी म्हणत :

"माझ्या गुरुनी मजकडे दोन पैसे गुरुदक्षिणा मागितली. पहिला पैसा **श्रद्धा.** यालाच्च गुरुप्रेम वा गुरुनिष्ठा म्हणतात. यालाच गुरुशरणता, प्रपत्ति मानतात. या श्रद्धेने मन स्थिर होते. संकल्प थांबून मन निर्विकल्प बनते. वृत्ती निरुद्ध होऊन गुरुमय बनतात. दुसरा पैसा **सबुरी.** हिला तितीक्षा, सहनशक्ति म्हणतात. या तितीक्षेने संसारातील सुखदुःखांना समभावाने सामोरे जाऊन प्रारब्ध कर्मांचा क्षय करता येतो. नव्या कर्मांची निर्मिती थांबून संचिताच्चा लोप होतो.

**गुरुध्यानातून कृपा :** श्रीगुरुच्या अखंड निदिध्यासातून आपण कोटभ्रमरवत् ध्यान करू लागतो. दिव्याने दिवा लागतो. साईंच्या दृष्टीतील दिव्य ज्योत आपल्या हृदयात ज्योतीरूपात अवतरते. या दृष्टीवेधाच्या दीक्षेत श्रीगुरु-शिष्याचे कासवीप्रमाणे दूर राहूनही संरक्षण करतात. गुरुंचे मुखावलोक करीत शिष्य हा गुरुचरणाचे ध्यान करतो, तुम्हाआम्हातील भिंती पडतात. श्रीसाई शरीरात प्रवेशतात. भक्ति भावावस्थेत चढते, कर्म नैष्कर्म बनते. ज्ञान सहजावस्थेस पोचविते. स्थूल, सूक्ष्म व कारण देहाची पातळी ओलांडून मन तुरीयेत शिरते. तुरीयातीत अवस्थेतून गुरु उन्ममावस्थेत नेतात. जीवाशीवाचे ऐक्य घडते. समाधीहूनही श्रेष्ठ सामरस्याची अवस्था प्राप्त होते. जप, तप, मंत्र, तंत्र, योग, याग, व्रतवैकेल्ये ही सारी अनावश्यक ठरतात. सर्व साधने सिद्ध करणारा कल्पतरू, चिंतामणी वा कामधेनू असे साई सद्‌गुरु स्वतः नाद, बिंदू व कला बनतात व प्राणमनाचा लय घडवून आत्मज्योती प्रगट करतात. भक्तांची आर्तता, ज्ञानाची समदृष्टी, कर्माची समर्पणभावना, योगाची लयावस्था चारही मुक्तीसह सहज हाती येते. बाबा म्हणतात :

> **सहस्त्रदळ कमळी मी गंध**
> **परमशक्तीचा अमृतस्पंद**
> **मुक्तछंद मी परमानंद**
> **प्रणवनाद मी अखंड माझा सूभावीत निवेश!** (श्रीसाईगीतायन)

**साक्षात्कार :** या नाथ व कबीर पंथी साधनेचा शेवट हा आनंदकारक असतो. भक्त हा गुरुच्या कृपेचा अमृतानुभव घेऊन कृतार्थ होतो. चकोर चंद्र बनतो. साईचंद्र हा भक्तचकोर बनतो. जीवन हे एक अमृतधारागीत बनते. अमृताला छंद फुटतात. वेदनेला किनार सौख्याची लाभते. आनंदच आनंदाला सलतो.

> **अलख पुरुष पलखात खेळतो चिद्‌गगनाभ्यंतरी**
> **प्राण भृंग तो हंस भिरभिरे सहाही चक्रावरी**
> **असल्या छंदी परमानंदी ये स्वानंद घरी**
> **अशी समाधी लवहि तुटेना, देह मिटावा तरी** (श्रीसाईगीतायन)

पूर्ण ज्ञान झालेला तो गुरुभक्त सारे जीवनच स्वानंदाकार बनवितो. त्याची ज्ञानोत्तर भक्ती अशी :—

**"तो हंस पुरुष गुरुभक्तिधने — करि मंगलमय अवघेच जिणे**
**त्रैलोक्य तयाच्या धन्यगुणे — भव कृतार्थ त्याच्या गुणगाने".** (श्रीसाईगीतायन)

# श्री साई सतुचरित-परमार्थ प्राप्तीचे साधन

**— कु. नीता म. लिंगरकर**
७/२६८, नंदादीप,
सायन (पश्चिम),
मुंबई-४०० ०२२.

श्री साईबाबांच्या सत्चरिताचे वाचन हे एक परमार्थ प्राप्तीचे उत्तम असे साधन आहे. ही पोथी ज्ञानेश्वरी आणि एकनाथी भागवत इतकीच श्रेष्ठ आहे. बाबांनीच कै. अण्णासाहेब दाभोळकरांना प्रेरणा देऊन त्यांच्याकरवी ही पोथी लिहून घेतली. जसे ज्ञानेश्वरी आणि भागवत वाचल्याने परमार्थाची वाट आपल्याला कळते तसेच ही पोथी सुद्धा आपल्याला परमार्थ साधून घ्यायची वाट दाखविते.

ह्या पोथीचे नियमितपणे श्रवण करणे म्हणजेच परमार्थ साधणे होय! बाबांनीच स्वतः कोणतीही पोथी नेमाने वाचण्यास खूप महत्त्व दिले आहे. म्हणून ह्या पोथीचा किमान एक अध्याय तरी प्रत्येकाने दररोज वाचला पाहिजे आणि त्याप्रमाणे वागण्याचा मनापासून प्रयत्न केला पाहिजे. श्रवण नियमित करून सुद्धा त्याप्रमाणे आपण जर वागण्याचा प्रयत्न केला नाही तर जे वाचले ते व्यर्थ गेले असे समजावे, असे दाभोळकरांनी स्पष्टपणे लिहिले आहे. ह्या पोथीचे एका सप्ताहात पारायण केल्याने खूपच मनःशांति लाभते.

ह्या पोथीमध्ये भक्तांना बाबांकडून आलेले वेगवेगळे अनुभव व बाबांनी भक्तांना वेळोवेळी दिलेली शिकवण यांचा संग्रह आहे. ह्या पोथीच्या वाचनामुळे आपल्याला कळतं की 'मी' म्हणजे कोणी नाही, कर्ता-करविता बाबा आहेत; गुरुशिवाय परमार्थ अशक्य आहे व नित्य नामस्मरणाने परमार्थ प्राप्त व्हायला मदत होते. ह्या पोथीच्या वाचनाने आपले प्रत्येक कर्म बाबाच करीत आहेत व त्यांच्या इच्छेवरूनच चांगले व वाईट कर्म आपल्या हातून घडते, हे कळतं.

ह्या पोथीचे वाचन करणे अतिआवश्यक आहे. ज्या भक्तांच्या मनात परमार्थप्राप्तीची ओढ आहे त्या भक्तांना "श्री साईसत्चरिताचे वाचन" हा एक उत्तम मार्ग आहे.

# श्री साईबाबांचा एक पैसा!

— **शालीनी देसाई** एम.एस.सी. (मुंबई),
एम.एस.सी. (फिलाडेल्फिया)
२१, राजस, अंधेरी (पूर्व), मुंबई-६९.

श्री साईबाबांनी गुरुदक्षिणा म्हणून जे दोन पैसे दिले त्यातील एक पैसा, आपण बाबांची लेकरे, आपल्याकडेही तसाच तो आहे का, हे पडताळून पाहू या.

श्री साईबाबांनी राधाबाई देशमुख नावाच्या वृद्ध स्त्री भक्तास उपदेश करण्याच्या बहाण्याने सर्वांनाच फार मोठे तत्व उपदेशिले आहे. वर वर पाहताना ते शब्द फारच सोपे आणि थोडेसे ग्रामीणही वाटतात. परंतु त्यापलीकडे 'वेदांचा सागर' कसा उचंबळत आहे हे पाहिल्यावर अचम्भा वाटल्यावाचून राहणार नाही. अध्याय १८ मध्ये श्री साईभक्त दाभोलकर लिखित श्री साईसत् चरितातील ओव्या अशा —

''खरेच मी लेक तू आई। आता मजकडे लक्ष देई।
सांगतो तुज एक नवलाई। परम सुखदायी होईल॥ अ.१८/४६

होता पहा माझा गुरु। मोठा अवलिया कृपासागरु।
थकलो तयाची सेवा करकरूं। कानमंतरु देईना॥ अ.१८/४७

माझ्याही मनी प्रबळ आंस। कधी न सोडावी तयाची कांस।
तया मुखेच घ्यावे मन्त्रास। दीर्घ सायास करूनि॥ अ.१८/४८

आरंभी तयाने मज मुंडिले। पैसे मज दोनचि याचिले।
ते मी तत्काळ देऊनि टाकिले।..........'' अ.१८/४९

''निष्ठा आणि सबूरी दोन। हेच ते पैसे, नव्हते आन।
म्यां ते केव्हांच टाकिले देऊन। तेणे मज प्रसन्न गुरूमाय॥'' ५२

ह्या गरुदक्षिणेच्या दोन पैशांपैकी सर्वप्रथम 'निष्ठा' हे नाणे जवळ असणे अत्यंत जरूरीचे आहे. अ.१९/५६ मध्ये जीवप्राणाइतके महत्त्व निष्ठेला आणि सबूरीला दिलेले आहे. पुढे (अ.१९/५८) निष्ठेचं वर्णन अधिक खुलासा करून लिहिलं आहे ते असं —

गुरू जरी महाप्रबळ। अपेक्षी शिष्यप्रज्ञाच केवळ।
गुरुपदी निष्ठा सबळ। धैर्यबळ सबूरी॥ अ.१९/५८

गुरू कितीही महाप्रबळ असला तरी तो शिष्याकडून गुरुचरणी सबळ निष्ठा ठेवण्याइतकी शिष्याच्या बुद्धिची अपेक्षा करीत असतो.

छान्दोग्य उपनिषदात १८ व्या खंडामध्ये नारद सनत्कुमारांना म्हणतात की, ''भगवन्, ('मति भगवो विजिज्ञास इति'॥ १/१८ छां.उ.) मी मतीच्या (प्रज्ञा/बुद्धि) विज्ञानाची इच्छा धरतो.'' तेव्हा उत्तरादाखल १९ व्या खंडात सनत्कुमार सांगत आहेत ('यदा वै... श्रद्धां भगवो विजिज्ञास इति'॥ १/१९ छां.उ.) की जेव्हा मनुष्य श्रद्धा करतो तेव्हाच तो मनन करतो, श्रद्धा न करता कोणी मनन करीत नाही. श्रद्धा करणाराच मनन करतो.

अतः श्रद्धेची विशेष रुपाने जिज्ञासा करावी. पुढे नारद म्हणतात, "भगवन्, श्रद्धा जाणण्याची मला इच्छा आहे." नारदाचा विचारायचा हेतु हा होता की, श्रद्धा कशी ठेवता येईल? त्यांचे समाधान करताना २० व्या खंडात सनत्कुमार म्हणतात, ('यदा वै निस्तिष्ठत्यथ श्रद्धाति...' ॥ १/२० छां.उ) जेव्हा मनुष्याची निष्ठा असते तेव्हाच तो श्रद्धा ठेवतो. निष्ठा नसताना कोणी श्रद्धा ठेवीत नाही म्हणून निष्ठा असणाराच श्रद्धा ठेवतो. अतः निष्ठाच विशेष रुपाने जाणण्याची इच्छा करावी. त्यापुढील छा. उपनिषदाच्या २१ व्या खंडात निष्ठेची परिणती कृतिशीलतेमध्ये दाखवून क्रमाक्रमाने सनत्कुमारांनी नारदमुनींना आत्मस्वरूपाचे दर्शन घडवले आहे. श्रद्धा आणि निष्ठा यांत किंचित थोडासा सूक्ष्म भेद आहे. श्रद्धेचा अर्थ आस्तिक्य बुद्धि. थोडक्यात सोप्या भाषेत गुरुवर पूर्णतया विश्वास असणे आणि निष्ठा म्हणजे त्याच्यापुढील एक पायरी म्हणजेच श्रद्धायुक्त गुरुपदी सेवाभाव ठेवणे. अधिक सरळ आणि सुलभ शब्दात सांगायचे झाल्यास निष्ठा म्हणजे आत्मज्ञान प्राप्तीसाठी अनुसरण्याची प्रणाली किंवा मार्ग. साईचरित्र, अध्याय ३२, ओवी ४२ मध्ये काय सांगितले आहे ते पाहू —

'गुरु परमात्मा चराचर। भरला असे सबाह्याभ्यंतर।
ऐसा व्हावया निजनिर्धार। निष्ठा अपार आवश्यक ॥' अ.३२/४२.

आत आणि बाहेर गुरु परमात्मा सर्वत्र चराचरी भरला आहे. हा स्वतःचा निर्धार ठाम व्हायचा असेल तर अपार निष्ठा असणे आवश्यक आहे. ब्रह्मनिष्ठ गुरुच्या द्वारे परमात्म तत्व समजणे, जाणणे शक्य होते पण त्यासाठी गुरुचे ठिकाणी निष्ठा असावी लागते. सर्वाठायी परमात्म तत्व आहे अशी निश्चयाची बुद्धि म्हणजे श्रद्धा. त्यामुळेच मनन करता येते. निष्ठेचा अर्थ गुरुतत्वाशी समरस किंवा तादात्म्य पावण्यासाठी जी तयारी लागते त्यासाठी लागणारी सेवावृत्ति अंगी असणे आवश्यक असते. श्रद्धा असेल तरच निष्ठाही उत्पन्न होते.

श्रीमद्भगवद्गीतेत श्रद्धा आणि निष्ठा याविषयी श्रीकृष्ण अर्जुन संवादात बराच खुलासा आलेला आहे, तो मनन करण्यासारखा आहे. अध्याय ३, श्लोक ३ मध्ये (श्री भगवान उवाच- 'लोकेऽस्मिन् द्विविधा निष्ठा...' अ.३/श्लो.३ -गीता) भगवान श्रीकृष्णांनी ज्ञानयोग आणि कर्मयोग या दोन निष्ठा सांगितल्या आहेत. श्रद्धापूर्वक आचरण आणण्याच्या त्या प्रणाली आहेत, मार्ग आहेत. जे मार्ग असतात ते उद्दिष्ट असत नसते पण उद्दिष्टाकडे जाण्यासाठी प्रथम मार्ग (रस्ता) तर हवा. समजा एखाद्याचे घरी तुम्हाला जायचे झाले तर रस्ता विचारल्यावर कुणी एखादा सांगतो, 'या अमुक मार्गाने गेल्यास लौकर सापडेल घर, पण रस्ता जरा खडकाळ आहे बरं! पण त्या दुसऱ्या रस्त्याने गेलात तर थोडेसे लांब पडेल अंतर पण सहजतेने चालू शकाल...' मग अशा वेळी तुम्ही स्वतःला जे धार्जिणी किंवा आपल्या कुवतीप्रमाणे सोईस्कर वाटेल ते पाहून त्यातील एक वाट पकडता आणि मग सहजच तुम्हाला हवे असलेले ठिकाण सापडते. त्याप्रमाणेच आत्मज्ञानप्राप्तीसाठी ज्ञानमार्ग अवघड वाटला तर सुगम अशा कर्ममार्गाने आपण जायचे की नाही ते तुमचे तुम्हीच ठरवायचे. पण ते ठरवण्यासाठीच प्रारंभी श्रद्धा ही मात्र

हवीच. भगवंतानी गीतेतील चौथ्या अध्यायात 'श्रद्धावाँल्लभते ज्ञानं' (अ.४/३९) असे म्हटले आहे आणि एवढेच नव्हे तर पुढील श्लोकांत 'अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति' अज्ञ, अश्रद्धाळु व संशयखोर मनुष्य नाश पावतो असे स्पष्ट बजावले आहे. अध्याय सहावा, 'आत्मसंयम योगा' मध्ये ४७ व्या श्लोकात भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, ('योगिनामपि.... श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्त तमो मतः। अ. ६, श्लोक ४७-गीता) सर्व योग्यांच्या मध्ये जो माझ्या ठिकाणी अन्तःकरण लावून श्रद्धेने मला भजतो त्यालाच मी सर्वात युक्त (सिद्ध किंवा श्रेष्ठ) मानतो. १२ व्या अध्यायात (भक्तियोग- अ.१२,श्रीमद्भगवद्गीता) अर्जुन जेव्हा, सगुण आणि निर्गुण ब्रह्म-उपासकांपैकी श्रेष्ठ योगवेत्ता कोण,असे विचारतो तेव्हा भगवन्त म्हणतात —

("मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः॥" अ. १२/२-)

'जे माझ्या ठायी मन लावून नेहमी युक्त (स्थिरचित्त) होऊन परमश्रद्धेने (एकनिष्ठतेने) माझी उपासना करतात ते मला श्रेष्ठ योगी वाटतात.' ही श्री भगवान् श्रीकृष्णांचं उत्तर विचार करायला लावेल असं आहे. गीतेत बाराव्या अध्यायात भक्तीचा कळस गाठला आहे. पण या भक्तिमंदिराची उभारणी क्रमाक्रमानेच होत गेली. गीतेच्या सहाव्या अध्यायापर्यंत कर्मयोग आणि ज्ञानयोग (साख्यं योग) या दोन्ही निष्ठांचे-प्रणालींचे प्रतिपादन, समर्थन व विकसन केल्यावर सातव्या अध्यायापासून परमात्म्याच्या स्वरूपाचे दिग्दर्शन सुरू झाले आहे. आठव्या अध्यायात परमात्म्याचे शुद्ध अक्षर स्वरूप तर ९ व्या अध्यायात राजविद्या, राजगुह्य कथन केले आहे.

आत्मज्ञान करून घेणे ही राजविद्या तर ते साधण्यासाठी अनन्य भक्ति करणे हेच राजगुह्य. दहाव्या अध्यायात श्रीकृष्णांनी आपल्या अनेक विभूतींचे वर्णन केले तर अकराव्या अध्यायात विराट स्वरूप दाखवून ते पहाण्यासाठी अर्जुनाला दिव्य चक्षु दिले व म्हटले की, 'असे हे माझे रूप केवळ अनन्य भक्तीनेच पाहता येते. आणि अनन्य भक्तिसाठी लागणारी पहिली वहिली सामुग्री म्हणजे साईबाबांनी सांगितलेली निष्ठा! गीतेतील बाराव्या अध्यायात भगवन्तांनी अर्जुनाला आत्मज्ञान मंदीराच्या भक्तिरूप कळसापर्यंत आणून सोडले. श्रद्धायुक्त भक्त अव्यक्तापेक्षा व्यक्त स्वरूपामध्ये लौकर लीन होऊ शकतो. म्हणूनच भगवन्ताच्या मते निष्ठेने आपल्याशी एकरूप होणारा भक्त उत्तम योगी होय. गीतेतील सतराव्या अध्यायात तर अर्जुनाने 'तेषां निष्ठा तु का कृष्ण' या विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरादाखल भगवन्तांनी श्रद्धेविषयीच अधिक जोर देऊन अधिक महत्त्वपूर्ण तपशीलवार खुलासा केला आहे. म्हणून त्या अध्यायाला 'श्रद्धात्रयविभागयोग' या नावाने संबोधले गेले आहे. यात श्रीकृष्णांनी श्रद्धेची सात्विक, राजस व तामस अशी ३ प्रकारची लक्षणे वर्णन करून सांगितली असून त्याचे सार म्हणजे 'यो यच्छ्रद्धः स एव सः॥ ३/१७-गीता 'जशी ज्याची श्रद्धा तसा तो असतो' हे होय. भगवंतांनी अर्जुनाच्या शंकेचे समाधान

करताना सर्व कर्मात श्रद्धा पाहिजे हे प्रतिपादन केले आहे आणि परमार्थाच्या मार्गात श्रद्धायुक्त सात्विक कर्माला विशेष महत्त्व सांगितले आहे. सात्विक, राजस, तामस श्रद्धा असणारे लोक अनुक्रमे देवांना, यक्ष-राक्षसांना आणि भूतप्रेतांना भजतात व त्यानुसारच अनुक्रमे निष्काम सत्कर्म, सकाम कर्म व अशुभ आचरण करतात. यापैकी जशी ज्याची श्रद्धा तसाच तो असतो म्हणजे त्या गुणांनी युक्त असतो. सात्त्विकी निष्ठाच परमार्थात अत्युच्च ठरते. श्री साईचरित्रात, अध्याय ३२, ओवी ९१ मध्ये म्हटले आहे-

'सन्ताघरची उलटीच खूण। हे तों अनुभवजन्य ज्ञान
एथे निष्ठाच एक प्रमाण। एक साधन गुरूकृपा' ॥ ३२/९१, साईचरित्र

संताघरच्या खुणा उलट्या असतात. तेथे अनुभवजन्य ज्ञान असते. (ते उपदेशिले जात नसते.) त्यासाठी निष्ठा हेच प्रमाण आणि गुरूकृपा हे साधन आहे.

निष्ठा हे प्रमाण आहे हे ठीक वाटते, पण गुरूकृपा साधन आहे, ही मेख काय मारली आहे बरं? याचं उत्तर गीतेत सापडते. अ. ७/श्लो. २१ मध्ये भगवन्तांनी म्हटले आहे की, 'यो यो यां यां तनुं भक्तः **श्रद्धयार्चितुमिच्छति**। तस्य तस्याचलां श्रद्धा तामेव विदधाम्यहम्।'। अ.७/२१-गीता) जो जो भक्त ज्या ज्या देवतेच्या रुपाची श्रद्धेने आराधना करू इच्छितो त्याची त्याची त्या देवतेच्या ठायी श्रद्धा मी स्थिर करतो. याचा अर्थ असा, भक्ताची श्रद्धा स्थिर होणे म्हणजेच गुरूकृपेचा लाभ आणि तेच साधन असते. कारण श्रद्धेला बळकटी आणण्याचं काम गुरूच करत असतात. त्यांच्या केवळ कृपेनेच ते होत असतं ह्मणूनच संतांच्या घरच्या खुणाच लक्षात येणं भारी कठीण काम! "आमची एवढी साईबाबांवर श्रद्धा आहे हो। पण मग असं कां होतं, मन चंचल ते कळतच नाही" असे कधी कधी भाविक साधक कळवळून म्हणतात. पण त्या श्रद्धेला स्थिर करणं साईंच्याच हाती आहे ह्याचा विसर पडत असतो! कर्ता करविता साई आहे, त्याच्यावरच आपुली भिस्त ठेवावी; मग जे काही घडेल-चांगलं असो वा वाईट- ते त्याच्याच इच्छेने घडते आहे हे सत्य गृहित धरणं म्हणजे श्रद्धा आणि ते लक्षात येणं म्हणजेच गुरूकृपा किंवा साईकृपा. तेच साधन, ज्या साधनाने साधुत्व उमगतं आणि जे उमजत असता सर्वाठायी भरून उरलेलं विश्वव्यापी साईतत्व आपल्यातही दिसू लागतं, ते साधन म्हणजेच बाबांची कृपा बहाल होणे. पण खणकन् वाजणारं ते मिळालेलं नाणं सदैव चकचकीत असू द्या. ते निष्ठेचं नाणं म्हणजे जणू बँकेतील टोकन! सर्वांच्याच हाती टोकन, जो तो आपापलं जपतो. जसं टोकन तशी रक्कम तुम्हाला मिळते. जशी निष्ठा तसे बाबा दिसतील. श्री. सद्गुरू बाबांच्या वचनांद्वारे अभंग लेखक श्री पंडीतांनी अगदी सार्थतेने बाबांचे दर्शन घडवले आहे, 'जो जो मज भजे जैशा जैशा भावे। तैसा तैसा पावे मीही त्यासी॥' ७ अभंग -बाबांची वचने आणि म्हणूनच बाबांनी दिलेली निष्ठेची मुद्रिका आपण आपल्याशीच पुन्हा पुन्हा पडताळून पहाता पहाता आपलीच मुद्रा साईस्वरूपी लीन असल्याचे आपण पाहू शकू.

सरते शेवटी बाबांच्या भावपूर्ण प्रेमळ लेकरासाठी 'बाबांचा एक पैसा' कवनरूपाने साईचरणी विनम्रपणे सुपूर्द करते.

बाबांच्या पायरीशी
बसू या अवघे जन।
साईंच्या कृपेसाठी
लांचावे अमुचे मन॥ १॥

बाबांसी पहावया
होऊ या निष्ठावन्त।
श्रद्धेने हाक देता
साई उभे मूर्तिमन्त॥ २॥

निष्ठेचे नाणे एक
अर्पूया त्यांचे पायीं।
दक्षिणेच्या बहाण्याने
चहूंकडे पाहू साई॥ ३॥

कौतुकाचा पैसा तोहि
साईंनीच आम्हा दिला।
पहावया पुन्हा पुन्हा
बाबांनी मागुनि नेला॥ ४॥

असे कसे बाबा तुम्ही
खेळता न्यारा खेळ?
धुंडता सापडेना
एक पैसा सारा वेळ!॥ ५॥

खेळातच हरपते
साईंची प्रिया वेडी।
गवसता साई खुणा
हांसते घडी घडी॥ ६॥

साईकृपेनेच बोले
बाबांची लेक वेडी।
देसाई शालिनीची
सुटते बन्धन बेडी॥ ७॥

# तुझे गीत गाण्यासाठी साई तुझ्या दारी आलो

तुझे गीत गाण्यासाठी साई तुझ्या दारी आलो
तुझे हास्य पाहताच मी हर्षभरित झालो
मनाच्या दर्पणी भोळा भाव ठेवूनी राहिलो
तुझ्या मंदिरी भक्ती सोहळा पाहण्यास आलो

खेळ तुझा मला आकळेना मी मंत्र मुग्ध झालो
भाव अंतरी दाटले कर जोडूनी उभा ठाकलो
तुझ्या चिंतनी साई मी अहर्निश रंगलो
तुझे गीत गाण्यासाठी साई तुझ्या दारी आलो

जगाचे भान न उरले मी आज साईमय झालो
सारे काही तुला देऊनी तुझा होऊनी गेलो
साई तव चरणी नतमस्तक होऊनी राहिलो
तुझे गीत गाण्यासाठी साई तुझ्या दारी आलो

**— श्री. रमाकांत पंडित साईदासानंद**
प्रभा स्मृती, १ ला मजला,
भाऊ दाजी रोड, माटुंगा (पूर्व), मुंबई-४०० ०१९.

# 'नको नको चित्ता गुंतू मायाजाळी'

**श्री. वि. म. हटवार**
१४९, रेशीमबाग,
नागपूर-९.

उल्हासें पूजा करून, स्मरावा श्रीसाई
अंतकाळी तैसा संकटाचे वेळी
अंतर्बाह्य सदा तयासी सांभाळी
संत सज्जनांनी घेतली प्रचिती

आपल्या देशातील व विदेशांतील भारतीय श्रीसाईनाथांस मानतात. घरातील कुठल्यातरी भिंतीवर किंवा पूजास्थानी श्रीसाईंची प्रतिमा ठेवून ,साईप्रेम व्यक्त करतात. भारतीय परम्परेचा सर्वांना अभिमान आहे. पवित्र परंपरेचा पाईक होण्याची पात्रता अंगी यावी म्हणून सर्व साईभक्त प्रत्येकाशी सौजन्याने वागतात. साईनिष्ठा राखण्याची प्रतिज्ञा करतात. सर्वांचे कल्याण व त्यांची समृद्धी ह्यांतच साईभक्ताचे सौख्य सामावले आहे.

माणसाला नैतिक पाठ देणारे बोधपर प्रसंग वेळोवेळी श्रीसाईलीला मासिकांत मराठी व इंग्रजी आवृत्तीतून प्रसिद्ध होतात. त्याद्वारे वाचकांच्या मनावर चांगले संस्कार घडविले जातात. विविध प्रकारच्या अनुभवांतून मानवी मनातील सूक्ष्म भावनांची आंदोलने प्रगट होताना साईनिष्ठा प्रगट होते. साईकथा वाचनाने मनावर सात्विक भावनांचे संस्कार झाल्याने नैतिक निष्ठांवर विश्वास वाढतो. त्यामुळे संसाराच्या ऐन उन्हाळ्यातही सात्विकतेचा गारवा अनुभवावयास मिळतो.

मनुष्य जन्माचे सार्थक संसारात राहून परमार्थ साधण्यात आहे. मायानगरी सोडून अपेक्षीत लक्ष्य गाठण्यास परतीरी जाणे आहे. मधे ठरलेल्या मार्गावर अफाट नदीचे काळेभोरे पाणी वहात आहे. इतर नद्यांवर पूल तरी असतात, पण आयुष्याच्या नदीवर पूल बांधता येत नाही. नाव, यश, मान-सन्मान, सम्पत्ती यांचा त्याग करणे सोपे नाही, पण नामस्मरणाने लक्ष्यप्राप्ती गाठणे सोपे आहे. भगवंताचा लाभ करून घेणे मनुष्यजीवनाचा उद्देश होय. त्याकरिता पूर्णपणे साईनामात तन्मय होऊन गीतेत सांगितल्याप्रमाणे भगवत्प्रेमाचे वेड लागले पाहिजे. सद्‌गुरूच्या श्रीचरणाचे स्मरण नित्य ठेवणे आवश्यक आहे. 'श्रीसाईनाथा सोड बाबा या प्रपंचातून' हा भाव निर्माण झाला की परमार्थाची गोडी चाखता येते.

श्रद्धा व भक्तीभावाने शिर्डीच्या समाधी मंदिराचे चित्र डोळ्यासमोर आले तर क्षणभर मन साईचरणी स्थिर होते आणि वाऱ्याच्या झुळकेबरोबर मोगरीच्या फुलांचा सुगंधही येतो, असे वाटून प्रसन्न चित्ताने साईरामाचे चिंतन होते. निर्मळ आणि प्रसन्न मनाने चिंतन केल्यास त्याचा आनंद आल्हाददायक वाटतो.

भावनांचे पाझर फुटून स्पंदनाने डोळ्यांत अश्रु येणारी निष्ठा असेल तर आध्यात्मिक निर्मळ आनंद अनुभविता येतो. हा खरा माणुसकीचा गहिवर आहे. अंतरंगातील निष्ठा वर्णन करता येत नाही. अंतःकरणात कोंडलेल्या सत्यालाही वाचा आहे. आत्म्याच्या

रूपात परमेश्वर जागा असून ते प्रत्यक्ष तो बघतो आहे याची जाणीव पाहिजे.

महाराष्ट्रात जी गाजती दैवते आहेत त्यापैकी एक शिर्डीचे दैवत असून भारतीय संस्कृतिचे प्रतीक आहे. शिर्डीच्या साईबाबांस दैवत मानणारे असंख्य भक्त आहेत. अनेकांचे संबंध व्यावहारिक स्वरूपाचे असले तरी काही संबंधात माणुसकीचा व प्रेमाचा भाग थोडा का होईना पण असतो. शिर्डीस पहिल्यावेळी गेलो तेव्हा साईभक्तांच्या औदार्याने आणि संस्थानच्या कर्मचारी वर्गाच्या व सेवकांच्या सौजन्याने मी भारलो होतो. श्रीचरणी लीन होण्यास माझे अंतर्मन मला जाणीव देऊ लागले होते. साईपूजेच्या आरतीचे शब्द माझ्या कानांत घुमत होते. मायेत चित्त गुंतवण्यापेक्षा साईसेवेत चित्त गुंतवण्याची प्रेरणा झाली. पुढे ईश्वरनिष्ठा वाढत जाऊन आध्यात्मिक लिखाणास परमहंस पुंडलिक महाराज यांनी मुर्तिजापूरास दर्शन घेताना आशीर्वाद दिला आणि तेव्हापासून ही सेवा चालू आहे. पंढरीला सगळ्या संतांनी माहेर म्हटलं आहे ना! सेवा करणाऱ्या प्रत्येकाचे कुठेतरी माहेर असते. त्या ठिकाणी जाऊन व्यक्ती आपले सुख किंवा दुःख व्यक्त करते. काहींना उभ्या आयुष्यात कुठेही सहानुभूती लाभली नसते.

जीवनात पुढे उपयोगी पडतील अशी वळणे आपल्या तरुणपणात लावली नाहीत तर पुढे पश्चात्ताप होतो. दुर्बल मन वाईट व्यसनांच्या आहारी लवकर जाते. प्रत्येकाने सत्प्रवृत्त समंजस व पापभीरू बनून मायेतून मुक्त होण्याचा प्रयत्न करावा, अशांना सात्विक आनंद उपभोगता येतो.

# सत्यशिल साई माझे

'सत्यशिल साई माझे, तुम्ही दिव्य ज्योती'
तुम्ही प्रेरणा तेजाची नित् स्वयं प्रकाशी ॥धृ० ॥
घन चिंतेचे जरी दाटूनी येती, परि परिसा किमये क्षणार्ध निवती ।
अहाऽऽ वर्णावी प्रिती जैसे दुग्ध धृत लोणी ॥ १ ॥
सत्यशिल साई माझे....

काम, क्रोध, मद, लोभ, विरहित विरक्त मम साई
प्रेमभावे परि पुष्पांची एक आस उरी ॥ २ ॥
सत्यशिल साई माझे....

असो कुणी किती दुःखी, अथवा जर्जरी
स्नेहशील हस्ते कैसा काया-कल्प होई ॥ ३ ॥
सत्यशिल साई माझे...

— श्री. गुरुनाथ शां. मालडीकर
३८ बी कोटवाला चाळ,
बॉम्बे डाईंग मिलसमोर,
न्यू प्रभादेवी रोड, मुंबई -४०० ०२५.

# सर्वसाक्षी श्रीसाईबाबा

— सौ. उषा अधिकारी
बंदर रोड, रत्नागिरी.

श्री साईबाबा देहधरी असताना त्यांचे असंख्य भक्त होते. 'जो मला भाझ्याकडे यावा असं वाटतं त्याला मी तो सातासमुद्रापलिकडे असला तरी चिमणीच्या पायाला दोर बांधून खेचून आणावे तसा मी आणीन' असं बाबा म्हणत असत आणि ते खरंही होत असे. हरीभाऊ कर्णिक हे त्यापैकीच एक! ते डहाणूचे रहिवासी होते. त्यांना श्रीसाईबाबा म्हणजे कोण? त्यांचे वास्तव्य कोठे आहे? याविषयी काहीच माहिती नव्हती. त्यांच्या घरात भाऊबंदकी सुरू झाली. त्याचा विलक्षण त्रास होऊन ते अगदी वैतागले. भाऊबंदांनी त्यांच्यावर निष्कारण आळ घातला तेव्हा तर त्यांना इतका मानसिक त्रास झाला की अन्नपाणी रुचेना, झोप लागेना. त्यांना विचारांनी घेरले. त्यांची ही स्थिती पाहून एक मित्र म्हणाला, "हरीभाऊ, तुम्ही आता शिरडीला जा. सांप्रत तेथे श्री साईबाबा म्हणून महान अवलिया वास करून आहेत. ते फाटके तुटके कपडे घालतात–भिक्षा मागून खातात. असे असले तरी ते प्रत्यक्ष देवच आहेत. खऱ्याखोट्याचा निवाडा तेच करू शकतील. त्यांची लीला काय वर्णन करावी! सध्याच्या या धामधुमीच्या वाईट काळात गोरगरिबांचा, दीनदुबळ्यांचा, शरणार्थी यांचा एकमेव पाठीराखा कोण असेल तर ते फक्त साईबाबाच! खरंच माझं ऐका आणि शिरडीला जा. तेच तुम्हाला या आरोपातून मुक्त तर करतीलच शिवाय अपूर्व मनःशांती पण देतील.

मित्राचे हे अमृतमय बोल जणू काही बाबाच त्याच्या तोंडून बोललेत असे समजून हरीभाऊंनी लगेच शिरडीला जाण्याची तयारी केली. त्यांनी शिरडीच्या साईबाबांचे नाव ऐकले नव्हते- त्यांची छबी पाहिली नव्हती तरीही मित्राच्या सांगण्यावर पूर्ण विश्वास ठेऊन श्रीसाईनाम घोळवीत ते शिरडीला गेले. सकाळी दहाच्या सुमारास त्यांनी श्रीबाबांचे दर्शन घेऊन त्यांच्यापुढे विडा, सुपारी, नारळ ठेवले व एका कोपऱ्यात बसून राहिले. आजूबाजूला इतर लोकांची खूप गर्दी होती. त्यातूनही नेमके हरीभाऊंकडे पाहून श्रीबाबा म्हणाले, "तुम्ही वाड्यात जा". हरीभाऊ उठले. त्यांना बाकीचे लोक म्हणाले, "श्रीबाबांची व तुमची पूर्वीची ओळख आहे का?" हरीभाऊंनी नकारार्थी मान हलवली. तेव्हा लोक म्हणाले, "तुम्हाला वाड्यात जायला सांगतात आणि आम्हाला काहीच कसे नाही?" हरीभाऊ हसले व म्हणाले, "हे मला तरी काय माहीत? त्यांची लीला त्यांनाच ठाऊक! मी मात्र त्यांची आज्ञा पाळून वाड्यात राहाणार आहे." त्याप्रमाणे ते वाड्यात गेले व पुन्हा दोनप्रहरी दर्शनाला आले. श्रीबाबांनी हरीभाऊंच्यावर त्यांच्या भाऊबंदांनी घातलेल्या कुभांडाची कथा सांगायला सुरुवात केली व म्हणाले, "जमिनीबाबतचा तंटा आहे ना! नानाला काकांनी मारले आणि हे सर्व तुझ्या तात्यांनी केले." यापुढे बाबा काहीच बोलले नाहीत. मात्र त्यांचे बोल खरे होते हे फक्त हरीभाऊंनाच कळले. श्रीबाबा पूर्ण अंतर्ज्ञानी आहेत हे त्यांना पटले. पुढे ३/४ दिवस हरीभाऊ शिरडीत राहिले. मात्र ते

सतत चिंतेतच असत. असेच एकदा चिंताग्रस्त स्थितीत असताना श्रीबाबा त्यांना म्हणाले, "अरे, काही काळजी करू नकोस, ज्यांनी हे दुष्ट कारस्थान करविले आहे, त्यांचे सहा महिन्यात काय होईल ते बघ." श्रीबाबांच्या या सांगण्यावर हरीभाऊंनी पूर्ण विश्वास ठेवला आणि श्रीबाबांचे बोल खरे ठरले. खटल्याचा निकाल लागून हरीभाऊ निर्दोष सुटले. आता तर काय हरीभाऊंचे चित्त श्रीसाईचरणी दृढ झाले.'निर्वाणीचा सखा माझा साईराणा' असे उद्‌गार सहज त्यांच्या तोंडून बाहेर पडले.

एकदा ते शिरडीत श्रीबाबांचे दर्शन घेऊन पंढरपूरला जायला निघाले. त्यांनी कोपरगाव ते पंढरपूर तिकीट घेतले. गाडी होती दौंडपर्यंतच व कर्णिकांचे तिकीट मेलचे नव्हते. दौंड स्थानकावरून थोड्याच वेळात मेल सुटणार होती. सगळे प्रवासी स्थानकावरून निघून गेले. दिवाही गेला. हरीभाऊंना काय करावे सुचेना. त्यात भर म्हणून त्यांना शौचाला लागले. शौचकुप दूर. अंधारही खूप. पुन्हा सामानाचा प्रश्न. आता काय करावे हा विचार येताच त्यांनी श्रीबाबांचे स्मरण केले. तेवढ्यात हमालासारखा दिसणारा एक माणूस त्यांच्याजवळ आला आणि म्हणाला, "तुम्हाला शौचाला जायचंय ना! खुशाल जा. मी तुमचे सामान तर सांभाळतोच आणि पॅसेंजरचे तिकीट बदलून आणून देतो. गाडी सुटायची वेळ झालीय पण घाबरू नका. जा. माझ्यावर विश्वास ठेऊन जाऊन या." हरीभाऊ आता साईभक्तीत पूर्ण रमल्याने त्यांच्या मनात कोणताही विकल्प आला नाही. त्यांनी त्या हमालावर पूर्ण विश्वास ठेवला. आपले पॅसेंजरचे तिकीट व जरूर ते पैसे त्या हमालाजवळ देऊन ते शौचाला गेले. हमाल तिकीट ऑफिसजवळ जातोच तोच गाडी आली आणि हरीभाऊ पण निर्मळ होऊन आले. हमालाने त्यांना गाडीत बसायला खूण केली. हरीभाऊ गाडीत जाऊन बसले. गाडी चालूही झाली. डब्यातले लोक त्यांना म्हणाले, "अहो, तुम्ही तिकिटाशिवाय गाडीत कसे आलात? काय म्हणता? हमाल तिकीट आणतोय! अहो हे लोक लुच्चे असतात. तुमचे तिकीट तर गेलेच आणि पैसेही गेले." यावर हरीभाऊ नसुते हसले. आपले बाबाच हमालाचे रूप घेऊन आलेत आणि ते आपली सर्व सोय लावतील ही त्यांची खात्री होती. त्याप्रमाणे तो हमाल खरंच धावत धावत आला, खिडकीतून त्याने हरीभाऊंना मेलचे तिकीट दिले व स्वतः गर्दीत दिसेनासा झाला. हरीभाऊंना जो प्रेमाचा गहिवर आला त्याचे वर्णन काय करावे?

याच हरीभाऊंची सून अंधेरीला माघारपणाला म्हणून गेली, तिथे तिला वेडाचा झटका आला. खूप उपचार करून सुधारणा होईना तेव्हा लगेच हरीभाऊंना अंधेरीहून ताबडतोब या असे पत्र आले. गोष्ट काळजी करण्यासारखी होती म्हणून त्याच दिवशी हरीभाऊ अंधेरीला जायला निघाले. मुखी साईनामाचा जप चालूच होता. ते ज्या डब्यात बसले होते त्याच डब्यात त्यांच्या मागच्या बाजूस कफनी घातलेला एक फकीर बसला होता. तो हरीभाऊंना म्हणाला, "परमेश्वराने जंगलात किती झाडे निर्माण केली आहेत ते पाहिलेस का? त्यांचा प्रत्येकाचा काही ना काही उपयोग आहे पण हे तुम्हाला काय माहित? मला मात्र सगळ्या झाडांची उत्तम माहिती आहे" असे म्हणून चालत्या गाडीतून त्यांनी हरीभाऊंना एक झाड दाखविले व म्हटले, "ते झाड पहा. नीट लक्षात ठेवा.

जो मनुष्य वेडा असेल त्याला या झाडाचा पाला वाटून त्याचा रस दिला तर तो पूर्ण बरा होतो.'' हरीभाऊंनी हे लक्षपूर्वक ऐकले व ते तंद्रीतच बसून राहिले. वांद्रा स्थानक येताच ते विचारातून जागे झाले. बघतात तर तो फकीर नाही. तो कुठे उतरला, कुठे गेला हे त्यांना शेवटपर्यंत कळले नाही. पण त्या रुपात श्रीबाबांनीच आपल्याला औषध सुचवलंय ही श्रद्धा ठेऊन त्यांनी त्या झाडाच्या पाल्याचा रस आपल्या सुनेला दिला व तीन दिवसातच तिचे वेड पार नाहिसे झाले.

एकदा हरीभाऊ शिरडीला गेले. मनात ठरविल्याप्रमाणे त्यांनी बाबांची भक्तिभावे पूजा केली. एक रुपया दक्षिणा देऊन व मनोभावे नमस्कार करून ते द्वारकामाईतून खाली उतरले. पण बाहेर येताच आणखी एक रुपया द्यावा असे त्यांच्या मनात आले व ते परत द्वारकामाईत निघाले. तेव्हा, आता पुन्हा येऊ नका, असे माधवराव देशपांडे त्यांना म्हणाले. मनातली इच्छा मनातच राहिली. हा विचार मनात येऊन हरीभाऊंना वाईट वाटले. लगेच ते काही कामासाठी नाशिकला गेले तेव्हा काळ्या रामाच्या देवळातच जाऊन दर्शन घ्यावे असे ठरवून ते तिथे गेले. त्यावेळी भक्तसमुदाय भोवती असताना नरसिंहजी महाराज त्यांच्याजवळ येऊन म्हणाले, ''माझा रुपया राहिलाय तो देऊन टाक.'' मोठ्या आनंदाने हरीभाऊंनी रुपया देऊन त्यांना प्रणाम केला. माझी साईमाऊली भक्ताचे कसे लाड पुरवील याचा काही नेम नाही, असे त्यांना वाटले.

एकदा ते शिरडीत श्रीबाबांची सेवा मोठ्या तन्मयतेने करीत होते. नंतर मध्यान्हाची आरती झाली. हरीभाऊंनी प्रसाद घेतला व पुन्हा तीन वाजता ते द्वारकामाईत गेले. तेव्हा श्रीबाबा म्हणाले, ''आता वर येऊ नका, ताबडतोब घरी जा. वाटेत कुठेही थांबू नका.'' श्रीबाबांची आज्ञा प्रमाण मानून कुठेही न थांबता ते डहाणूस आले, तो त्यांची लाडकी नात आदल्या दिवशी मरण पावल्याचे त्यांना समजले. आपल्या सर्वसाक्षी, अंतर्ज्ञानी, दयासागर साईबाबा खरोखरच परमेश्वर आहेत. हे सर्वार्थाने हरीभाऊंना पटले आणि ते पूर्ण साईमय झाले. आणि मनाशीच म्हणाले,

''माझ्या निर्वाणीच्या सख्या श्रीसाईरंगा
माझ्या मस्तकावरी पडूं देत तुझ्या चरणगंगा ॥''

# साई माझा

साई माझी माऊली
साई माझी साऊली
भक्तांची ती आऊली
साई माझा ॥१ ॥

श्रद्धा अन् सबुरी
हाच तुझा मंत्र
हाती धरी कृपाछत्र
साई माझा ॥२ ॥

अनाथांच्या नाथा
चरणी ठेविता माथा
देई आशीर्वाद सदा
साई माझा ॥३ ॥

**— श्रीमती पुष्पलता वसंतराव दाभोळकर**
सी/२३, कोकणनगर, माहीम,
मुंबई-४०० ०१६.

# साईदरबारातील नवरत्ने---६

# निष्ठावान भक्त 'श्यामा' उर्फ माधवराव देशपांडे



**श्री साईबाबांचे समवेत श्री. माधवराव देशपांडे यांचे दुर्मिळ छायाचित्र.**

संत चूडामणी भगवान श्री साईमहाराजांचे दरबारातील एक अमोल रत्न म्हणून श्री. माधवराव देशपांडे यांचा मोठ्या गौरवाने उल्लेख करावयास हवा. ते शिरडी निवासीच होते. साईमहाराज शिरडीत प्रथम आले तेव्हा माधवराव शिरडीत होते. त्यांच्या संपूर्ण वास्तव्य कालात ते शिरडी सोडून गेलेच नाहीत व महाराजांच्या निर्वाणानंतरही ते शिरडीतच होते आणि आजही त्यांची पिढी – त्यांचे वयोवृद्ध चिरंजीव श्री. उद्धवराव शिरडीतच आहेत. बाबांची सेवा ज्यांनी ज्यांनी केली त्या त्या सर्वांवर बाबांनी वरदहस्त ठेवलेला आहे. त्यांच्या घराण्याचे आजवर भले केलेले आहे. देशपांडे घराणे याला अपवाद मुळीच नाही.

श्री साईबाबा शिरडीत आल्यावर अवघ्या पाच घरी जाऊन भिक्षा मागत असत. १) म्हाळसापती २) माधवराव देशपांडे ३) बायजाबाई ४) काशीराम शिंपी ५) नंदराम मारवाडी. ही पाच घरं नियमाने सोडून बाबांनी भिक्षेसाठी सहावं घर पाहिलं नाही. बाबांची झोळी व थाळी पसरलेली असे ती याच पाच घरांपुढे.

भिक्षेसाठी जाण्यामुळे की काय महाराजांचा व देशपांडे कुटुंबियांचा अगदी जवळचा संबंध आला व तो पुढे वाढत वाढत गेला इतका की बाबा व माधवराव एक अविभाज्य घटकच होऊन बसले.

शिरडीतील साईभक्त माधवराव देशपांड्यांना बाबांनी 'श्यामा' असे लाडके नाव ठेवले होते. त्यांच्या जिवावर आलेले संकट बाबांनी कसे काय टाळले, ही घटना खरोखरीच लक्षात घेण्यासारखी आहे. सकाळी स्नान करून पुजेचे सामान कोनाड्यातून काढीत असता लपून बसलेला साप एके दिवशी माधवरावांच्या करंगळीला चावला. त्यांचे अंग काळे निळे पडू लागले. घरातल्या मंडळींचे तोंडचे पाणी पळाले. घरातला एकजण म्हणाला,

"त्यांना विरोबाच्या देवळात नेऊन टाका. म्हणजे विष चटकन् उतरेल."

पण माधवराव विरोबाकडे जाण्यास तयार होईनात. त्यांनी निक्षून सांगितले,

"मला बाबांच्या पायाजवळ द्वारकामाईत नेऊन टाका! मग माझे तिथे काहीही होऊ द्या!"

सर्व मंडळी त्यांना लगेच घेऊन द्वारकामाईत गेली. त्याबरोबर बाबा मोठमोठ्याने शिव्या देऊ लागले व माधवरावांना वर येऊ देईनात. ते गर्जना करून म्हणाले, 'अरे, भटुरड्या! वर चढशील, तर खबरदार! चल नीघ! खाली उतर!'

बाबांचा तो अक्राळ विक्राळ अवतार पाहून बिचारे माधवराव अत्यंत निराश झाले. त्यांना वाटले, आपण आता काही जगत नाही. ते मनात म्हणाले,

"मशिद माझं माहेरघर. मी बाबांचा पोर! पण आई जर मुलावर रूसली, तर मुलानं काय करायचं!"

थोड्या वेळानं बाबांचा राग शांत झाला. माधवराव पायरीखालीच उभे होते. त्यांची परिस्थिती अक्षरशः दयनीय होती. तेव्हा बाबा त्यांना म्हणाले,

"ही उदी घे आणि आता घरी जा! सारखा येरझाऱ्या घालीत राहा. रात्रभर अजिबात झोपू नकोस. द्वारकामाई तुझे रक्षण करील."

आणि खरोखरच तसे झाले. भयंकर विषारी जनावर डसले असताना देखील माधवरावांच्या विषाला उतारा पडला व ते दुसऱ्या दिवशी खडखडीत बरे झाले. कारण बाबांनी रागाने उच्चारलेल्या शब्दात फार मोठा अर्थ भरला होता.

"चढू नको, भटुरड्या, वर! चढशील तर खबरदार. चल नीघ, जा उतर" ही वाक्ये वास्तविक त्यांनी दंश केलेल्या नागाच्या विषाला उच्चारली होती. त्यामुळे माधवरावांचे विष चढले नाही. खरोखरीच गुरुच्या वचनातील भावार्थ लक्षात घेतला पाहिजे आणि त्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. कारण संत मुखोद्गारातून निर्माण होणाऱ्या कृपेस पारावार नसतो.

श्रीसाईबाबांचे निकटभक्त श्री. माधवराव बळवंत देशपांडे यांचा जन्म यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण कुलात शके १७८२ मार्गशीर्ष शु. पंचमीच्या दिवशी नगर जिल्ह्यात संगमनेर तालुक्यात शिरडीपासून पश्चिमेस २० मैलांवर निमोण गावी झाला. माधवरावांच्या मातोश्री ह्या त्यांच्या वडिलांचे चौथे कुटुंब. पहिल्या तीनही कुटुंबांना संतती झाली नाही, म्हणून शिरडीनिवासी श्री. लक्ष्मण मामा कुलकर्णी यांच्या भगिनी यांना त्यांनी चौथे कुटुंब केले. माधवराव हे त्यांचे पहिलेच अपत्य.

माधवराव जन्मल्यावर तिसऱ्याच वर्षी माधवरावांचे वडील सहकुटुंब सहपरिवार निमोणहून शिरडीस आले. माधवरावांचे शिक्षण शिरडीसच झाले. ते मराठी पाचवी-सहावी शिकले होते. त्यांना संस्कृतचा किंवा इंग्रजीचा गंधही नव्हता. माधवरावांना काशीनाथ

बळवंत व बापाजी बळवंत असे दोन धाकटे बंधु होते.

माधवरावांची दोन लग्ने झाली. पहिल्या कुटुंबाचे नाव सौ. सावित्रीबाई. त्यांना एकच अपत्य झाले. त्याचे नाव एकनाथपंत.

माधवरावांच्या दुसऱ्या कुटुंबाचे नाव सौ. द्वारकाबाई. त्यांना श्री. जगन्नाथपंत, श्री. उद्धवराव असे दोन मुलगे व सौ. बबीताई अशी तीन अपत्ये झाली.

माधवरावांचे शरीर धिप्पाड होते. ते चांगले उंच व मजबूत बांध्याचे होते. त्यांचा वर्ण निमगोरा. त्यांची प्रकृती निकोप व निरोगी होती. त्यांचा आहार चांगला असे. वयाच्या ७२ वर्षांपर्यंत त्यांना कधी ताप आला नाही किंवा त्यांचे कधी काळी साधे डोके पण दुखले नाही.

माधवराव पूर्ण सनातनी धर्माचे होते. खाण्यापिण्यासंबंधाने त्यांचे आचरण अतिशय शुद्ध व नियमबद्ध असे. काही घरांशिवाय परक्या ठिकाणी ते कधी जेवत नसत. त्यांना स्वयंपाक उत्तम करता येत असे. त्यांना हिंदु धर्माचा खूप अभिमान होता.

माधवराव लहानपणी काही वर्षे शिरडीतील शाळेत दुय्यम किंवा मदतनीस शिक्षक म्हणून काम करीत. नंतर पुढे काही वर्षे त्यांनी बाबांच्या परवानगीने शिरडीपासून ७-८ कि. मी. अंतरावर असलेल्या अस्तगाव गावची पाटीलकी मोठ्या यशस्वीपणे सांभाळली. नंतर मरेपर्यंत वैद्यकी केली. ते नेहमी बाबांचे नाव घेऊन औषध देत व औषधात बाबांची उदी घालत. बाबांच्या कृपेने त्यांच्या हातास नेहमी यश येई. त्यांना नाडी परीक्षा चांगली असे. मोठमोठ्या नामांकित डॉक्टरवैद्यांनी हात टेकलेले रोगी ते बाबांचे नाव घेऊन बरे करत. त्यांना रोगाची व औषधाची माहिती चांगली असे. ते कुणाजवळही वैद्यकशास्त्र शिकले नव्हते, पण आर्यवैद्यकाची काही पुस्तके वाचून व बाबांच्या मुखातून आलेली नानाप्रकारच्या रोगांवरील औषधे लक्षात ठेवून ते वैद्यकीचा धंदा करीत.

माधवराव मदतशिक्षकाचे काम करीत होते. तेव्हा त्यांचा वर्ग शिरडींत श्रीद्वारकामाईसमोर श्री. गुंड सर्कल इन्स्पेक्टर यांनी बांधलेल्या घरात, काही दिवस श्रीराधाकृष्णाआई राहात असलेल्या घरात व शेवटी शेवटी बाबांच्या श्रीश्यामसुंदर वारूचे निवासस्थान असलेल्या लहानशा घरात असे. माधवराव शिक्षकांचे काम करू लागले, तेव्हा त्यांचे वय १४-१५ वर्षांचे होते. बाबा शिरडीस आले ते माधवरावांच्या देखतच आले. त्यावेळी माधवराव बाबांना एक धुनी लावून मशिदीत बसणारा व नेहमी चिलीम फुंकणारा वेडसर अल्पवयी १९-२० वर्षे वयाचा फकीर आहे, इतकेच मानीत. बाबा हे सिद्ध आहेत, संत आहेत, सगुण परमात्मा आहेत, ही भावना त्यांच्या जवळ मुळी नव्हतीच. ते बाबांकडे फक्त चिलीम ओढण्यासाठी म्हणून जात, इतकेच काय ते.

माधवरावांची पहिली १०-१२ वर्षे बाबांसंबधीच्या अशाच भावनेत गेली. पुढील १०-१२ वर्षे बाबा सत्पुरुष आहेत, अशा भावनेत गेली व बाबांचा जसजसा निकट व नित्य सहवास होऊ लागला व त्यांच्या सिद्धत्वाचे प्रत्यक्ष अनुभव येऊ लागले व इतर नानासाहेब चांदोरकरादी भक्तगणांचे हजारो मूर्तीमंत अनुभव नित्य कळू लागले, तेव्हा त्यांची पुढील २०-२२ वर्षे बाबा हे सिद्ध पुरूष असून मूर्तिमंत सगुण परमात्मा

आहेत, अशा दृढ भावनेत व बाबांच्या आज्ञाधारकपणात व भक्तवृंदांच्या सेवासुश्रुषेत गेली. त्यांनी ४२-४३ वर्षे सतत बाबांच्या निकट सहवासात काढली. नंतर बाबांच्या समाधीकालापासून अंतकाळापर्यंत २३ वर्षे त्यांनी वैद्यकीचा धंदा केला.

बाबा माधवरावांना पहिल्यापासूनच 'श्याम्या' या लाडक्या नावाने संबोधीत. बाबा पुष्कळ भक्तांना निरनिराळ्या टोपणनावांनी हाका मारीत, व सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांची ती सर्व नावे अगदी अन्वर्थक होती. 'श्याम' हे नावही अत्यंत अर्थपूर्ण आहे व त्यात अत्यंत प्रेम व एकप्रकारची जादू भरलेली आहे.

श्रीसाईबाबांचे माधवरावांच्यावर भारी प्रेम होते. कै. भक्तश्रेष्ठ नानासाहेब चांदोरकर यांच्या वडील चिरंजीवाचे लग्न ग्वाल्हेरीस झाले असता आपण लग्नास यावे, म्हणून नानासाहेबांनी बाबांना समक्ष निमंत्रण दिले, तेव्हा "माझ्या श्याम्याला घेऊन जा" असे बाबा म्हणाले व त्याप्रमाणे माधवराव लग्नास गेले.

कै. भक्तवर्य काकासाहेब दीक्षित यांनी असेच आपल्या वडील चिरंजीवाचे लग्नाकरिता बाबांना समक्ष निमंत्रण केले तेव्हाही "माझ्या श्याम्याला घेऊन जा" असे बाबा त्यांना म्हणाले व त्याप्रमाणे माधवराव लग्नास नागपुरास गेले.

एकदा काकासाहेब दीक्षित गहिवरून बाबांकडे द्वारकामाईत आले.

"काका तुला काय पाहिजे?" म्हणून बाबांनी त्यांना प्रश्न केला.

काका म्हणाले,

"बाबा आपला सहवास असावा."

बाबा म्हणाले,

"ह्या श्याम्याला आपल्या जवळ ठेवून घे, म्हणजे मी जवळच आहे."

यानंतर काका माधवरावांना बहुधा आपल्या जवळ ठेवीत असत.

एकदा बाबांचे एक भक्तशौंड श्री. बाळासाहेब मिरीकर-कोपरगावचे मामलेदार यांचा मुक्काम दौंड-मनमाड रेल्वेवरील कोपरगावनजिक चितळी गावात श्रीमारूती-रामाच्या मंदिरात असताना ते शिरडीस बाबांच्या दर्शनास आले. दर्शन केल्यावर परत चितळीत जाण्यास त्यांनी बाबांची परवानगी मागितली. बाबा म्हणाले,

"जा, पण माझ्या श्याम्याला बरोबर घेऊन जा."

बाळासाहेब बाबांच्या आज्ञेप्रमाणे माधवरावांना बरोबर घेऊन गेले. त्याच रात्री बाळासाहेबांच्या अंगावर मोठा थोरला भयंकर सर्प त्यांना नकळत चढला, पण त्याने दंश करण्यापूर्वीच बाळासाहेबांनी त्याला हातानेच लांब उडवून दिले. जवळच्या लोकांनी मग त्याचे तुकडे तुकडे केले. माधवरावांच्या सहवासामुळे व बाबांच्या कृपेने बाळासाहेब [illegible] प्राणसंकटातून बचावले.

नागपूरचे भक्त श्रीमंत बापूसाहेब बुटी माधवरावांना बाबांच्याप्रमाणेच मान देत असत.

यावरून अर्जुन-श्रीकृष्णाच्या जोडीप्रमाणे माधवराव-बाबांची जोडी होती, माधवरावांना बाबा जसे पहिल्यापासून शेवटपर्यंत 'श्यामा' म्हणून संबोधीत, तसेच माधवरावही बाबांना प्रथमपासून शेवटपर्यंत 'देवा' म्हणून संबोधीत. श्रीबाबा व माधवराव यांच्यात नेहमी

सुखसंवाद, वार्तालाप व विनोद चालत असत. माधवरावांना जरी विपुल संपत्ती दिली नाही, तरी माधवरावांवरील त्यांचे प्रेम अवर्णनीय होते यात शंकाच नाही.

ग्वाल्हेरचे माधवराव महाराज शिंदे माधवरावांना पाच हजार रुपये देत असता बाबांनी त्यांना ते घेऊ दिले नाहीत. तरीपण ऐहिक संपत्तीपासून उपभोगण्यास मिळणारे नानाप्रकारचे भोग व ऐश्वर्य ही त्यांना भोगावयास देऊन बाबांनी माधवरावांचे पुष्कळ लाड व लळे पुरविले. अति खर्चाच्या, श्रमाच्या व दगदगीच्या अशा ज्या भारतातील चार धामांच्या, श्रीद्वारका, रामेश्वर, जगन्नाथ, बद्रिनारायण, बद्रिकेदार, गंगोत्री, जन्मोत्री, श्रीकाशी, अयोध्या, गोकुळ, मथुरा, वृंदावन, गया, हरिद्वार, प्रयाग, उज्जैन, गिरनार, मातृगया, नाशिक, त्रिबंकेश्वर, गाणगापूर, अक्कलकोट, दौलताबाद, पंढरपूर, बालाजी, श्रीरंगपट्टण, कांची, कामाक्षी, मदुरा, मीनाक्षी पक्षितीर्थ इ. यात्रा विनामूल्य बाबांनी अनायासे माधवरावांना आनंदात, सुखात व ऐषआरामात कोट्याधीशांचे सहवासात करून दिल्या. हत्तीच्या अंबारीत माधवरावांना बसवून त्यांची मिरवणूक काढविली. शिंदे सरकार, जव्हार सरकार, शेट सावकार, जहागीरदार, राष्ट्रपुरुष, राजकारणी विभूती, इनामदार, मोठे मोठे सरकारी अधिकारी व सुखवस्तू लोक यांनी माधवरावांना काही प्रसंगी सन्मान्य पाहुणे बनवून माधवरावांना प्रेमालिंगन घ्यावयास लावून माधवरावांच्या पाया पडावयास लावले, या सर्व प्रसंगी माधवरावांनी बाबांची खूपखूप प्रसिद्धी केली, हीच माधवरावांची मुख्य कामगिरी म्हणावयास पाहिजे. त्यांनी रसाळ व प्रसादयुक्त वाणीने बाबांच्या लीला कथन करून अनेकांना बाबांचे भक्त बनविले.

बाबांचे रोजचे टपाल वाचून दाखविण्याचे, बाबा सांगतील त्याप्रमाणे भक्तांना पत्रांची उत्तरे लिहिण्याचे, बाबांच्या नावावर आलेल्या भक्तांच्या मनी-ऑर्डरी घेण्याचे व त्यांचे पैसे बाबांना बिनचूकपणे नेऊन देण्याचे काम काही दिवस याच माधवरावांच्याकडे होते.

श्रीबाबांच्या महानिर्वाणानंतर माधवरावांना चुकल्याचुकल्यासारखे वाटत होते व ते अगदी साहजिकच आहे. बाबांच्यानंतर श्रीमंत गोपाळराव ऊर्फ बापूसाहेब बुटी यांनी माधवरावांच्याकडे बाबांच्या समाधि मंदिराच्यावरील सर्व भागाची साफसफाई व देखरेख करण्याची कामगिरी करण्याबद्दल त्यांना बापूसाहेबांकडून महिना सात रुपये मिळत असत. बापूसाहेबांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव श्री. केशवराव यांनी हीच कामगिरी त्यांच्याकडे सोपविली होती.

श्री. माधवरावांनी आपला देह काकासाहेब दीक्षित, भाऊसाहेब धुमाळ, अण्णासाहेब दाभोलकर या पुण्यभक्तांप्रमाणे कोणत्याही प्रकारचे कष्ट न सोसता फक्त एक अहोरात्र व दुसरे दिवशी रात्री बारा वाजेतोपर्यंत बेशुद्ध स्थितीत राहून आपल्या स्वतःच्या वास्तूत शके १८६२ चैत्र कृ. चतुर्थी गुरुवार दिनांक २६ एप्रिल १९४० या पुण्यदिवशी रात्री श्रीसाईसद्‌गुरुमाऊलीच्या दिव्य चरणी ठेवला. त्यावेळी त्यांचे वय ८० वर्षांचे होते. श्रीसाईबाबांनी वयाच्या ऐंशीव्या वर्षी अनंतात स्वतःला विलीन केले व बाबांचा सच्छील लाडका भक्त 'श्यामा' उर्फ माधवराव देशपांडे वयाच्या ८० व्याच वर्षी निधन पावले, हा एक योगायोग आहे, असेच म्हणावे लागेल.

*माधवरावांच्या नंतर बाबांचे एक निष्ठावान सेवक व भक्त श्री. सखाराम बळवंत धुमाळ हे पण २९ जून १९४० रोजी ठाणे मुक्कामी हृदयविकाराने कालवश झाले. बाबांनी त्यांना समक्ष आश्वासन दिले होते, की तुला मी फुलासारखा ठेवीन व फुलासारखा नेईन. श्री. धुमाळसाहेब नाशिक येथे वकील होते.

★★★★★

# गोड नाम ते, 'श्री सिद्ध साई'

साईस आठवण करूनी माझे
मन जसे पुलकित झाले।
हृदयात असूनी साई माझे
डोळ्यासमोर निखरून आले।
हात जोडूनी, डोळे मिटूनी
सर्व जगास विसरूनी
साईचे स्मरण केले।
दीप लावूनी, आरती म्हणूनी
सुगंध, फुले वाहिली।
दुःख, कष्ट, चिंता मनातले
साईस सांगून टाकले।
मग पदर पसरूनी
भीक मागितली
वाट दाखवा हो साई।
चिंता क्लेश दूर झाले
मनाला जशी शांती मिळाली।
एकच इच्छा मनात असूनी
श्वास सोडावा, ते घेऊनी
श्री सिद्ध साईचे गोड नाम।
साईस स्मरूनी कोणी
दुःखी झाला आहे
दाखवा, आहे असा कोणी?

**— कु. शकुंतला नायकर**
५०/२३८४, गांधी नगर,
बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.



# जे घडते ते बऱ्याकरिता

— श्री. अनिल केशवराव रसाळ
२१/३८२, बी.पी.टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई-४०० ०३७.

साईभक्तीच्या सुखद व समाधानकारक प्रवासात काही मुक्काम असे येतात की, त्यावेळी भक्तांच्या मनात शंका, कुशंका यांचे काहूर थैमान घालते. मानवी कल्पना व परमेश्वरी योजना यांच्या द्वंद्वात भक्तीचा स्थिर दिवा कदाचित विझण्याची दाट शक्यता असते. पण इथेच आपण श्रद्धा दृढ करणे फार आवश्यक असते. कारण एक प्रकारे ही आपल्या श्रद्धेची व सबुरीची अत्यंत त्रासदायक व तापदायक कसोटी असते.

भक्ती ही आपण पारमार्थिक लाभासाठीच करायची असं ठरवून केलेली असेल तर मात्र कोणताही त्रास व क्लेश होत नाही. पण हेतुपूर्वक केलेल्या भक्तीत मात्र हवं ते मिळालं नाही तर सुरुवातीला खंत वाटते, नंतर त्याचे शल्य होते व ते कायम बोचते.

माझा स्वतःचा या मार्गातील अनुभव असा आहे की, सुरुवातीला आपल्याला खेचून घेण्यासाठी श्रीबाबा अनेक चमत्कार व लीला दाखवतात, ऐहिक गोष्टींच्या खिरापतीचा प्रसाद देतात. पण कितीही केलं तरी खिरापतीचा प्रसाद हे पूर्ण जेवण होऊ शकत नाही. व त्यामुळे माणसाला कायमचे टिकाऊ समाधान मिळणार नाही.

पात्रतेनुसार श्रींचे दान असते व पारमार्थिक लाभ हा अक्षय असल्याने त्याचे मूल्य हे ऐहिक प्राप्तीच्या मूल्यांनी करायचे नसते. हा विवेक बऱ्याचशा भक्तांना नसतो. त्यामुळेच ऐहिकाचा उत्कर्ष हा पारमार्थिक प्रगतीचा एक महत्त्वाचा टप्पा समजून आपण खरे भक्त आहोत असा भ्रम काहीजण करून घेतात. या संदर्भात मला खास उल्लेख करावासा वाटतो तो नरसिंहस्वामींच्या वैयक्तिक जीवनातील एका दुःखद घटनेचा. दोन वेळा आमदारपद मिळालेले व वैयक्तिक दृष्ट्या अत्युच्च शिखरावर असलेल्या स्वामींची दोन लहान मुलं एकाच दिवशी विहीरीत बुडून मेल्यानंतर त्यांनी त्या घटनेचा अंतर्मुख होऊन विचार केला व त्यांचे असे प्रामाणिक मत झाले की, त्यांचा पारमार्थिक उत्कर्ष व्हावा यासाठी हे झाले. त्यांनी संन्यास घेतला व श्रींच्या भक्तीचा सर्व भारतात प्रसार केला. भगवंत ज्याच्यावर खरोखर प्रसन्न होतो तेव्हा त्याला सर्व प्रथम वैराग्याचे धन देतो व त्याचा कायमचा लाभ करून देण्यासाठी त्याला आपल्या सेवेची संधी देतो.

अशा प्रकारे साईबाबा भक्तांना काही गोष्टी देत नाहीत, प्रार्थना करूनही देत नाहीत. त्याचे मुख्य कारण म्हणजे अशा भक्तांची पात्रता पारमार्थिक क्षेत्रात त्यांना वाढवायची असते किंवा त्यांना असा लाभ करून द्यायचा असतो. ३२ व्या अध्यायात ऐहिक क्षेत्रात अतिशय प्रगति करून बाबा तो मानमरातब काढून फेकून देतात व म्हणतात की, ''कोणाचे देणें कोणास पुरतें'' माझ्या गुरूचे देणे हे अक्षय आहे.

याशिवाय दुसरे एक कारण असे की, देह प्रारब्ध! मानवी देह हा आपलं प्रारब्ध भोगण्यासाठी दिलेला असतो. ते संचित भोगून संपले की, पुढचा मार्ग मोकळा व

सुकर होतो. मनातील लाभ, हानी, सुख व दुःख, आशा व निराशा ही द्वंद्वे विवेकी भक्तांना संपलेली असतात व मन समाधानाच्या सागरात चिंब झालेलं असतं. हा आनंद सर्व परिस्थितीत टिकणं व साधना अखंडित चालू ठेवणं हे खऱ्या साधकाचं लक्षण आहे. साईसच्चरित्राच्या २० व्या अध्यायात मोलकरणीने विशद केलेल्या इशावास्योपनिषदाचा महत्त्वाचा प्रसंग हा बोध फार सोप्या व समर्पकरितीने दाखवतो. त्यात एक महत्त्वाचे वाक्य असे की, "सुख व दुःख हे चित्ताचे विकार आहेत व भावनेच्या भिन्नत्वांतून त्याचा जन्म होतो व यासाठी निष्काम कर्मयोगाने चित्तशुद्धी करावी म्हणजे चित्त शुद्धीने हा आनंद मिळतो व सर्व परिस्थितीत समाधानाने रहाण्याची कला साधली जाते असं श्रींनी सुचवलं आहे.

म्हणूनच भक्तांनी शक्यतो फलाची अपेक्षा न धरता कर्म करावीत व त्याद्वारे "जे घडते ते बऱ्या करीता" या भूमिकेवर सतत वावरावे असे श्रींनी सुचवले आहे.

◆◆◆◆◆

# साई किर्ती

नाम घेता तुझे साईनंद हो नाम घेता तुझे साईनंद
मनी होतो माझ्या आनंद नाम घेता तुझे साईनंद ॥ धृ० ॥

द्वारका माईतील ती धुनी
धगधगती ज्वाला त्यातूनी
बाबा त्यात हात घालूनी
प्राण वाचविला हो मुलीचा नाम घेता तुझे साईनंद
मनि होतो माझ्या आनंद नाम घेता तुझे साईनंद ॥ १ ॥

सर्प विंचू विषारी प्राणि
वाघ कुत्रा असे हो प्राणी
बाबांची आज्ञा हो पाळूनी
शेपटी हालवू लागले नाम घेता तुझे साईनंद
मनी होतो माझ्या आनंद नाम घेता तुझे साईनंद ॥ २ ॥

महामारीचा आजार पळविला
दासगणूला विठ्ठल भेटविला
आंगठ्यातुन गंगा यमुना निथळू लागल्या
दास गणूना तिर्थ लाभले नाम घेता तुझे साईनंद
मनि होतो माझ्या आनंद नाम घेता तुझे साईनंद ॥ ३ ॥

**— सौ. सुशिला सयाजीराव साळुंखे**
२३२, गुरुवार पेठ, सातारा.

# भक्ति

— सौ. उषा चंद्रशेखर जोशी
पूर्व-६, सरस्वति कॉलनी,
औरंगाबाद-४३१ ००१.

वेदांत भक्तिचे, उपासनेचे अनेकानेक प्रकार दाखविले आहेत. सर्व सामान्य माणूस आजच्या ह्या विज्ञान युगात ते सारे प्रकार बघून तर स्तिमितच होतो. भक्ति ही विधात्याने उपजतच मानवाच्या अंतःपटलांवर न मिटणारी अशी कोरून ठेवली आहे. प्रत्येकात तिचा उद्रेक होतच असतो. कुणी मातृभक्त असेल, कुणी पितृभक्त असेल, कुणी देवभक्त असेल, कुणी स्वभक्त असेल, तर कुणी गुरूभक्त असेल. पण महत्त्वाची गोष्ट अशी की, स्वतःला नास्तिक म्हणवून घेणाऱ्यांमध्येही भक्तिची 'उर्मि व भावना' ही असतेच! स्वतःला नास्तिक म्हणवून घेणाऱ्या व्यक्तिला असह्य वेदनांचा रोग असेल वा एखादी जखम होऊन त्याच्या वेदनांचा त्रास होत असेल तर कण्हताना 'आई ग! आई ग!!' असे स्वर त्याच्या तोंडून आपोआपच बाहेर पडतात. एखादा ठेचाळून पडला तर "अरे बापरे" वा भीतीदायक प्रसंगाला "बापरे" असे शब्द आपोआप बाहेर पडतात. म्हणजेच "आई-बाप" ह्यांचे विषयी सखोल हृदयात रूळत असलेल्या निष्ठेचेच हे प्रतिक नाही का म्हणता येणार? वैद्य, डॉक्टर, वकील, व्यापारी ह्यांचेशी होणारे व्यवहार कशाचे द्योतक आहेत? परस्परांवर असलेली विश्वासयुक्त भक्तिच! केवळ विश्वास फलदायक होवू शकत नाही परंतु भक्तियुक्त विश्वास निश्चितच फलदायी झाल्यावाचून राहत नाही. जेथे एकदा अनुभव घेवून ठाम मत ठरते व त्याला घट्ट चिटकून कुठल्याही अवस्थेत वृत्ती ढासळत नाही, अतुट राहते. त्याचेच नाव 'भक्ति'.

श्री. संत नामदेवांनी श्री. पांडुरंगांचे मूर्तीला जेवावयास लावले असे आपण वाचतो, ऐकतो. प्रत्यक्ष श्री. पांडूरंग मूर्ती जेवली किंवा नाही हे ज्याच्या त्याच्या मतिप्रमाणे ज्याने त्याने ठरवावे. परंतु श्री. नामदेवांना त्यांच्या भक्तिप्रमाणे श्री. पांडूरंग जेवले ह्याचे मात्र समाधान लाभले, हे नाकारता येणार नाही. भावना व श्रद्धा ह्या केवळ मनाच्या चंचलतेवर अवलंबून नसून, चित्ताचा वेध घेणारी जी उर्मी निर्माण होते, त्या भावनेची खोलवर ठसा उमटवणारी वृत्ती म्हणजे निष्ठा वा श्रद्धा अशी माझी केवळ वैयक्तिक धारणा आहे. पोथी पुराणात, वा वडीलधाऱ्या माणसांच्या बोलण्यातून आम्ही ऐकत आहोत की, "विश्वासो फलदायकः" ह्या म्हणी प्रमाणे विश्वासाने फल लाभले की विश्वास ठेवणारी व्यक्तिच श्रेष्ठ असते. कुठलेही तर्ककुतर्क वा संशय न ठेवता विश्वासाने मार्ग चालत राहिल्यानेच फल लाभते. व्यवहारात हीच बाब महत्त्वाची आहे व ती ज्याचें जवळ आहे तोच श्रेष्ठ होय. निष्कपट व विशुद्ध भावाने विश्वास ठेवून चालणारा विजय मिळविल्यावाचून रहात नाही, हे त्रिवार सत्य आहे. हे श्री सद्गुरु साईबाबांनी आम्हास दिले आहे ते श्रद्धा व सबुरीच्या रूपाने.

# कृपेची सावली

— कु. सुरेखा धोंडू होबळे
हळदोणवाडी-मये,
डिचोली, गोवा.

४ जून १९८५ चा तो दिवस! त्या दिवसाची आठवण झाली की आजही डोळ्यात आनंदाश्रू तरळतात. ॲपेंडिक्सचा आजार झाल्याने दि. ३ जून १९८५ रोजी मला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ४ जूनला ॲपेंडिक्स वरील शस्त्रक्रिया होती. अणि त्याच दिवशी सकाळी माझा एस.एस.सी. चा निकाल होता. मी पास होईन की नाही ह्या शंकामिश्रित भयाने मला ग्रासले होते व त्याचबरोबर मुखी साईनामाच्या जपामुळे मी उत्तीर्ण होईन अशी आशाही माझ्या मनात पल्लवित झाली होती. जर मी नापास झाले असते तर साहजिकच माझ्या शरीर स्वास्थावर परिणाम झाला असता व शस्त्रक्रिया तर त्याच दिवशी संध्याकाळी होती. म्हणून साऱ्यांनाच चिंतेने ग्रासले होते. माझ्या शेजारच्या कॉटवरील रुग्ण मुलगीही दहावीत होती. बहुदा तिचीही माझ्यासारखीच मनोवस्था झाली असावी, हे मी तिच्या चेहऱ्यावरून ताडले. तिची बहीण रिझल्ट पहावयास गेली होती. बऱ्याच उशिरापर्यंत ती न परतल्याने माझ्या हृदयाचे ठोके जोरजोरात व विद्युत वेगाने वाजू लागले. परंतु साईबाबांची कृपा होती म्हणूनच की काय तेवढ्यात आनंदाची बातमी (आम्ही दोघी उत्तीर्ण झाल्याची) घेऊन ती परतली. एवढेच नव्हे तर ॲपेंडिक्सची शस्त्रक्रियाही व्यवस्थितपणे पार पडली. अशीच साईबाबांची कृपासावली सर्वांवर राहो हीच साईबाबांच्या चरणी इच्छा!

## ग्रंथ परिचय

### 'श्री साईनाथ काव्य मंजिरी'

श्रीमती रुक्मिणी बेंद्रे, अंमळनेर, जि. जळगांव यांनी लिहिलेला, 'श्री साईनाथ काव्य मंजिरी' हा काव्य संग्रह म्हणजे साईभक्तांना एक अपूर्व देणगी आहे. ह्या काव्य संग्रहात साईबाबांवरील २६ कविता असून, ह्या छोटेखानी काव्य संग्रहाची सुरुवात 'गणेश रुपाने' तर शेवट 'निरोप' ह्या कवितेने होतो. कवियत्रीने हा संग्रह आदी, मध्य, अंत ह्या सूत्रात सुरेख गुंफला आहे. ह्या संग्रहाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, यात कवियत्रीने सामाविष्ट केलेली प्रत्येक कविता लय व ताल ह्या तत्वांवर रचलेली आहे. कोणत्या कवितेचे गायन कोणत्या चालीत करावे याचाही कवियत्रीने निर्देश केलेला आहे.

★ काव्यसंग्रहाचे नाव — श्री साईनाथ काव्यमंजिरी.

★ कवियत्री — श्रीमती रुक्मिणी बेंद्रे, अमळनेर, जि. जळगाव.

★ पृष्ठे ४२.

# 'श्री साईरंगस्वाद'

श्री. पांडुरंग शंकरराव भुजबळ उर्फ श्री साईरंग महाराज लिखित 'श्री साईरंगस्वाद' हा ग्रंथ अलिकडेच प्रसिद्ध झाला आहे. मानवाचे आंतर व बाह्य जीवन सुखी, समृद्ध व समाधानी व्हायचे असेल तर विज्ञानाच्या प्रगतीला आध्यात्माची जोड असणे आवश्यक आहे. याचे प्रत्यंतर ह्या ग्रंथाचा आस्वाद घेत असताना सतत होत राहते. श्री. साईरंग महाराज यांनी गेली अनेक वर्षे ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे यांचे सूक्ष्मरितीने अवलोकन, चिंतन, मनन करून त्यांतील यशस्वी जीवनाच्या साध्यासाठी मानवाला सन्मार्गाने वाटचाल करावयास लावणारे निदर्शक सुविचार, वाक्ये त्यांनी वेचली व ती 'श्री साईरंगस्वाद' ह्या ग्रंथात संकलित केली आहेत. म्हणूनच हा ग्रंथ मानवाला जीवन जगण्याची कला शिकवितो असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. याची सत्यता पुस्तकातील, *'माणसाने माणसाचा अभ्यास करणे हाच जगातील सर्वश्रेष्ठ अभ्यास, माणसाला माणसाने जाणणे हीच जगातील सर्वश्रेष्ठ विद्या, हेच जगातील सर्वश्रेष्ठ शास्त्र, हीच जगातील सर्वश्रेष्ठ कला, हेच जगातील सर्वश्रेष्ठ ज्ञान आणि माणसाने माणसात ईश्वराचे दर्शन घेणे हीच ईश्वराची सर्वश्रेष्ठ पूजा* — स्वाद २९४' ह्या एका सुविचारावरूनच पटते. अशाप्रकारचे एकंदर ५८५ सुविचार ह्या ग्रंथात सामाविष्ट केलेले आहेत. ह्या पुस्तकास थोर विचारवंत प्राचार्य श्री. शिवाजीराव भोसले यांची प्रस्तावना लाभली आहे. परमार्थ व प्रपंच यांचा समन्वय घडवून जीवनाला पूर्णाकार देण्यासाठी दिपस्तंभ ठरणारे हे पुस्तक साईभक्तांनी संग्रही ठेवण्याजोगे असेच आहे.

★ पुस्तकाचे नाव — श्रीसाईरंगस्वाद

★ लेखक — श्री.पांडुरंग शं.भुजबळ
३७७, सोमवार पेठ, सातारा-२.

★ किंमत — १० रुपये

★ पृष्ठसंख्या — ८०

परिचय कर्ता : श्री. सुनील द. राणे

●

## रामनवमी उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीचा श्री रामनवमी उत्सव, दि. ६-४-१९८७ ते ८-४-१९८७ या कालावधीत, श्री क्षेत्र शिरडी येथे साजरा होणार आहे.

# श्री खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

'अनुवादक — साईनंद

### शुक्रवार १२-१-१९१२

मी सकाळी लवकर उठलो आणि प्रार्थना केली. नेहमीप्रमाणे मी जेव्हा कामकाजास प्रारंभ केला तेव्हा नारायणरावांचे चिरंजीव गोविंद व बंधु भाऊसाहेब आले. ते काही वेळापूर्वी होशंगाबादहून अमरावतीला आले होते परंतु त्यांना मी व माझी पत्नी तेथे न भेटल्यामुळे ते आम्हाला पाहण्यासाठी येथे आले. आम्हाला एकमेकांना पाहून आनंद झाला व आम्ही गप्पागोष्टी करण्यास बसलो. बापूसाहेब जोग अन्य कामात व्यग्र असल्याने योगवसिष्ठाची सुरुवात आम्ही थोड्या उशिराने केली. साई महाराजांना बाहेर जाताना व पुन्हा मशिदीत परतताना आम्ही पाहिले. ते प्रसन्नमुख होते आणि त्यांनी मला आलटून पालटून चिलीम ओढण्यास दिली. त्यामुळे माझ्या अनेक शंकांचे निरसन झाले आणि मला उत्साह वाटू लागला. दुपारच्या आरतीनंतर आम्ही जेवण घेतले आणि काही मिनिटे मी विश्रांती घेतली. दिक्षितांना मशिदीत येण्यास रोजच्यापेक्षा विलंब झाल्याने नेहमी पेक्षा उशिराने त्यांनी रामायण वाचण्यास आरंभ केला. पाठ मोठा व कठीण असल्यामुळे आम्ही तो पूर्ण करू शकलो नाही. त्यानंतर साई महाराजांना आम्ही मशिदीत पाहिले. ते संगीत वाजवित होते. तेथे नाचणाऱ्या दोन मुली गात व नृत्य करीत होत्या. त्यानंतर तेथे शेजआरती झाली.

### शनिवार १३-१-१९१२

मी सकाळी लवकर उठलो आणि काकड आरतीला उपस्थित राहिलो. साई महाराजांनी दिवसभरात कोणताच शब्द उच्चारला नाही आणि त्यांनी नेहमी ते करतात तसे योगिक चमत्कारही केले नाहीत. खांडवाचे तहसिलदार येथे आले आहेत. रंगनाथांचे योगवसिष्ठ वाचत असताना आम्ही त्यांना पाहिले. साई महाराजांना बाहेर जात असताना व पुन्हा परतत असताना त्यांना आम्ही पाहिले. तेथे काल ज्यांनी गीत म्हटले त्या मुली होत्या. त्यांच्या उत्कृष्ठ गायना बद्दल त्यांना बक्षिस म्हणून गोड पदार्थ देण्यात आले. त्यानंतर त्या निघून गेल्या. दुपारची आरती उत्साही वातावरणात पार पडली. मेघाला अद्याप बरे वाटत नाही. माधवराव देशपांडेंचे बंधु बाबाजी यांना त्यांच्या पत्नीसह न्याहारी करिता आमंत्रित करण्यात आले होते. खांडव्याचे तहसिलदार सुसंस्कृत माणसाप्रमाणे दिसतात. त्यांनी योगवसिष्ठाचे वाचन केले. दुपारी थोडी विश्रांती घेतल्यानंतर दिक्षित यांनी भावार्थ रामायणाचे वाचन केले. तो पाठ (बालकांडातील ११ वा पाठ) योग वसिष्ठाचा सारांश होता आणि तो फारच उत्कंठा वाढविणारा होता. साई महाराज जेव्हा फेरफटका मारण्यास बाहेर पडले तेव्हा आम्ही त्यांना पुन्हा बघितले. त्यांच्या मनःस्थितीत बदल झाल्यासारखे वाटत होते. कुणीतरी असे समजले असते की ते रागावले आहेत. परंतु प्रत्यक्षात ते तसे नव्हते.

**रविवार १४-१-१९१२**

मी सकाळी लवकर उठलो, माझी प्रार्थना संपविली आणि बापूसाहेब जोग आणि राम मारुती बरोबर रंगनाथांच्या वसिष्ठाचे वाचन करण्यास बसलो. साई महाराजांना बाहेर जाताना पाहून झाल्यावर आम्ही ते पुन्हा चालू ठेवले. ते परतल्यानंतर मी मशिदीत गेलो आणि पाहिले तर त्यांची स्नानाची तयारी चाललेली होती. म्हणून मी परतलो, दोन पत्रे लिहिली आणि पुन्हा गेलो. त्यांनी मला त्यांच्या करिता बापूसाहेब जोग यांनी आणलेला तिळगुळ दिला; त्यांनी बळवंताला देखील दिला. मेघाची तब्येत ठीक नसल्याने दुपारची आरती थोड्या उशिराने झाली. तीळ संक्रांत असल्याने या दिवशी खाद्यपदार्थ भरलेले ताट लोक आणतात, याला पारोस म्हणतात. त्याला उशिर झाला होता. दरम्यान आम्ही परतलो व आम्ही आमचे दुपारचे जेवण घेतले. त्यावेळी दुपारचे चार वाजले होते. त्यानंतर दिक्षित यांनी रामायण वाचले परंतु आम्ही त्यात अधिक प्रगती करू शकलो नाही. दुपारी मी जेव्हा साईबाबांकडे गेलो तेव्हा ते कुणाला त्यांच्याजवळ येऊ देत नव्हते. त्यामुळे मी बापूसाहेब जोगांच्या खोलीकडे वळलो. आणि संध्याकाळच्या नमस्कारासाठी अगदी वेळेवर पोहोचलो. खांडव्याचे तहसिलदार अजून येथे आहेत. श्री. गुप्ते हे आपले बंधु व कुटुंबिया-समवेत आले आहेत. ते म्हणतात की त्यांचा व माझे ठाण्याचे मित्र बाबा गुप्ते यांच्याशी संबंध आहे. मी त्यांच्या सोबत गप्पागोष्टी करण्यास बसलो. संध्याकाळी शेजआरती, भीष्मांचे भजन व दिक्षितांचे रामायण झाले. आम्ही अल्प प्रमाणावर मकर संक्रांतीचा सण साजरा केला.

## भीषण दुर्घटनेतून बाबांनीच वाचविले

— **श्री. विनायक लेले**
ॐ शांती सोसायटी, वसंतवाडी,
संत नामदेव पथ, डोंबिवली (पूर्व).

दिनांक १ नोव्हेंबर १९८६, वेळ सांयकाळी सुमारे ७ ते ७। वाजण्याची. आम्ही घरातील सर्व मंडळी "घरोघरी मातीच्या चुली" हे दूरदर्शनवरील नाटक पहाण्यात दंग आहोत. माझा मुलगा चिं. मयुरेष वय ७ वर्षे व चि. निखिल वय ४ वर्षे हे दोघेजण घराबाहेर फुलबाज्या व अनार इत्यादी फटाके लावत आहेत. इतक्यात माझा धाकटा मुलगा चि. निखिल याने हातातली पेटती फुलबाजी गंमत म्हणून सहज वर फेकली. त्यामुळे आकाश कंदिलाची संपूर्ण वायर जळली, कंदील पेटला व आतील वीजेचा दिवा सुद्धा स्फोट होऊन चक्काचूर झाला. जवळच माझी दोन मुले फटाके लावत होती पण दोघांना किंचीत सुद्धा लागले नाही. ही बाबांची कृपा! तसेच माझा मोठा मुलगा चि. मयुरेष हा हातातील कापडी पिशवीत फटाके घेऊन अनार लावत असता फुलबाजीची ठिणगी उडाल्यामुळे पिशवी जळली. केवळ दयेचा सागर असे माझे बाबा पाठीशी असल्यामुळेच माझा मुलगा सुखरूप राहिला. अन्यथा फटाक्याचा स्फोट होऊन भीषण दुर्घटना घडली असती याची कल्पनाच करवत नाही.

असे हे दयाघन साईबाबा सर्व प्राणीमात्रांचे रक्षण करोत हीच प्रार्थना!

# थोर महात्मे

**— श्री. बबन डी. येरम**
१/५, कल्याणजी देवजी चाळ,
चिरागनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०८६.

'महात्मा' या शब्दाचा सरळ अर्थ आहे महान असा आत्मा. या सिद्धांतानुसार केवळ परमेश्वरालाच महात्मा ही संज्ञा लागू पडते वा शोभून दिसते. कारण सर्व जीवांपेक्षा केवळ ईश्वरच श्रेष्ठ आहे. म्हणून त्याचा आत्मा श्रेष्ठ आहे.

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयास्थित।
(गीता १०/२०)

'हे अर्जुना, मी सर्व प्राणीमात्रांच्या हृदयी स्थित सर्वांचा आत्मा आहे.'

परंतु जो पुरुष ईश्वरी तत्वाला जाणतो, अर्थात ईश्वर प्राप्त करतो तोही महात्माच आहे. अशा महात्म्यांचा संग दुर्लभच आहे.

दुःखाची गोष्ट ही आहे की, आजकाल काही लोक स्वार्थ साधण्यासाठी कोण्या साधारण मनुष्याला महात्मा समजून त्याच्या पायी लागतात. थोर महात्मे मिळणे दुर्लभ योग आहे आणि जर सापडले तर त्यांना ओळखणे अधिकच कष्टप्रद होय.

ज्यांचा संग अमोघ, ज्यांच्या दर्शनाने, भाषणाने व आचरणाने जो प्रभावित होतो, तो 'महात्मा' समजावा. परमेश्वराची सदैव स्मृती, विषयांपासून वैराग्य, सत्य, न्याय व सदाचारात प्रीती, चित्तात प्रसन्नता, शांती इत्यादी सद्गुण महात्म्यांजवळ असतात. परंतु पाखंडी लोकही वरील गुणांचे पालन करून लोकांना फसवू शकतात. म्हणून खऱ्या महात्म्यांना ओळखणे फार कठिण आहे.

**महात्म्यांची लक्षणे**

सर्वत्र समदृष्टी असलेले संत वा महात्म्ये यांच्या ठिकाणी राग-द्वेष यांचा अभाव असतो. संपूर्ण भूतमात्रामध्ये आत्मबुद्धी असल्यामुळे सर्वांबद्दल प्रेम असते. म्हणून सर्वांचे हित ते चिंतीत असतात. (त्यांच्या चरणी दुःखी भक्त आला की ते स्वतः दुःखी होतात, त्याचे हे कारण आहे. व नकळत त्यांच्या आशीर्वादाने भक्ताचे संकट दूर होते.) त्यांचे अंतःकरण अति पवित्र असल्यामुळे त्यांच्या हृदयी भय, शोक, उद्वेग, काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादी दोष दिसत नाहीत. तर शांती, सरळता, समता, सुहृदयता, शीतलता, संतोष व उदारता हे गुण प्रकर्षाने दिसतात. (साईबाबांची करूणामय मूर्ती वा दृष्टी भक्तांना अशीच प्रफुल्लीत, प्रेमदायक व आनंदमय दिसते की नाही? अर्थात होय.

**महात्म्यांचे आचरण**

सात्विक व्यक्तीसारखेच आचरण या महात्म्यांचे असते. तरीदेखील सूक्ष्म निरीक्षण केले असता त्यांची अवस्था आणि त्यांचे आचरण अधिक महत्त्वपूर्ण व दैदिप्यमान असते. त्यांच्या ठिकाणी असत्याला स्थान नसते. व्यक्तिगत स्वार्थही नसतो. कोणाच्या मनाला लागेल असे ते वागत नाहीत. सर्वत्र परमेश्वरी स्वरूप पाहात असल्यामुळे स्वाभाविकच सर्व जीवांच्या हितासाठीच ते झटत असतात. निःस्वार्थी भाव असल्यामुळे



त्यांची वाणी व आचरण यांचा लोकांवर अतिशय प्रभाव पडतो. त्यांचे आचरण अत्यंत हितकारी असते. म्हणून लोकही त्यांचेप्रमाणे आचरण करतात. त्यांच्या कृतीत सत्य, न्याय व ज्ञानपूर्णता असते. कधीकाळी बाह्य दृष्टीने लोकांना ते क्रोधी दिसले तरी अंतर्यामी प्रेमळच असतात. (श्रीसाईबाबांनी रागाने आपटलेला सटका डोळ्यासमोर येतो.) तसेच ते अहं व मायेपासून दूर असल्यामुळे त्यांचं वागणं पक्षपातरहित, प्रेममय व शुद्ध असतं.

**महिमा**

अशा महापुरुषांचा महिमा काय वर्णावा? ज्यांच्या केवळ पदस्पर्शाने वायुमंडल पवित्र होते, ते आपल्या प्रभावाने एखाद्या उजाड रानाचं तीर्थस्थान करतील, नंदनवन उभारतील. समर्थ स्वामींचे अक्कलकोट, गजानन महाराजांचे शेगाव आणि साईबाबांची शिरडी ही आजच्या आधुनिक युगातील भाविकांची श्रद्धास्थाने आहेत, जी महात्म्यांच्या पुण्याईने निर्माण झाली आहेत.

********

# विशुद्धावस्था

जन्म-मृत्यू मधील अंतर, यासी जीवन देती नाव।
हवे-नकोची ही तर घरघर, मर्मावरची घाव।। १ ।।
जग हे अवघे येथील कुंपण, बंधनातली धाव।
हे तर सारे असे विडंबन, ज्ञानाचाच अभाव।। २ ।।
मृत्यू कळेना जीवनातला, म्हणून जीवाची हाव।
सदा बिलगुनी राही भयाला, अंधारातील डाव।। ३ ।।
निस्पृहतेचे जीवन करिते, स्वार्थाचा पाडाव।
तेचि मृत्युला हतबल करिते, शुद्ध ठेऊनी भाव।। ४ ।।
क्षणाक्षणाला नवेच जीवन, मीपणास ना ठाव।
जिवाशिवाचे होता मीलन, दुःखाला नच वाव।। ५ ।।
राग-द्वेषा नसेच थारा, वासनेस घेराव।
तरीच करिते जीवन-धारा, प्रेमाचा वर्षाव।। ६ ।।
समभावाला इथे आसरा, कल्याणाचा गांव।
शुद्ध मनाने गाई वारा, शांतिचाच प्रभाव।। ७ ।।
ज्ञात्यापासूनी मुक्ती तियेला, भेदाचा न सराव।
झटकूनी अवघे घटक स्मृतिला, नच करिते अटकाव।। ८ ।।
विश्वची अवघे स्वयेची नटला, सत्यसृष्टिचा राव।
त्यासी तराया हवा कशाला, प्रापंचिक पडाव ।। ९ ।।

**— श्री. शाम जुवळे**
जनार्दन भुवन, ९, छबिलदास रोड,
दादर (प.), मुंबई-४०० ०२८.

# ज्ञानेश्वरांचे अभंग आणि ध्वन्यार्थ

**— श्री. पांडुरंग भाटकर**

श्री. ज्ञानेश्वरांच्या अभंगांचे हे वैशिष्ट्य आहे की, त्यांच्या अभंगांतील साध्या वाक्यांत किती व्यापक अर्थ एकवटला आहे, याचे प्रत्यंतर घडते.

**वर्षत सकळ मंगळी। ईश्वर निष्ठांची मांदियाळी।**
**अनवरत भूमंडळी। भेटतू भूता॥**

अनवरत भूमंडळी भेटतू भूता म्हणून परमेश्वरास हाक देणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या विशाल अंतःकरणाचा प्रकाश शोधण्याचा प्रयत्न करताना समोर उभं राहातं ते दयार्द्र हृदय. असिम अशा भावनांचा अविष्कार करताना उजळून येणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचा दीप एका शाश्वत तेजाची उधळण करत अंतर्मनात विलिन होते आणि पुलकित झालेले मन आळवू लागते-

**इवलेसे रोप लाविले द्वारी। त्याचा वेलू गेला गगनावरी।**
**मोगरा फुलला मोगरा फुलला। फुले वेचिता अतिभारु कळियांसी आला॥**

ज्ञानेश्वरांच्या अभंगातून व्यक्त होणारे परमेश्वर भक्तीचे, सगुणोपासनेचे निर्मळ रुप, त्याचा अखंड स्त्रोत साऱ्या अंगभर, गात्रागात्रांतून वाहू लागतो. ज्ञानोबांच्या अभंगातून व्यक्त होणारे भक्तीचे स्वरूप इतके विशाल आहे की, त्याचा वेल गगनावर गेलाय. आपल्या अध्यात्मवाणीतून याचा सुरेख अविष्कार ते येथे करतात. ज्ञानेश्वरांनी येथे योजलेले मोगऱ्याचे रुपक किती समर्थनिय आणि सुंदर आहे. मोगऱ्याचा चित्ताकर्षक, मंद, आल्हादक सुवास मनास जेवढा भावतो तेवढाच सज्जनांच्या, भक्तांच्या मनास भक्तीचा हव्यास असतो. मोगऱ्याच्या सुवासाने जेवढे मन प्रसन्न होतं तेवढंच भक्तिनेही. मोगऱ्याचे रुपक योजून ज्ञानेश्वरांनी भक्तीमार्गाचे ज्ञानी भक्तास असलेले एक वेगळेच आकर्षण प्रत्ययास आणले आहे.

ज्ञानेश्वरांच्या अभंगांचा रसिकतेने विचार करताना आपणास चटकन जाणवते की, त्यांनी आपल्या अभंगांत भक्तीचे सूत्र अत्यंत कौशल्याने, तरलतेने गुंफलेले आहे. एखाद्या सतारीचे बोल जसे लहरत जाताना मनावर लहरी उठवून जातात तद्वतच ज्ञानेश्वरांचे अभंग वाचताना भक्तिमार्गाचे एक अनाकलनिय सूत्र आपल्या अंतर्मनात एका अननुभूत जाणिवेने झंकारत जाते. एका सहज समाधीच्या, आत्मचिंतनाच्या अविरत धारांत आपण ओलेचिंब भिजून जातो. भक्त आणि परमेश्वर यातलं अद्वैतच तेथे संपतं. आणि नेणिवेच्या सहजस्फूर्त आवेशाने ज्ञानेशांचे कविमन गाऊ लागते —

**तुज सगुण म्हणू की निर्गुण रे।**

सगुण आणि निर्गुण, आकार आणि अनाकार यातलं द्वैत तेथेच संपतं. परमेश्वराशी एकरूप झाल्याची जाणिव होते. त्याच्या त्या निरामय विश्वरूपात आपलं रुप मिसळून जातं. त्या अव्यक्त विराट रुपात आपलं व्यक्त रुप सामावलं जातं. आत्मा आणि परमात्मा यांतला सुसंवाद साधला जातो आणि मग ज्ञानेश्वरांतला ज्ञानी भक्त गावू लागतो—

**रुप पाहता लोचनी। सुख झाले वो साजणी ॥**

सर्वगुणसंपन्न, निर्गुण-निराकार परमात्म्याचे रुप पाहाताच एका वेगळ्या अुर्मिने अंतःकरण अुचंबळून येते. स्वान्तसुखाच्या,आत्मानंदाच्या, परमेश्वरस्वरुपी एकरुप झाल्याच्या आनंदलहरींनी मन वेडावून जाते. आत आणि बाहेर या ब्रम्हानंदाच्या अखंड सरी कोसळू लागतात. त्या अविरत धारांत ओलाचिंब होवून तो भक्तिरसात डुंबून जातो. एक अनाकलनीय आनंद साऱ्या रोमरंध्रांतून ओसंडून जातो. ज्ञानेश्वरांतल्या भक्ताचे एक आगळेवेगळे स्वरूप आपणास येथे दिसते.

अमृतानुभव लिहिणारे तत्वज्ञानी मन, ज्ञानेश्वरी लिहिणारे योगी मन आणि अभंग लिहिणारे एका वेगळ्या आत्मानुभूतीत रममाण होवून जीवनसर्वस्व अर्पिणारे मन यांचा सुंदर आविष्कार ज्ञानेशांच्या या अभंग रचनेत दृगोचार होतो. भाषासौष्ठव, भाषाप्रौढी व भाषाविलास यांचे सम्यक दर्शन ते आपणास घडवितात आणि प्रपंचातून परमार्थाचा एक मोठा मंत्र देवून जातात. ज्ञानेशांचा 'नीतिबोध' अतिशय सुरेख असा त्यांच्या अभंगात व्यक्त होतो.

**अवघाची संसार सुखाचा करिन। आनंदे भरिन तिन्ही लोक ॥**

असे सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांचे ब्रीद येथे ठायीठायी व्यक्त होताना दिसते आणि मन मोहून जाते.

'चिद्विलास' हा ज्ञानेशांच्या अभंगांचा प्राण आहे. चित्‌शी विलासाचे सूत्र गुंफून त्यांनी येथे परमेश्वराशी सुसंवाद साधला आहे. त्यांच्या विराण्यांतून याचा सुंदर, रमणिय अविष्कार दिसतो —

**घणु वाजे घुणघुणा। वारा वाहे रुणझुणा।**
**भवतारकु हा कान्हा। वेगी भेटवा का ॥**

परमेश्वरास कृष्णरुपात कल्पून येथे त्याच्या भेटीची तळमळ, ओढ विरहिणीच्या व्यथेतून साकारली आहे. येथे वेगवेगळ्या नादसंवेदनांतून ही व्यथा अधिकच तिव्र होत जाते आणि कृष्ण भेटीची उत्कंठा अधिकच ताणली जाते. तेव्हा अधिर झालेले मन गाऊ लागते —

**कान्हो वनमाळी। वेगी भेटवा का ॥**

अकल्पिताचा स्पर्श झालेल्या संवेदनशील भावनांचे तरल चित्र डोळ्यांसमोर सरकून जाते आणि शिणलेल्या मनाने एक ओलागार स्पर्श अनुभवत पापण्यांचे काठ नकळत मिटतात.

विरहिणीची व्यथा सांगताना तीला अचानक दृष्यमान होणारे त्या अनादी-अनंताचे चित्रही ते रेखाटून जातात —

**पांडुरंग कांती, दिव्यतेज झळकती।**

असिम तेजाने अुजळलेले ते रुप मनात साठवताच येत नाही. तो तिच्याकडे पाहून हसतो, हसून तीला बोलावतो आहे. आणि ती आसुसलेल्या नेत्रांनी ते अवर्णनिय, तेजस्वी, दिप्तीमान रुप नजरेने पिण्यातच दंग झाली आहे. स्वतःचे भान, अस्तित्व विसरून परमेश्वरचरणी लीन होण्याचा भाव एका वेगळ्या प्रतिमेतून ते साकारतात आणि एक अननुभूत चैतन्याने कणनकण फुलून येतो. ते कैवल्य आपल्यासमोर उभे राहाते

आणि आपण वेडावून ते रुप पाहाण्यातच दंग होतो. आणि त्याचे, त्या रुपाचे वर्णन करायला शब्दच अपूरे पडतात —

**तुझिये निढळी कोटिचंद्र प्रकाशे।**
**कमळनयन हास्यवदन हांसे॥**

त्या मोहमयी निर्गुण निराकार रुपात आपण पूर्णपणे विलिन होतो. असंज्ञ अनुभूतींच्या प्रवाहात पूर्णपणे बुडून जाते. शिल्लक राहातो केवळ निव्वळ, निखळ आनंद, शुद्ध चैतन्याचा अनुभव.

विविध शैलीने लिहिणारे ज्ञानेश्वर भक्तांच्या मनीचे गूज रेखाटताना गुरुचे माहात्म्यही वर्णन करून जातात —

**गुरु हा संतकुळीचा राजा**

असे अवचितपणे रेखाटणारे मन विविध अनुभूतींतून अभिव्यक्त होताना एक वेगळीच पातळी गाठतं आणि—

**विठ्ठल रखुमाईचे भांडणी। कोण करी बुझावणी।**
**निवृत्ताचे चरणी। शरण ज्ञानदेव॥**
**विठठल रखुमाईचे भांडणी बुझावणी कोण करणार?**

कारण, तो अस्तित्वात नाहीच. तो त्यांच्यातच विलिन होवून गेलाय. त्याला वेगळं अस्तित्वच नाही. याचे भान ठेवूनच ज्ञानेश्वर निवृत्तीनाथांचे चरणी लीन होतात.

**मनाचिये गुंती गुंफियेला शेला।**
**बाप रखुमादेवीवरु विठ्ठली अर्पिला॥**

असे म्हणणारे कवीमन आपलं सारंच सर्वस्व त्या विठ्ठलाचे चरणी अर्पण करून बसतं. अखंड भक्तिभावाचा घुमणारा हा स्त्रोत एका अनादीकालापासून विलिन होतो आणि आत्मरंगी रंगले मन तुकोबाच्या वाणीतून गावू लागते —

**आनंदाचे डोही आनंद तरंग.**

# खारकर भगिनी साईचरणी विलीन

कु. वत्सला परशुराम खारकर या ता. ८-१२-८६ रोजी व त्यांच्या अनेक वर्षे अधू अवस्थेत आजारी असलेल्या भगिनी कु. सरल प. खारकर या ता. २-१-८७ रोजी साईनिवास, सायन, मुंबई-२२. येथे निधन पावल्या. या दोन्ही भगिनी साईभक्त होत्या व त्या अधू असूनही श्री साईनाथांची सेवा करीत असत. विशेषतः कु. सरलताई या अनेक वर्षे आजारी होत्या व पोटावर पाट घेऊन त्या साईबाबांची काव्यरचना व गद्यलेखन करीत असत. आपल्या या अधू भगिनीला कु. वत्सलाताई पंगू असूनही त्यांची सेवा करीत असत. खारकर भगिनींचे अनेक लेख व कविता श्री साईलीला मधून प्रकाशित झालेल्या आहेत.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

# ऑल इंडिया साई समाजाचे यशस्वी अधिवेशन

ऑल इंडिया साई समाजाचे २३ वे अधिवेशन मैलापूर, मद्रास येथे समाजाचेच जागेत दिनांक २९-३०-३१ जाने. १९८७ रोजी साजरे करण्यात आले. भारतातील ठिकठिकाणच्या साई मंदिरांचे संस्थापक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकर्ते, प्रतिनिधी इ. मंडळी फार मोठ्या संख्येने हजर होती. अधिवेशनाचे उद्‌घाटन गुरु. ता. २९-१-८७ रोजी सायं. ७ वा. करण्यात आले. कार्यवाह श्री. मुथ्थू वेंकटरामन यांनी सर्वांचे स्वागत करणारे भाषण केले व त्यानंतर संदेश वाचन झाले.

अधिवेशनाचे उद्‌घाटन झाल्यावर "अशा अधिवेशनांचे महत्व व वैशिष्टय" या विषयावर श्री. वेंकटरामन, श्री. टी. केशवराव अध्यक्ष, ऑल इंडिया साई समाज, श्री. एम. रंगाचारी, श्री. गोपालन, श्री. नरसिंहबाबा, करूर, श्री. गोविंद बाबा, श्री. बॅनर्जी, श्री. मुदलियार, श्री. शेषाद्री, श्री. सदानंद चेंदवणकर, कार्यकारी संपादक, श्री साईलीला, डॉ. श्री.दि. परचुरे इ. ची माहितीपूर्ण व मार्गदर्शनपर भाषणे झाली.

याप्रसंगी डॉ. पी. विठ्ठल यांचे शुभहस्ते डॉ. परचुरे व सदानंद चेंदवणकर यांनी प.पू. नरसिंह स्वामीजींच्या श्लोकबद्ध नामावलीवर आधारित 'श्री साई सहस्त्र नामावली' या विष्णू सहस्त्र नामावलीचे धर्तीवर तयार केलेल्या पोथीचे रितसर प्रकाशन करण्यात आले.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमांचे सूत्रधार अध्यक्ष श्री. सदानंद चेंदवणकर हे होते. यादिवशी "ठिकठिकाणच्या साई संस्थांचे विविध उपक्रम" या विषयावर अनेकांनी भाषणे केली.

अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी श्री. जी.आर. इनामदार, मुंबईचे प्रख्यात साईभक्त हे अध्यक्ष होते. यावेळी साई संस्थांच्यावर आणखीन साई संस्थांची मंडळी बोलली. श्रीमद्‌भगवद्‌गीता व श्री साई सत्‌चरित या दोन महान ग्रंथांचा तुलनात्मक विचार मुंबईच्या एका साईभक्ताने श्रोत्यांसमोर मांडला.

दि. १ फेब्रु. म्हणजेच अधिवेशनाचे चौथे दिवशी लेखक-कवी दिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विश्वस्त समितीच्या प्रकाशन विभागाचे अध्यक्ष श्री. विश्वासराव खेर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी श्री. एम. रंगाचारी, साईबाबा संस्थान, शिरडीचे समिती सदस्य श्री. प्रकाश कारखानीस, सौ. इंदिरा खेर, श्री. केशवराव, श्री. वेंकटरामन इ. ची बोधप्रद भाषणे झाली. दुपारी श्री. रंगाचारी यांचा ते ८० वर्षांचे झाल्याबद्दल समाजातर्फे हृद्य सत्कार करण्यात आला.

या चार दिवसांचे अधिवेशनाला जोडूनच समाजाच्या मंदिरात श्री साईबाबांची सुंदर मूर्ती विधीयुक्त स्थापन करण्याचा ऐतिहासिक सोहळा समारंभही ठेवण्यात आला होता; व त्याप्रसंगी प्रचंड गर्दी समाजाचे मैलापूर येथील मंदिरात भल्या पहाटेपासून झाली होती. सबंध दिवसभर गर्दीचा ओघ चालूच होता. वाहतूकीचे खास नियंत्रणही करण्यात आले होते.

या पाचही दिवसांच्या कार्यक्रमाला भारतातून सुमारे पाचशेवर साईभक्त मंडळी हजर होती. मुंबई-महाराष्ट्रातून ५० वर साईभक्त मंडळी हजर होती. भक्तांच्या निवास, भोजन

व जलपानाची सर्व ती व्यवस्था समाजाने अतिशय चोख ठेवली होती. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या समितीतील चार सदस्य श्री. खेर, श्री. कारखानीस, श्री. गोपीनाथ कोते पाटील व कु. रेखाताई दिघे या पाचही दिवसांच्या कार्यक्रमास हजर होते. साऊथ इंडियाचे अनुप जलोटा म्हणून प्रसिद्धी मिळविलेल्या गायकाने गाईलेली साईबाबांच्या भजनांच्या ध्वनिफितीकेचे प्रकाशन कु. रेखाताई दिघे यांच्या हस्ते झाले व संस्थानला भेटी दाखल दिलेली ध्वनिफितीका संस्थान समिती सदस्य श्री. प्रकाश कारखानीस यांनी स्वीकारली. मॉरिशसचे साईभक्त श्री. ली व हैद्राबादचे साईभक्त श्री. एम. रंगाचारी यांनाही कु. दिघे यांच्या हस्ते भेटीदाखल ध्वनिफितीका देण्यात आल्या. समाजातर्फे सर्व प्रतिनिधींचा योग्य सत्कारही समाजाचे मानद चिटणीस श्री. मुथ्थु वेंकटरामन यांनी हार, श्रीफल, मानसरोवरातील जल व नऊ नद्यांचे मिश्रीत जलाची बाटली व प.पू. श्री. नरसिंह स्वामीजींनी लिहिलेल्या 'चार्टर्स ॲण्ड सेईंग्ज' या नव्यानेच प्रकाशित झालेल्या आवृत्तीची सुरेख प्रत देऊन करण्यात आला. समारंभाला साईंचे दर्शन घेतलेले डॉ. गजाननराव दाभोलकर व श्री. शंकर हरीभाऊ चौबळही हजर होते. व त्यांनी आशिर्वादपर भाषणे केली. अधिवेशन प्रसंगी दिल्लीचे साईभक्त व वेस्ट ॲण्ड टॉकीजचे मालक श्री. आर.एस. चिटणीस यांनी श्री साईचित्रांची कॅलेंडर्स प्रत्येक प्रतिनिधीला दिली. तसेच मुंबईच्या गीता प्रिंटींग प्रेसचे मालक श्री. एम.डी. राजन यांनी श्री साईबाबांचे सुंदर रंगीत चित्र वाटले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

ऑल इंडिया श्री साई समाजाचे २४ वे अधिवेशन येत्या ९, १० व ११ मे १९८७ या दिनी गरखल, कसौली, हिमाचल प्रदेश येथे भरविण्यात येत असून रौप्य महोत्सवी अधिवेशन शिरडी किंवा मद्रास येथे भरविण्यात येणार आहे.

एकंदरीत समाजाचा हा सोहळा यशस्वीपणे संपन्न झाला याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तितके थोडेच.

— **साईनंद**

# बाबांनी मला जिवदान दिले

— **श्री. सुरेंद्र कोळेकर**
सचिन इलेक्ट्रॉनिक्स,
राजापूर, जि. रत्नागिरी-४१६ ७०२.

३० नोव्हेंबर ८३... वार शुक्रवार... या दिवसाची आठवण झाली की अंगावर काटा उभा राहातो. याच दिवशी बाबांनी मला जिवदान दिले.

जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी

या बाबांच्या वचनाची मला आठवण झाली. मी माझ्या दुकानात रेडिओ-टेप दुरूस्त करत असताना माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे काम करत होतो. त्या दिवशी नजरचुकीने

लाईटचा स्वीच चालू राहिला. मी जमिनीवर उभा असताना अचानक मला शॉक लागला. त्यावेळी त्या रेडिओ टेपचे-गिऱ्हाईक तेथे उभे होते. मला शॉक लागल्याचे त्या गिऱ्हाईकाच्या लक्षात येताच ते गिऱ्हाईक दुकानाबाहेर पळाले. मला वाचवायला तेथे कुणीही नव्हते.

मी जेथे काम करतो तेथे माझ्या समोर देवाचे फोटो लावलेले आहेत. त्यात माझ्या श्री साईबाबांचा फोटो आहे. ज्यावेळी मला शॉक लागला त्यावेळी मी मनात म्हणालो की, माझं आयुष्य आता संपले. असे म्हणत असतानाच समोर बाबांचा फोटो माझ्या नजरेस पडला. त्याच वेळी माझ्या पायाचे बोट स्टुलाच्या खुराला लागले. व मी जमिनीवर न पडता अलगद स्टुलावर पडलो. जर मी जमिनीवर पडलो असतो तर मला नक्कीच जबर दुखापत झाली असती. पण माझी साई माऊली माझ्याकरिता धावत आली आणि मला जिवदान तर दिलेच शिवाय काही दुखापत होवू दिली नाही.

माझा जोडधंदा वुडकटरचा आहे. असेच एक दिवस मी बॅटम चिरत असताना माझ्या कटर मशिनचा कंडेन्सर निकामी झाला. त्यामुळे कटर मशिन बंद पडले. मी नाराज झालो. कारण मला पन्नास फुट बॅटम चिरून द्यायची होती. मी मनात बाबांना म्हणालो, बाबा माझी ही ऑर्डर आता अर्ध्यावरच राहाणार आहे. परंतु बाबांची काय ती किमया! मी बॅटम मोजली. असता ती बरोबर पन्नास फुट झाली.

●

# विष हे अमृत झाले

**— सौ. माधवी विजय देशपांडे**
८५/२, आंग्रे-निवास,
आझादवाडी, कोथरूड,
पुणे-४११ ०२९.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट! माझा दहा वर्षांचा लहानमुलगा प्रसाद याला खोकला झाला होता. नेहमीप्रमाणे औषधात उदी घालून मी त्याला दिवसांतून तीन वेळा औषध दिले. रात्रीचा डोस त्याच्या बाबांनी त्याला दिला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, त्या बाटलीत खोकल्याचे सिरप नसून कोंड्याचे औषध आहे. कोंड्याची औषधाची बाटली फुटल्यामुळे ते औषध खोकल्याच्या सिरपच्या रिकाम्या बाटलीत काढून ठेवले होते. पण त्या खोकल्याच्या सिरपच्या बाटलीवर कोंड्याच्या औषधाची चिठ्ठी लावायला मी विसरले होते. हे अक्षरशः ओरडलेच, "तू याला विष दिलेस." त्या औषधाचा वास घेतल्यानंतर माझ्या सर्व काही लक्षात आले. प्रथम त्याला ताबडतोब उदी, तीर्थ दिले व नंतर रात्री १० वाजता धावपळ करीत डॉक्टरकडे गेलो. डॉक्टर म्हणाल्या, हे विष आहे व याचा कोणताही दुष्परिणाम होऊ शकेल म्हणून तुम्ही याला उद्या शाळेत पाठवू नका व सतत त्याच्यावर लक्ष ठेवा. पण दुसऱ्या दिवशी सुद्धा त्याला काहीही त्रास झाला नाही. याचे कारण श्री साईंची उदी. ते औषध उदी घालून घेतले होते. म्हणून म्हणते, विष हे अमृत झाले। उदीचे प्राशनाने॥

# बाबांनी हाक ऐकली

— सौ. लिना आनंद भांगले
पिरामल नगर,
गोरेगाव (प.), मुंबई.

मी माझ्या मुलींना श्री साईलीलातील लेख वाचून दाखवते. त्यामुळे त्यांच्या मनात श्रीबाबांबद्दल भक्ती निर्माण झाली आहे.

रविवारी ता. ३० सप्टेंबर ८५ रोजी माझ्या मोठ्या मुलीचे चि. पिंकीचे अपेंडिक्सचे ऑपरेशन झाले. ती आठ वर्षाची आहे. आम्ही सर्व घाबरून गेलो होतो. पण श्रीबाबांच्या कृपेमुळे ऑपरेशन व्यवस्थित पार पडले. दोन दिवस ती तरतरीत वाटली. त्यानंतर मात्र तिला रात्री पासून उलट्यांचा त्रास सुरू झाला. दर दोन मिनिटांनी उलट्या! औषध दिलं की, तेही उलटून जायचं. उलटी थांबावी म्हणून बर्फ चोखायला दिला तरी बर्फाचे पाणी उलटून जायचे. माझा जप चालू होता. चि. पिंकीला विभूती लावली. बाबांचा फोटो उशीजवळच ठेवला होता. रात्र अशीच संपली. सकाळी डॉक्टर आले. त्यांनी नर्सना पिंकीच्या नाकात ट्यूब घालण्यास सांगितले. हे ऐकून आम्ही आणखीच घाबरलो.

चि. पिंकी खूप भित्री. टी.व्ही. वर काही ऑपरेशन वगैरे दाखवले जात असेल तर ती डोळे मिटते. म्हणून तिचे ऑपरेशन झाले हे आम्ही तिला कळू दिले नव्हते.

पण बुधवारी सकाळी तिने जे धैर्य दाखविले ते पाहून हृदय हेलावले. मी साईबाबांना विनवत होते, 'तिला सहनशक्ती द्या.' रात्रभर उलट्यांनी हैराण आणि त्यातच आता नाकात नळी. त्यामुळे चि. पिंकी घाबरली होती. "मी तुम्ही सांगाल ते करीन, पण तुम्ही नळी हळूहळू घाला" ती नर्सना विनवू लागली. त्याचवेळी वॉर्डबाय येऊन रक्तपासणी व सलाईनसाठी तिच्या हाता-पायाकडील शिरा शोधण्याकरिता सुई टोचू लागले. ते दृश्य अंगावर शहारे आणणारे होते. साईबाबा... साईबाबा मला वाचवा, मला वाचवा! चि. पिंकीने आर्त हाका मारायला सुरुवात केली. तिला हे सर्व सहनशक्तीबाहेरचं होतं. कुणालाच ते पाहवेना. सर्वांच्या डोळ्यात पाणी आले. तो प्रसंग आठवला की आतासुद्धा डोळ्यात पाणी येते व अंगावर काटा उभा राहतो. नाकात नळी घातल्यावर पोटातली घाण थोडी थोडी करून बाहेर काढण्यात आली. त्यामुळे उलट्या बंद झाल्या. हळूहळू तिला आराम वाटत गेला. चि. पिंकीने साईबाबा, साईबाबा म्हटलेले बाजूच्या रुग्णाच्या नातेवाईकांनी ऐकले होते. त्यांनी दुपारी शिर्डीचा प्रसाद आणून दिला. त्याच दिवशी शिर्डीहून तो कुणीतरी आणला होता. तसेच साईबाबांची अंगठी व फोटोही आणून दिला व तिला म्हटले, 'बाबांवर श्रद्धा ठेव, तू लवकर बरी होशील.' चि. पिंकी म्लान हसली व तिने ती अंगठी लगेच बोटात घातली. तिच्याच मापाची होती ती! बाबांनी तिची हाक ऐकली.

त्यानंतर घरी थोडे दिवस विश्रांती घेतल्यावर तिला शाळेत पाठवले. तिचा वर्ग (सर्व ३ रीचे वर्ग) तिसऱ्या मजल्यावर असल्यामुळे आम्हाला काळजी वाटत होती. पण शाळेत गेल्यावर समजले की तिचा 'अ' वर्ग फक्त दुसऱ्या बिल्डींगमध्ये पहिल्या मजल्यावर बदलण्यात आला आहे. ही त्या साईंचीच कृपा!

# बाबा, पुन्हा कधी हो येणार?

— कु. तेजस्विनी दामोदर तारळेकर एम.ए.
कृष्ण कुंज, घ.नं. १७०९,
'ई' वॉर्ड, राजारामपुरी,
७ वी गल्ली, कोल्हापूर.

साधारणपणे दीड-दोन वर्षांपूर्वीची ही घटना. आमच्या घरी-दारी श्रीसाईबाबा तरुण फकीराच्या रुपात येऊन गेले. ती घटना अशी —

दररोजची काही साधना म्हणा वा उपासना म्हणा बाबा मजकडून करवून घेत असतात. त्यात वाचन, जमल्यास श्रवण, जप, पूजा, स्तोत्रे इत्यादिंचा समावेश होतो. अशीच श्री. र. श्री. पुजारी लिखित श्रीसाईमहात्म्य मी रात्रीच्या निवांत वेळी एकटीच वाचत होते. त्यावेळी वाचन सुरू असतानाच बाबांचा स्पष्ट आवाज माझ्या कानी आला, "मी सोमवारी तुझ्या घरी येणार आहे." तो दिवस गुरुवार वा शुक्रवार असावा. मी अतिशय आनंदित झाले आणि सोमवारची वाट पाहू लागले.

घरातील सर्वांना मी बाबा येणार हा शुभसमाचार देवून ठेवला होता. सोमवार उजाडला. आम्ही सर्वजण बाबांच्या शुभागमनाची वाट पाहत होतो. दररोजचे सारे व्यवहार रोजच्यासारखे सुरू होते, पण लक्ष बाबांच्या आगमनाकडे होते. मी मनाने अत्यंत आनंदी होते, परंतु मला किंचित ताप आला होता. आंघोळ करावी की नाही याचा विचार करत करत शेवटी दुपारी मी आंघोळीस गेले आणि इकडे अगदी त्याच वेळी —

आमच्या गल्लीत बाबा तरुण फकीर रूपाने आले आणि भिक्षा मागू लागले. तो आवाज ऐकून माझी बहिण (सौ. शरयू भिमराव बेकनाळकर) त्यांना भिक्षा वाढण्यासाठी माडीवरून खाली गेली व रस्त्यावर जाऊन त्यांना भिक्षा वाढून आली. तिच्यापाठोपाठ ते फाटकातून आत आले आणि आमच्या दारापाशी उभे राहिले. जिन्यातून वर पाहत तिथेच उभ्या असलेल्या माझ्या बहिणीला त्यांनी विचारले, "और कौन है?"

हे सर्व घडत असताना बाबांच्या मायेचा पडदा माझ्या बहिणीच्या बुद्धीवर पडला असल्याने, 'समोर साक्षात् बाबा उभे राहून बोलत आहेत' ही जाणीव (ते येणार हे आधी माहित असताही) तिला झाली नाही. तिने सांगितले, "कोई नही!" त्या उत्तराबरोबर बाबा लगेच निघून गेले.

ही घटना घडण्यास ५/१० मिनिटे लागली असतील. तोवर मी बाथरूममध्येच होते. बाहेर आल्यावर बहिणीने सर्व सांगितले. सांगितल्याप्रमाणे बाबा दारी आले आणि माझी भेट झाली नाही. हे लक्षात आल्यावर मला खूप खूप वाईट वाटले. काहीच सुचेनासे झाले. माझी आई झोपली होती. तिही जागी झाली. थोड्या वेळाने लक्षात आले की, बाबांना शोधून तरी पाहू! आसपासच्या सर्व रस्त्यांवर हिंडून हिंडून मी शोध घेतला, पण कुठेही दर्शन घडले नाही.

घरी परतले. काहीतरी मोठा ठेवा हरवल्यासारखे अत्यंत वाईट वाटत होते. संपूर्ण

साईमहात्म्य एका बैठकीत वाचून काढायचे आधी मनात ठरवले होते. ते लगेच वाचायला बसले. मनच लागत नव्हते. आधी सांगितल्याप्रमाणे बाबा दारी येऊनही भेट झाली नाही ही चुटपुट वाटत होती. हृदय पिळवटून मला रडूच कोसळले. अक्षरशः रडतरडत मी पोथी वाचत होते. श्री. प. पू. डोंगरे महाराज सांगतात, "हँसना हो तो भगवान के लिए हँसो, और रोना हो तो भगवान के लिए रोओ!" तशी त्यादिवशी मी माझ्या भगवानासाठी - बाबांसाठी रडत होते.

नंतर पुढेपुढे विचार करीत असताना मला माझ्या चुका कळत गेल्या. त्यादिवशी सकाळपासून मी बाबांच्या भेटीसाठी इतर काहीही न करता बाबांचा जप, स्मरण, चिंतन, वाचन, श्रवण करत राहवयास हवे होते. पण मी मात्र ही मनाची तयारी न करता आंघोळ करून देहाच्या स्वच्छतेच्या कर्मकांडात अडकून पडले. असो.

त्यानंतर आजपर्यंत बाबांनी माझी भक्ति वाढविली आहे, दिवसेंदिवस वाढवत आहेत. इच्छा, स्मरण होईल तेव्हा छबीरूपाने घरी येणे, उदीप्रसाद येणे, वारंवार दर्शन, त्यांच्या अस्तित्वाची जाणीव, स्वप्नदर्शन, पुजेत, सेवेत अधिक आनंद येणे हे सर्व घडते आहे. तरीही मी बाबांच्या पुनरागमनाची वाट पाहते आहे. त्यांची भेट व्हावी यासाठी उत्सुक आहे. सांगा ना हो बाबा, पुन्हा कधी येणार?

# कल्पतरू

**— सौ. जयवंती महादेव कदम**
बी.ई.एस.टी., महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,
२९/२३९, गोरेगाव (प.), मुंबई.

अनंत कोटी ब्रम्हांड नायक राजाधिराज योगीराज सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय! ही वचने रोज आमच्या मुखी असतात, ह्या वचनांचे आम्ही मनापासून नित्य चिंतन करतो. त्यामुळेच आमचे जीवन सुरळीत चालले आहे. गेली बारा वर्षे मी साईबाबांची नित्यनेमाने पूजा करीत आहे. म्हणूनच मी माझ्या चार मुलांचे विवाह व्यवस्थित पार पाडू शकले.

माझी मुलगी मंदा हिला तिच्या विवाहा नंतर नोकरी मिळाली. परंतु नोकरीत कायम करण्याच्या वेळी अनंत अडचणी येऊ लागल्या. त्या सर्व अडचणींना तोंड देताना मी साईबाबांचे नाव घेत असे. बाबांच्या कृपेने चि. मंदाचे नोकरीमध्ये व्यवस्थित चालले आहे. तिला रहाण्यासाठी स्वतःचे घर नव्हते; तेही मिळाले.

माझी दुसरी मुलगी सुनंदा हिला बँकेचा कॉल आला. परंतु तिची परिक्षेची तारीख चुकल्याने ती ठरलेल्या वेळी परिक्षेला बसू शकली नाही. मी साईबाबांचा धावा केला आणि काय आश्चर्य! तिची परीक्षा घेण्यात आली व ती त्या परिक्षेत पासही झाली. आता तिचे लग्न झाले असून ती सुखात आहे. अशीच बाबांची कृपा सर्वांवर राहो हीच त्यांच्या चरणी प्रार्थना!

सरते शेवटी बाबांच्या भावपूर्ण प्रेमळ लेकरासाठी 'बाबांचा एक पैसा' कवनरूपाने साईचरणी विनम्रपणे सुपूर्द करते.

बाबांच्या पायरीशी
बसू या अवघे जन।
साईंच्या कृपेसाठी
लांचावे अमुचे मन ॥ १ ॥

बाबांसी पहावया
होऊ या निष्ठावन्त।
श्रद्धेने हाक देता
साई उभे मूर्तिमन्त ॥ २ ॥

निष्ठेचे नाणे एक
अर्पूया त्यांचे पायीं।
दक्षिणेच्या बहाण्याने
चहूंकडे पाहू साई ॥ ३ ॥

कौतुकाचा पैसा तोहि
साईंनीच आम्हा दिला।
पहावया पुन्हा पुन्हा
बाबांनी मागुनि नेला ॥ ४ ॥

असे कसे बाबा तुम्ही
खेळता न्यारा खेळ?
धुंडता सापडेना
एक पैसा सारा वेळ! ॥ ५ ॥

खेळातच हरपते
साईची प्रिया वेडी।
गवसता साई खुणा
हांसते घडी घडी ॥ ६ ॥

साईकृपेनेच बोले
बाबांची लेक वेडी।
देसाई शालिनीची
सुटते बन्धन बेडी ॥ ७ ॥

# तुझे गीत गाण्यासाठी साई तुझ्या दारी आलो

तुझे गीत गाण्यासाठी साई तुझ्या दारी आलो
तुझे हास्य पाहताच मी हर्षभरित झालो
मनाच्या दर्पणी भोळा भाव ठेवूनी राहिलो
तुझ्या मंदिरी भक्ती सोहळा पाहण्यास आलो

खेळ तुझा मला आकळेना मी मंत्र मुग्ध झालो
भाव अंतरी दाटले कर जोडूनी उभा ठाकलो
तुझ्या चिंतनी साई मी अहर्निश रंगलो
तुझे गीत गाण्यासाठी साई तुझ्या दारी आलो

जगाचे भान न उरले मी आज साईमय झालो
सारे काही तुला देऊनी तुझा होऊनी गेलो
साई तव चरणी नतमस्तक होऊनी राहिलो
तुझे गीत गाण्यासाठी साई तुझ्या दारी आलो

**— श्री. रमाकांत पंडित साईदासानंद**
प्रभा स्मृती, १ ला मजला,
भाऊ दाजी रोड, माटुंगा (पूर्व), मुंबई-४०० ०१९.

# 'नको नको चित्ता गुंतू मायाजाळी'

**श्री. वि. म. हटवार**
१४९, रेशीमबाग,
नागपूर-९.

उल्हासें पूजा करून, स्मरावा श्रीसाई
अंतकाळी तैसा संकटाचे वेळी
अंतर्बाह्य सदा तयासी सांभाळी
संत सज्जनांनी घेतली प्रचिती

आपल्या देशातील व विदेशांतील भारतीय श्रीसाईनाथांस मानतात. घरातील कुठल्यातरी भिंतीवर किंवा पूजास्थानी श्रीसाईंची प्रतिमा ठेवून ,साईप्रेम व्यक्त करतात. भारतीय परम्परेचा सर्वांना अभिमान आहे. पवित्र परंपरेचा पाईक होण्याची पात्रता अंगी यावी म्हणून सर्व साईभक्त प्रत्येकाशी सौजन्याने वागतात. साईनिष्ठा राखण्याची प्रतिज्ञा करतात. सर्वांचे कल्याण व त्यांची समृद्धी ह्यांतच साईभक्ताचे सौख्य सामावले आहे.

माणसाला नैतिक पाठ देणारे बोधपर प्रसंग वेळोवेळी श्रीसाईलीला मासिकांत मराठी व इंग्रजी आवृत्तीतून प्रसिद्ध होतात. त्याद्वारे वाचकांच्या मनावर चांगले संस्कार घडविले जातात. विविध प्रकारच्या अनुभवांतून मानवी मनातील सूक्ष्म भावनांची आंदोलने प्रगट होताना साईनिष्ठा प्रगट होते. साईकथा वाचनाने मनावर सात्विक भावनांचे संस्कार झाल्याने नैतिक निष्ठांवर विश्वास वाढतो. त्यामुळे संसाराच्या ऐन उन्हाळ्यातही सात्विकतेचा गारवा अनुभवावयास मिळतो.

मनुष्य जन्माचे सार्थक संसारात राहून परमार्थ साधण्यात आहे. मायानगरी सोडून अपेक्षीत लक्ष्य गाठण्यास परतीरी जाणे आहे. मधे ठरलेल्या मार्गावर अफाट नदीचे काळेभोरे पाणी वहात आहे. इतर नद्यांवर पूल तरी असतात, पण आयुष्याच्या नदीवर पूल बांधता येत नाही. नाव, यश, मान-सन्मान, सम्पत्ती यांचा त्याग करणे सोपे नाही, पण नामस्मरणाने लक्ष्यप्राप्ती गाठणे सोपे आहे. भगवंताचा लाभ करून घेणे मनुष्यजीवनाचा उद्देश होय. त्याकरिता पूर्णपणे साईनामात तन्मय होऊन गीतेत सांगितल्याप्रमाणे भगवत्प्रेमाचे वेड लागले पाहिजे. सद्गुरूच्या श्रीचरणाचे स्मरण नित्य ठेवणे आवश्यक आहे. 'श्रीसाईनाथा सोड बाबा या प्रपंचातून' हा भाव निर्माण झाला की परमार्थाची गोडी चाखता येते.

श्रद्धा व भक्तीभावाने शिर्डीच्या समाधी मंदिराचे चित्र डोळ्यासमोर आले तर क्षणभर मन साईचरणी स्थिर होते आणि वाऱ्याच्या झुळकेबरोबर मोगरीच्या फुलांचा सुगंधही येतो, असे वाटून प्रसन्न चित्ताने साईरामाचे चिंतन होते. निर्मळ आणि प्रसन्न मनाने चिंतन केल्यास त्याचा आनंद आल्हाददायक वाटतो.

भावनांचे पाझर फुटून स्पंदनाने डोळ्यांत अश्रु येणारी निष्ठा असेल तर आध्यात्मिक निर्मळ आनंद अनुभविता येतो. हा खरा माणुसकीचा गहिवर आहे. अंतरंगातील निष्ठा वर्णन करता येत नाही. अंतःकरणात कोंडलेल्या सत्यालाही वाचा आहे. आत्म्याच्या

रूपात परमेश्वर जागा असून ते प्रत्यक्ष तो बघतो आहे याची जाणीव पाहिजे.

महाराष्ट्रात जी गाजती दैवते आहेत त्यापैकी एक शिर्डीचे दैवत असून भारतीय संस्कृतिचे प्रतीक आहे. शिर्डीच्या साईबाबांस दैवत मानणारे असंख्य भक्त आहेत. अनेकांचे संबंध व्यावहारिक स्वरूपाचे असले तरी काही संबंधात माणुसकीचा व प्रेमाचा भाग थोडा का होईना पण असतो. शिर्डीस पहिल्यावेळी गेलो तेव्हा साईभक्तांच्या औदार्याने आणि संस्थानच्या कर्मचारी वर्गाच्या व सेवकांच्या सौजन्याने मी भारलो होतो. श्रीचरणी लीन होण्यास माझे अंतर्मन मला जाणीव देऊ लागले होते. साईपूजेच्या आरतीचे शब्द माझ्या कानांत घुमत होते. मायेत चित्त गुंतवण्यापेक्षा साईसेवेत चित्त गुंतवण्याची प्रेरणा झाली. पुढे ईश्वरनिष्ठा वाढत जाऊन आध्यात्मिक लिखाणास परमहंस पुंडलिक महाराज यांनी मुर्तिजापूरास दर्शन घेताना आशीर्वाद दिला आणि तेव्हापासून ही सेवा चालू आहे. पंढरीला सगळ्या संतांनी माहेर म्हटलं आहे ना! सेवा करणाऱ्या प्रत्येकाचे कुठेतरी माहेर असते. त्या ठिकाणी जाऊन व्यक्ती आपले सुख किंवा दुःख व्यक्त करते. काहींना उभ्या आयुष्यात कुठेही सहानुभूती लाभली नसते.

जीवनात पुढे उपयोगी पडतील अशी वळणे आपल्या तरुणपणात लावली नाहीत तर पुढे पश्चात्ताप होतो. दुर्बल मन वाईट व्यसनांच्या आहारी लवकर जाते. प्रत्येकाने सत्प्रवृत्त समंजस व पापभीरू बनून मायेतून मुक्त होण्याचा प्रयत्न करावा, अशांना सात्विक आनंद उपभोगता येतो.

## सत्यशिल साई माझे

'सत्यशिल साई माझे, तुम्ही दिव्य ज्योती'
तुम्ही प्रेरणा तेजाची नित् स्वयं प्रकाशी ॥धृ० ॥
घन चिंतेचे जरी दाटूनी येती, परि परिसा किमये क्षणार्ध निवती ।
अहाऽऽ वर्णावी प्रिती जैसे दुग्ध धृत लोणी ॥ १ ॥
सत्यशिल साई माझे....

काम, क्रोध, मद, लोभ, विरहित विरक्त मम साई
प्रेमभावे परि पुष्पांची एक आस उरी ॥ २ ॥
सत्यशिल साई माझे....

असो कुणी किती दुःखी, अथवा जर्जरी
स्नेहशील हस्ते कैसा काया-कल्प होई ॥ ३ ॥
सत्यशिल साई माझे...

— श्री. गुरुनाथ शां. मालडीकर
३८ बी कोटवाला चाळ,
बॉम्बे डाईंग मिलसमोर,
न्यू प्रभादेवी रोड, मुंबई -४०० ०२५.

# सर्वसाक्षी श्रीसाईबाबा

— सौ. उषा अधिकारी
बंदर रोड, रत्नागिरी.

श्री साईबाबा देहधरी असताना त्यांचे असंख्य भक्त होतें. 'जो मला भाझ्याकडे यावा असं वाटतं त्याला मी तो सातासमुद्रापलिकडे असला तरी चिमणीच्या पायाला दोर बांधून खेचून आणावे तसा मी आणीन' असं बाबा म्हणत असत आणि ते खरंही होत असे. हरीभाऊ कर्णिक हे त्यापैकीच एक! ते डहाणूचे रहिवासी होते. त्यांना श्रीसाईबाबा म्हणजे कोण? त्यांचे वास्तव्य कोठे आहे? याविषयी काहीच माहिती नव्हती. त्यांच्या घरात भाऊबंदकी सुरू झाली. त्याचा विलक्षण त्रास होऊन ते अगदी वैतागले. भाऊबंदांनी त्यांच्यावर निष्कारण आळ घातला तेव्हा तर त्यांना इतका मानसिक त्रास झाला की अन्नपाणी रुचेना, झोप लागेना. त्यांना विचारांनी घेरले. त्यांची ही स्थिती पाहून एक मित्र म्हणाला, "हरीभाऊ, तुम्ही आता शिरडीला जा. सांप्रत तेथे श्री साईबाबा म्हणून महान अवलिया वास करून आहेत. ते फाटके तुटके कपडे घालतात—भिक्षा मागून खातात. असे असले तरी ते प्रत्यक्ष देवच आहेत. खऱ्याखोट्याचा निवाडा तेच करू शकतील. त्यांची लीला काय वर्णन करावी! सध्याच्या या धामधुमीच्या वाईट काळात गोरगरिबांचा, दीनदुबळ्यांचा, शरणार्थी यांचा एकमेव पाठीराखा कोण असेल तर ते फक्त साईबाबाच! खरंच माझं ऐका आणि शिरडीला जा. तेच तुम्हाला या आरोपातून मुक्त तर करतीलच शिवाय अपूर्व मनःशांती पण देतील.

मित्राचे हे अमृतमय बोल जणू काही बाबाच त्याच्या तोंडून बोललेत असे समजून हरीभाऊंनी लगेच शिरडीला जाण्याची तयारी केली. त्यांनी शिरडीच्या साईबाबांचे नाव ऐकले नव्हते- त्यांची छबी पाहिली नव्हती तरीही मित्राच्या सांगण्यावर पूर्ण विश्वास ठेऊन श्रीसाईनाम घोळवीत ते शिरडीला गेले. सकाळी दहाच्या सुमारास त्यांनी श्रीबाबांचे दर्शन घेऊन त्यांच्यापुढे विडा, सुपारी, नारळ ठेवले व एका कोपऱ्यात बसून राहिले. आजूबाजूला इतर लोकांची खूप गर्दी होती. त्यातूनही नेमके हरीभाऊंकडे पाहून श्रीबाबा म्हणाले, "तुम्ही वाड्यात जा". हरीभाऊ उठले. त्यांना बाकीचे लोक म्हणाले, "श्रीबाबांची व तुमची पूर्वीची ओळख आहे का?" हरीभाऊंनी नकारार्थी मान हलवली. तेव्हा लोक म्हणाले, "तुम्हाला वाड्यात जायला सांगतात आणि आम्हाला काहीच कसे नाही?" हरीभाऊ हसले व म्हणाले, "हे मला तरी काय माहीत? त्यांची लीला त्यांनाच ठाऊक! मी मात्र त्यांची आज्ञा पाळून वाड्यात राहाणार आहे." त्याप्रमाणे ते वाड्यात गेले व पुन्हा दोनप्रहरी दर्शनाला आले. श्रीबाबांनी हरीभाऊंच्यावर त्यांच्या भाऊबंदांनी घातलेल्या कुभांडाची कथा सांगायला सुरुवात केली व म्हणाले, "जमिनीबाबतचा तंटा आहे ना! नानाला काकांनी मारले आणि हे सर्व तुझ्या तात्यांनी केले." यापुढे बाबा काहीच बोलले नाहीत. मात्र त्यांचे बोल खरे होते हे फक्त हरीभाऊंनाच कळले. श्रीबाबा पूर्ण अंतर्ज्ञानी आहेत हे त्यांना पटले. पुढे ३/४ दिवस हरीभाऊ शिरडीत राहिले. मात्र ते

सतत चिंतेतच असत. असेच एकदा चिंताग्रस्त स्थितीत असताना श्रीबाबा त्यांना म्हणाले, "अरे, काही काळजी करू नकोस, ज्यांनी हे दुष्ट कारस्थान करविले आहे, त्यांचे सहा महिन्यात काय होईल ते बघ." श्रीबाबांच्या या सांगण्यावर हरीभाऊंनी पूर्ण विश्वास ठेवला आणि श्रीबाबांचे बोल खरे ठरले. खटल्याचा निकाल लागून हरीभाऊ निर्दोष सुटले. आता तर काय हरीभाऊंचे चित्त श्रीसाईचरणी दृढ झाले.'निर्वाणीचा सखा माझा साईराणा' असे उद्‌गार सहज त्यांच्या तोंडून बाहेर पडले.

एकदा ते शिरडीत श्रीबाबांचे दर्शन घेऊन पंढरपूरला जायला निघाले. त्यांनी कोपरगाव ते पंढरपूर तिकीट घेतले. गाडी होती दौंडपर्यंतच व कर्णिकांचे तिकीट मेलचे नव्हते. दौंड स्थानकावरून थोड्याच वेळात मेल सुटणार होती. सगळे प्रवासी स्थानकावरून निघून गेले. दिवाही गेला. हरीभाऊंना काय करावे सुचेना. त्यात भर म्हणून त्यांना शौचाला लागले. शौचकुप दूर. अंधारही खूप. पुन्हा सामानाचा प्रश्न. आता काय करावे हा विचार येताच त्यांनी श्रीबाबांचे स्मरण केले. तेवढ्यात हमालासारखा दिसणारा एक माणूस त्यांच्याजवळ आला आणि म्हणाला, "तुम्हाला शौचाला जायचंय ना! खुशाल जा. मी तुमचे सामान तर सांभाळतोच आणि पॅसेंजरचे तिकीट बदलून आणून देतो. गाडी सुटायची वेळ झालीय पण घाबरू नका. जा. माझ्यावर विश्वास ठेऊन जाऊन या." हरीभाऊ आता साईभक्तीत पूर्ण रमल्याने त्यांच्या मनात कोणताही विकल्प आला नाही. त्यांनी त्या हमालावर पूर्ण विश्वास ठेवला. आपले पॅसेंजरचे तिकीट व जरूर ते पैसे त्या हमालाजवळ देऊन ते शौचाला गेले. हमाल तिकीट ऑफिसजवळ जातोच तोच गाडी आली आणि हरीभाऊ पण निर्मळ होऊन आले. हमालाने त्यांना गाडीत बसायला खूण केली. हरीभाऊ गाडीत जाऊन बसले. गाडी चालूही झाली. डब्यातले लोक त्यांना म्हणाले, "अहो, तुम्ही तिकिटाशिवाय गाडीत कसे आलात? काय म्हणता? हमाल तिकीट आणतोय! अहो हे लोक लुच्चे असतात. तुमचे तिकीट तर गेलेच आणि पैसेही गेले." यावर हरीभाऊ नसुते हसले. आपले बाबाच हमालाचे रूप घेऊन आलेत आणि ते आपली सर्व सोय लावतील ही त्यांची खात्री होती. त्याप्रमाणे तो हमाल खरंच धावत धावत आला, खिडकीतून त्याने हरीभाऊंना मेलचे तिकीट दिले व स्वतः गर्दीत दिसेनासा झाला. हरीभाऊंना जो प्रेमाचा गहिवर आला त्याचे वर्णन काय करावे?

याच हरीभाऊंची सून अंधेरीला माघारपणाला म्हणून गेली, तिथे तिला वेडाचा झटका आला. खूप उपचार करून सुधारणा होईना तेव्हा लगेच हरीभाऊंना अंधेरीहून ताबडतोब या असे पत्र आले. गोष्ट काळजी करण्यासारखी होती म्हणून त्याच दिवशी हरीभाऊ अंधेरीला जायला निघाले. मुखी साईनामाचा जप चालूच होता. ते ज्या डब्यात बसले होते त्याच डब्यात त्यांच्या मागच्या बाजूस कफनी घातलेला एक फकीर बसला होता. तो हरीभाऊंना म्हणाला, "परमेश्वराने जंगलात किती झाडे निर्माण केली आहेत ते पाहिलेस का? त्यांचा प्रत्येकाचा काही ना काही उपयोग आहे पण हे तुम्हाला काय माहित? मला मात्र सगळ्या झाडांची उत्तम माहिती आहे" असे म्हणून चालत्या गाडीतून त्यांनी हरीभाऊंना एक झाड दाखविले व म्हटले, "ते झाड पहा. नीट लक्षात ठेवा.

जो मनुष्य वेडा असेल त्याला या झाडाचा पाला वाटून त्याचा रस दिला तर तो पूर्ण बरा होतो.'' हरीभाऊंनी हे लक्षपूर्वक ऐकले व ते तंद्रीतच बसून राहिले. वांद्रा स्थानक येताच ते विचारातून जागे झाले. बघतात तर तो फकीर नाही. तो कुठे उतरला, कुठे गेला हे त्यांना शेवटपर्यंत कळले नाही. पण त्या रुपात श्रीबाबांनीच आपल्याला औषध सुचवलंय ही श्रद्धा ठेऊन त्यांनी त्या झाडाच्या पाल्याचा रस आपल्या सुनेला दिला व तीन दिवसातच तिचे वेड पार नाहिसे झाले.

एकदा हरीभाऊ शिरडीला गेले. मनात ठरविल्याप्रमाणे त्यांनी बाबांची भक्तिभावे पूजा केली. एक रुपया दक्षिणा देऊन व मनोभावे नमस्कार करून ते द्वारकामाईतून खाली उतरले. पण बाहेर येताच आणखी एक रुपया द्यावा असे त्यांच्या मनात आले व ते परत द्वारकामाईत निघाले. तेव्हा, आता पुन्हा येऊ नका, असे माधवराव देशपांडे त्यांना म्हणाले. मनातली इच्छा मनातच राहिली. हा विचार मनात येऊन हरीभाऊंना वाईट वाटले. लगेच ते काही कामासाठी नाशिकला गेले तेव्हा काळ्या रामाच्या देवळातच जाऊन दर्शन घ्यावे असे ठरवून ते तिथे गेले. त्यावेळी भक्तसमुदाय भोवती असताना नरसिंहजी महाराज त्यांच्याजवळ येऊन म्हणाले, ''माझा रुपया राहिलाय तो देऊन टाक.'' मोठ्या आनंदाने हरीभाऊंनी रुपया देऊन त्यांना प्रणाम केला. माझी साईमाऊली भक्ताचे कसे लाड पुरवील याचा काही नेम नाही, असे त्यांना वाटले.

एकदा ते शिरडीत श्रीबाबांची सेवा मोठ्या तन्मयतेने करीत होते. नंतर मध्यान्हाची आरती झाली. हरीभाऊंनी प्रसाद घेतला व पुन्हा तीन वाजता ते द्वारकामाईत गेले. तेव्हा श्रीबाबा म्हणाले, ''आता वर येऊ नका, ताबडतोब घरी जा. वाटेत कुठेही थांबू नका.'' श्रीबाबांची आज्ञा प्रमाण मानून कुठेही न थांबता ते डहाणूस आले, तो त्यांची लाडकी नात आदल्या दिवशी मरण पावल्याचे त्यांना समजले. आपल्या सर्वसाक्षी, अंतर्ज्ञानी, दयासागर साईबाबा खरोखरच परमेश्वर आहेत. हे सर्वार्थाने हरीभाऊंना पटले आणि ते पूर्ण साईमय झाले. आणि मनाशीच म्हणाले,

''माझ्या निर्वाणीच्या सख्या श्रीसाईरंगा
माझ्या मस्तकावरी पडूं देत तुझ्या चरणगंगा ॥''

◆◆◆◆◆◆◆◆◆

# साई माझा

साई माझी माऊली
साई माझी साऊली
भक्तांची ती आऊली
साई माझा ॥१ ॥

श्रद्धा अन् सबुरी
हाच तुझा मंत्र
हाती धरी कृपाछत्र
साई माझा ॥२ ॥

अनाथांच्या नाथा
चरणी ठेविता माथा
देई आशीर्वाद सदा
साई माझा ॥३ ॥

— **श्रीमती पुष्पलता वसंतराव दाभोळकर**
सी/२३, कोकणनगर, माहीम,
मुंबई-४०० ०१६.

# साईदरबारातील नवरत्ने---६

# निष्ठावान भक्त 'श्यामा' उर्फ माधवराव देशपांडे



**श्री साईबाबांचे समवेत श्री. माधवराव देशपांडे यांचे दुर्मिळ छायाचित्र.**

संत चूडामणी भगवान श्री साईमहाराजांचे दरबारातील एक अमोल रत्न म्हणून श्री. माधवराव देशपांडे यांचा मोठ्या गौरवाने उल्लेख करावयास हवा. ते शिरडी निवासीच होते. साईमहाराज शिरडीत प्रथम आले तेव्हा माधवराव शिरडीत होते. त्यांच्या संपूर्ण वास्तव्य कालात ते शिरडी सोडून गेलेच नाहीत व महाराजांच्या निर्वाणानंतरही ते शिरडीतच होते आणि आजही त्यांची पिढी – त्यांचे वयोवृद्ध चिरंजीव श्री. उद्धवराव शिरडीतच आहेत. बाबांची सेवा ज्यांनी ज्यांनी केली त्या त्या सर्वांवर बाबांनी वरदहस्त ठेवलेला आहे. त्यांच्या घराण्याचे आजवर भले केलेले आहे. देशपांडे घराणे याला अपवाद मुळीच नाही.

श्री साईबाबा शिरडीत आल्यावर अवघ्या पाच घरी जाऊन भिक्षा मागत असत. १) म्हाळसापती २) माधवराव देशपांडे ३) बायजाबाई ४) काशीराम शिंपी ५) नंदराम मारवाडी. ही पाच घरं नियमाने सोडून बाबांनी भिक्षेसाठी सहावं घर पाहिलं नाही. बाबांची झोळी व थाळी पसरलेली असे ती याच पाच घरांपुढे.

भिक्षेसाठी जाण्यामुळे की काय महाराजांचा व देशपांडे कुटुंबियांचा अगदी जवळचा संबंध आला व तो पुढे वाढत वाढत गेला इतका की बाबा व माधवराव एक अविभाज्य घटकच होऊन बसले.

शिरडीतील साईभक्त माधवराव देशपांड्यांना बाबांनी 'श्यामा' असे लाडके नाव ठेवले होते. त्यांच्या जिवावर आलेले संकट बाबांनी कसे काय टाळले, ही घटना खरोखरीच लक्षात घेण्यासारखी आहे. सकाळी स्नान करून पुजेचे सामान कोनाड्यातून काढीत असता लपून बसलेला साप एके दिवशी माधवरावांच्या करंगळीला चावला. त्यांचे अंग काळे निळे पडू लागले. घरातल्या मंडळींचे तोंडचे पाणी पळाले. घरातला एकजण म्हणाला,

"त्यांना विरोबाच्या देवळात नेऊन टाका. म्हणजे विष चटकन् उतरेल."

पण माधवराव विरोबाकडे जाण्यास तयार होईनात. त्यांनी निक्षून सांगितले,

"मला बाबांच्या पायाजवळ द्वारकामाईत नेऊन टाका! मग माझे तिथे काहीही होऊ द्या!"

सर्व मंडळी त्यांना लगेच घेऊन द्वारकामाईत गेली. त्याबरोबर बाबा मोठमोठ्याने शिव्या देऊ लागले व माधवरावांना वर येऊ देईनात. ते गर्जना करून म्हणाले, 'अरे, भटुरड्या! वर चढशील, तर खबरदार! चल नीघ! खाली उतर!'

बाबांचा तो अक्राळ विक्राळ अवतार पाहून बिचारे माधवराव अत्यंत निराश झाले. त्यांना वाटले, आपण आता काही जगत नाही. ते मनात म्हणाले,

"मशिद माझं माहेरघर. मी बाबांचा पोर! पण आई जर मुलावर रूसली, तर मुलानं काय करायचं!"

थोड्या वेळानं बाबांचा राग शांत झाला. माधवराव पायरीखालीच उभे होते. त्यांची परिस्थिती अक्षरशः दयनीय होती. तेव्हा बाबा त्यांना म्हणाले,

"ही उदी घे आणि आता घरी जा! सारखा येरझाऱ्या घालीत राहा. रात्रभर अजिबात झोपू नकोस. द्वारकामाई तुझे रक्षण करील."

आणि खरोखरच तसे झाले. भयंकर विषारी जनावर डसले असताना देखील माधवरावांच्या विषाला उतारा पडला व ते दुसऱ्या दिवशी खडखडीत बरे झाले. कारण बाबांनी रागाने उच्चारलेल्या शब्दात फार मोठा अर्थ भरला होता.

"चढू नको, भटुरड्या, वर! चढशील तर खबरदार. चल नीघ, जा उतर" ही वाक्ये वास्तविक त्यांनी दंश केलेल्या नागाच्या विषाला उच्चारली होती. त्यामुळे माधवरावांचे विष चढले नाही. खरोखरीच गुरुच्या वचनातील भावार्थ लक्षात घेतला पाहिजे आणि त्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. कारण संत मुखोद्गारातून निर्माण होणाऱ्या कृपेस पारावार नसतो.

श्रीसाईबाबांचे निकटभक्त श्री. माधवराव बळवंत देशपांडे यांचा जन्म यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण कुलात शके १७८२ मार्गशीर्ष शु. पंचमीच्या दिवशी नगर जिल्ह्यात संगमनेर तालुक्यात शिरडीपासून पश्चिमेस २० मैलांवर निमोण गावी झाला. माधवरावांच्या मातोश्री ह्या त्यांच्या वडिलांचे चौथे कुटुंब. पहिल्या तीनही कुटुंबांना संतती झाली नाही, म्हणून शिरडीनिवासी श्री. लक्ष्मण मामा कुलकर्णी यांच्या भगिनी यांना त्यांनी चौथे कुटुंब केले. माधवराव हे त्यांचे पहिलेच अपत्य.

माधवराव जन्मल्यावर तिसऱ्याच वर्षी माधवरावांचे वडील सहकुटुंब सहपरिवार निमोणहून शिरडीस आले. माधवरावांचे शिक्षण शिरडीसच झाले. ते मराठी पाचवी-सहावी शिकले होते. त्यांना संस्कृतचा किंवा इंग्रजीचा गंधही नव्हता. माधवरावांना काशीनाथ

बळवंत व बापाजी बळवंत असे दोन धाकटे बंधु होते.

माधवरावांची दोन लग्ने झाली. पहिल्या कुटुंबाचे नाव सौ. सावित्रीबाई. त्यांना एकच अपत्य झाले. त्याचे नाव एकनाथपंत.

माधवरावांच्या दुसऱ्या कुटुंबाचे नाव सौ. द्वारकाबाई. त्यांना श्री. जगन्नाथपंत, श्री. उद्धवराव असे दोन मुलगे व सौ. बबीताई अशी तीन अपत्ये झाली.

माधवरावांचे शरीर धिप्पाड होते. ते चांगले उंच व मजबूत बांध्याचे होते. त्यांचा वर्ण निमगोरा. त्यांची प्रकृती निकोप व निरोगी होती. त्यांचा आहार चांगला असे. वयाच्या ७२ वर्षांपर्यंत त्यांना कधी ताप आला नाही किंवा त्यांचे कधी काळी साधे डोके पण दुखले नाही.

माधवराव पूर्ण सनातनी धर्माचे होते. खाण्यापिण्यासंबंधाने त्यांचे आचरण अतिशय शुद्ध व नियमबद्ध असे. काही घरांशिवाय परक्या ठिकाणी ते कधी जेवत नसत. त्यांना स्वयंपाक उत्तम करता येत असे. त्यांना हिंदु धर्माचा खूप अभिमान होता.

माधवराव लहानपणी काही वर्षे शिरडीतील शाळेत दुय्यम किंवा मदतनीस शिक्षक म्हणून काम करीत. नंतर पुढे काही वर्षे त्यांनी बाबांच्या परवानगीने शिरडीपासून ७-८ कि. मी. अंतरावर असलेल्या अस्तगाव गावची पाटीलकी मोठ्या यशस्वीपणे सांभाळली. नंतर मरेपर्यंत वैद्यकी केली. ते नेहमी बाबांचे नाव घेऊन औषध देत व औषधात बाबांची उदी घालत. बाबांच्या कृपेने त्यांच्या हातास नेहमी यश येई. त्यांना नाडी परीक्षा चांगली असे. मोठमोठ्या नामांकित डॉक्टरवैद्यांनी हात टेकलेले रोगी ते बाबांचे नाव घेऊन बरे करत. त्यांना रोगाची व औषधाची माहिती चांगली असे. ते कुणाजवळही वैद्यकशास्त्र शिकले नव्हते, पण आर्यवैद्यकाची काही पुस्तके वाचून व बाबांच्या मुखातून आलेली नानाप्रकारच्या रोगांवरील औषधे लक्षात ठेवून ते वैद्यकीचा धंदा करीत.

माधवराव मदतशिक्षकाचे काम करीत होते. तेव्हा त्यांचा वर्ग शिरडींत श्रीद्वारकामाईसमोर श्री. गुंड सर्कल इन्स्पेक्टर यांनी बांधलेल्या घरात, काही दिवस श्रीराधाकृष्णाआई राहात असलेल्या घरात व शेवटी शेवटी बाबांच्या श्रीश्यामसुंदर वारूचे निवासस्थान असलेल्या लहानशा घरात असे. माधवराव शिक्षकांचे काम करू लागले, तेव्हा त्यांचे वय १४-१५ वर्षांचे होते. बाबा शिरडीस आले ते माधवरावांच्या देखतच आले. त्यावेळी माधवराव बाबांना एक धुनी लावून मशिदीत बसणारा व नेहमी चिलीम फुंकणारा वेडसर अल्पवयी १९-२० वर्षे वयाचा फकीर आहे, इतकेच मानीत. बाबा हे सिद्ध आहेत, संत आहेत, सगुण परमात्मा आहेत, ही भावना त्यांच्या जवळ मुळी नव्हतीच. ते बाबांकडे फक्त चिलीम ओढण्यासाठी म्हणून जात, इतकेच काय ते.

माधवरावांची पहिली १०-१२ वर्षे बाबांसंबधीच्या अशाच भावनेत गेली. पुढील १०-१२ वर्षे बाबा सत्पुरुष आहेत, अशा भावनेत गेली व बाबांचा जसजसा निकट व नित्य सहवास होऊ लागला व त्यांच्या सिद्धत्वाचे प्रत्यक्ष अनुभव येऊ लागले व इतर नानासाहेब चांदोरकरादी भक्तगणांचे हजारो मूर्तीमंत अनुभव नित्य कळू लागले, तेव्हा त्यांची पुढील २०-२२ वर्षे बाबा हे सिद्ध पुरूष असून मूर्तिमंत सगुण परमात्मा

आहेत, अशा दृढ भावनेत व बाबांच्या आज्ञाधारकपणात व भक्तवृंदांच्या सेवासुश्रुषेत गेली. त्यांनी ४२-४३ वर्षे सतत बाबांच्या निकट सहवासात काढली. नंतर बाबांच्या समाधीकालापासून अंतकाळापर्यंत २३ वर्षे त्यांनी वैद्यकीचा धंदा केला.

बाबा माधवरावांना पहिल्यापासूनच 'श्याम्या' या लाडक्या नावाने संबोधीत. बाबा पुष्कळ भक्तांना निरनिराळ्या टोपणनावांनी हाका मारीत, व सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांची ती सर्व नावे अगदी अन्वर्थक होती. 'श्याम' हे नावही अत्यंत अर्थपूर्ण आहे व त्यात अत्यंत प्रेम व एकप्रकारची जादू भरलेली आहे.

श्रीसाईबाबांचे माधवरावांच्यावर भारी प्रेम होते. कै. भक्तश्रेष्ठ नानासाहेब चांदोरकर यांच्या वडील चिरंजीवाचे लग्न ग्वाल्हेरीस झाले असता आपण लग्नास यावे, म्हणून नानासाहेबांनी बाबांना समक्ष निमंत्रण दिले, तेव्हा "माझ्या श्याम्याला घेऊन जा" असे बाबा म्हणाले व त्याप्रमाणे माधवराव लग्नास गेले.

कै. भक्तवर्य काकासाहेब दीक्षित यांनी असेच आपल्या वडील चिरंजीवाचे लग्नाकरिता बाबांना समक्ष निमंत्रण केले तेव्हाही "माझ्या श्याम्याला घेऊन जा" असे बाबा त्यांना म्हणाले व त्याप्रमाणे माधवराव लग्नास नागपुरास गेले.

एकदा काकासाहेब दीक्षित गहिवरून बाबांकडे द्वारकामाईत आले.

"काका तुला काय पाहिजे?" म्हणून बाबांनी त्यांना प्रश्न केला.

काका म्हणाले,

"बाबा आपला सहवास असावा."

बाबा म्हणाले,

"ह्या श्याम्याला आपल्या जवळ ठेवून घे, म्हणजे मी जवळच आहे."

यानंतर काका माधवरावांना बहुधा आपल्या जवळ ठेवीत असत.

एकदा बाबांचे एक भक्तशौंड श्री. बाळासाहेब मिरीकर-कोपरगावचे मामलेदार यांचा मुक्काम दौंड-मनमाड रेल्वेवरील कोपरगावनजिक चितळी गावात श्रीमारूती-रामाच्या मंदिरात असताना ते शिरडीस बाबांच्या दर्शनास आले. दर्शन केल्यावर परत चितळीत जाण्यास त्यांनी बाबांची परवानगी मागितली. बाबा म्हणाले,

"जा, पण माझ्या श्याम्याला बरोबर घेऊन जा."

बाळासाहेब बाबांच्या आज्ञेप्रमाणे माधवरावांना बरोबर घेऊन गेले. त्याच रात्री बाळासाहेबांच्या अंगावर मोठा थोरला भयंकर सर्प त्यांना नकळत चढला, पण त्याने दंश करण्यापूर्वीच बाळासाहेबांनी त्याला हातानेच लांब उडवून दिले. जवळच्या लोकांनी मग त्याचे तुकडे तुकडे केले. माधवरावांच्या सहवासामुळे व बाबांच्या कृपेने बाळासाहेब [illegible] प्राणसंकटातून बचावले.

नागपूरचे भक्त श्रीमंत बापूसाहेब बुटी माधवरावांना बाबांच्याप्रमाणेच मान देत असत.

यावरून अर्जुन-श्रीकृष्णाच्या जोडीप्रमाणे माधवराव-बाबांची जोडी होती, माधवरावांना बाबा जसे पहिल्यापासून शेवटपर्यंत 'श्यामा' म्हणून संबोधीत, तसेच माधवरावही बाबांना प्रथमपासून शेवटपर्यंत 'देवा' म्हणून संबोधीत. श्रीबाबा व माधवराव यांच्यात नेहमी

सुखसंवाद, वार्तालाप व विनोद चालत असत. माधवरावांना जरी विपुल संपत्ती दिली नाही, तरी माधवरावांवरील त्यांचे प्रेम अवर्णनीय होते यात शंकाच नाही.

ग्वाल्हेरचे माधवराव महाराज शिंदे माधवरावांना पाच हजार रुपये देत असता बाबांनी त्यांना ते घेऊ दिले नाहीत. तरीपण ऐहिक संपत्तीपासून उपभोगण्यास मिळणारे नानाप्रकारचे भोग व ऐश्वर्य ही त्यांना भोगावयास देऊन बाबांनी माधवरावांचे पुष्कळ लाड व लळे पुरविले. अति खर्चाच्या, श्रमाच्या व दगदगीच्या अशा ज्या भारतातील चार धामांच्या, श्रीद्वारका, रामेश्वर, जगन्नाथ, बद्रिनारायण, बद्रिकेदार, गंगोत्री, जन्मोत्री, श्रीकाशी, अयोध्या, गोकुळ, मथुरा, वृंदावन, गया, हरिद्वार, प्रयाग, उज्जैन, गिरनार, मातृगया, नाशिक, त्रिबंकेश्वर, गाणगापूर, अक्कलकोट, दौलताबाद, पंढरपूर, बालाजी, श्रीरंगपट्टण, कांची, कामाक्षी, मदुरा, मीनाक्षी पक्षितीर्थ इ. यात्रा विनामूल्य बाबांनी अनायासे माधवरावांना आनंदात, सुखात व ऐषआरामात कोट्याधीशांचे सहवासात करून दिल्या. हत्तीच्या अंबारीत माधवरावांना बसवून त्यांची मिरवणूक काढविली. शिंदे सरकार, जव्हार सरकार, शेट सावकार, जहागीरदार, राष्ट्रपुरुष, राजकारणी विभूती, इनामदार, मोठे मोठे सरकारी अधिकारी व सुखवस्तू लोक यांनी माधवरावांना काही प्रसंगी सन्मान्य पाहुणे बनवून माधवरावांना प्रेमालिंगन घ्यावयास लावून माधवरावांच्या पाया पडावयास लावले, या सर्व प्रसंगी माधवरावांनी बाबांची खूपखूप प्रसिद्धी केली, हीच माधवरावांची मुख्य कामगिरी म्हणावयास पाहिजे. त्यांनी रसाळ व प्रसादयुक्त वाणीने बाबांच्या लीला कथन करून अनेकांना बाबांचे भक्त बनविले.

बाबांचे रोजचे टपाल वाचून दाखविण्याचे, बाबा सांगतील त्याप्रमाणे भक्तांना पत्रांची उत्तरे लिहिण्याचे, बाबांच्या नावावर आलेल्या भक्तांच्या मनी-ऑर्डरी घेण्याचे व त्यांचे पैसे बाबांना बिनचूकपणे नेऊन देण्याचे काम काही दिवस याच माधवरावांच्याकडे होते.

श्रीबाबांच्या महानिर्वाणानंतर माधवरावांना चुकल्याचुकल्यासारखे वाटत होते व ते अगदी साहजिकच आहे. बाबांच्यानंतर श्रीमंत गोपाळराव ऊर्फ बापूसाहेब बुटी यांनी माधवरावांच्याकडे बाबांच्या समाधि मंदिराच्यावरील सर्व भागाची साफसफाई व देखरेख करण्याची कामगिरी करण्याबद्दल त्यांना बापूसाहेबांकडून महिना सात रुपये मिळत असत. बापूसाहेबांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव श्री. केशवराव यांनी हीच कामगिरी त्यांच्याकडे सोपविली होती.

श्री. माधवरावांनी आपला देह काकासाहेब दीक्षित, भाऊसाहेब धुमाळ, अण्णासाहेब दाभोलकर या पुण्यभक्तांप्रमाणे कोणत्याही प्रकारचे कष्ट न सोसता फक्त एक अहोरात्र व दुसरे दिवशी रात्री बारा वाजेतोपर्यंत बेशुद्ध स्थितीत राहून आपल्या स्वतःच्या वास्तूत शके १८६२ चैत्र कृ. चतुर्थी गुरुवार दिनांक २६ एप्रिल १९४० या पुण्यदिवशी रात्री श्रीसाईसद्गुरुमाऊलीच्या दिव्य चरणी ठेवला. त्यावेळी त्यांचे वय ८० वर्षांचे होते. श्रीसाईबाबांनी वयाच्या ऐंशीव्या वर्षी अनंतात स्वतःला विलीन केले व बाबांचा सच्छील लाडका भक्त 'श्यामा' उर्फ माधवराव देशपांडे वयाच्या ८० व्याच वर्षी निधन पावले, हा एक योगायोग आहे, असेच म्हणावे लागेल.

*माधवरावांच्या नंतर बाबांचे एक निष्ठावान सेवक व भक्त श्री. सखाराम बळवंत धुमाळ हे पण २९ जून १९४० रोजी ठाणे मुक्कामी हृदयविकाराने कालवश झाले. बाबांनी त्यांना समक्ष आश्वासन दिले होते, की तुला मी फुलासारखा ठेवीन व फुलासारखा नेईन. श्री. धुमाळसाहेब नाशिक येथे वकील होते.

★★★★★

# गोड नाम ते, 'श्री सिद्ध साई'

साईस आठवण करूनी माझे
मन जसे पुलकित झाले।
हृदयात असूनी साई माझे
डोळ्यासमोर निखरून आले।
हात जोडूनी, डोळे मिटूनी
सर्व जगास विसरूनी
साईचे स्मरण केले।
दीप लावूनी, आरती म्हणूनी
सुगंध, फुले वाहिली।
दुःख, कष्ट, चिंता मनातले
साईस सांगून टाकले।
मग पदर पसरूनी
भीक मागितली
वाट दाखवा हो साई।
चिंता क्लेश दूर झाले
मनाला जशी शांती मिळाली।
एकच इच्छा मनात असूनी
श्वास सोडावा, ते घेऊनी
श्री सिद्ध साईचे गोड नाम।
साईस स्मरूनी कोणी
दुःखी झाला आहे
दाखवा, आहे असा कोणी?

**— कु. शकुंतला नायकर**
५०/२३८४, गांधी नगर,
बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

# जे घडते ते बऱ्याकरिता

—श्री. अनिल केशवराव रसाळ
२१/३८२, बी.पी.टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई-४०० ०३७.

साईभक्तीच्या सुखद व समाधानकारक प्रवासात काही मुक्काम असे येतात की, त्यावेळी भक्तांच्या मनात शंका, कुशंका यांचे काहूर थैमान घालते. मानवी कल्पना व परमेश्वरी योजना यांच्या द्वंद्वात भक्तीचा स्थिर दिवा कदाचित विझण्याची दाट शक्यता असते. पण इथेच आपण श्रद्धा दृढ करणे फार आवश्यक असते. कारण एक प्रकारे ही आपल्या श्रद्धेची व सबुरीची अत्यंत त्रासदायक व तापदायक कसोटी असते.

भक्ती ही आपण पारमार्थिक लाभासाठीच करायची असं ठरवून केलेली असेल तर मात्र कोणताही त्रास व क्लेश होत नाही. पण हेतुपूर्वक केलेल्या भक्तीत मात्र हवं ते मिळालं नाही तर सुरुवातीला खंत वाटते, नंतर त्याचे शल्य होते व ते कायम बोचते.

माझा स्वतःचा या मार्गातील अनुभव असा आहे की, सुरुवातीला आपल्याला खेचून घेण्यासाठी श्रीबाबा अनेक चमत्कार व लीला दाखवतात, ऐहिक गोष्टींच्या खिरापतीचा प्रसाद देतात. पण कितीही केलं तरी खिरापतीचा प्रसाद हे पूर्ण जेवण होऊ शकत नाही. व त्यामुळे माणसाला कायमचे टिकाऊ समाधान मिळणार नाही.

पात्रतेनुसार श्रींचे दान असते व पारमार्थिक लाभ हा अक्षय असल्याने त्याचे मूल्य हे ऐहिक प्राप्तीच्या मूल्यांनी करायचे नसते. हा विवेक बऱ्याचशा भक्तांना नसतो. त्यामुळेच ऐहिकाचा उत्कर्ष हा पारमार्थिक प्रगतीचा एक महत्त्वाचा टप्पा समजून आपण खरे भक्त आहोत असा भ्रम काहीजण करून घेतात. या संदर्भात मला खास उल्लेख करावासा वाटतो तो नरसिंहस्वामींच्या वैयक्तिक जीवनातील एका दुःखद घटनेचा. दोन वेळा आमदारपद मिळालेले व वैयक्तिक दृष्ट्या अत्युच्च शिखरावर असलेल्या स्वामींची दोन लहान मुलं एकाच दिवशी विहीरीत बुडून मेल्यानंतर त्यांनी त्या घटनेचा अंतर्मुख होऊन विचार केला व त्यांचे असे प्रामाणिक मत झाले की, त्यांचा पारमार्थिक उत्कर्ष व्हावा यासाठी हे झाले. त्यांनी संन्यास घेतला व श्रींच्या भक्तीचा सर्व भारतात प्रसार केला. भगवंत ज्याच्यावर खरोखर प्रसन्न होतो तेव्हा त्याला सर्व प्रथम वैराग्याचे धन देतो व त्याचा कायमचा लाभ करून देण्यासाठी त्याला आपल्या सेवेची संधी देतो.

अशा प्रकारे साईबाबा भक्तांना काही गोष्टी देत नाहीत, प्रार्थना करूनही देत नाहीत. त्याचे मुख्य कारण म्हणजे अशा भक्तांची पात्रता पारमार्थिक क्षेत्रात त्यांना वाढवायची असते किंवा त्यांना असा लाभ करून द्यायचा असतो. ३२ व्या अध्यायात ऐहिक क्षेत्रात अतिशय प्रगति करून बाबा तो मानमरातब काढून फेकून देतात व म्हणतात की, ''कोणाचे देणें कोणास पुरतें'' माझ्या गुरूचे देणे हे अक्षय आहे.

याशिवाय दुसरे एक कारण असे की, देह प्रारब्ध! मानवी देह हा आपलं प्रारब्ध भोगण्यासाठी दिलेला असतो. ते संचित भोगून संपले की, पुढचा मार्ग मोकळा व

सुकर होतो. मनातील लाभ, हानी, सुख व दुःख, आशा व निराशा ही द्वंद्वे विवेकी भक्तांना संपलेली असतात व मन समाधानाच्या सागरात चिंब झालेलं असतं. हा आनंद सर्व परिस्थितीत टिकणं व साधना अखंडित चालू ठेवणं हे खऱ्या साधकाचं लक्षण आहे. साईसच्चरित्राच्या २० व्या अध्यायात मोलकरणीने विशद केलेल्या इशावास्योप निषदाचा महत्त्वाचा प्रसंग हा बोध फार सोप्या व समर्पकरितीने दाखवतो. त्यात एक महत्त्वाचे वाक्य असे की, "सुख व दुःख हे चित्ताचे विकार आहेत व भावनेच्या भिन्नत्वांतून त्याचा जन्म होतो व यासाठी निष्काम कर्मयोगाने चित्तशुद्धी करावी म्हणजे चित्त शुद्धीने हा आनंद मिळतो व सर्व परिस्थितीत समाधानाने रहाण्याची कला साधली जाते असं श्रींनी सुचवलं आहे.

म्हणूनच भक्तांनी शक्यतो फलाची अपेक्षा न धरता कर्म करावीत व त्याद्वारे "जे घडते ते बऱ्या करीता" या भूमिकेवर सतत वावरावे असे श्रींनी सुचवले आहे.

◆◆◆◆◆

# साई किर्ती

नाम घेता तुझे साईनंद हो नाम घेता तुझे साईनंद
मनी होतो माझ्या आनंद नाम घेता तुझे साईनंद ॥ धृ० ॥

द्वारका माईतील ती धुनी
धगधगती ज्वाला त्यातूनी
बाबा त्यात हात घालूनी
प्राण वाचविला हो मुलीचा नाम घेता तुझे साईनंद
मनि होतो माझ्या आनंद नाम घेता तुझे साईनंद ॥ १ ॥

सर्प विंचू विषारी प्राणि
वाघ कुत्रा असे हो प्राणी
बाबांची आज्ञा हो पाळूनी
शेपटी हालवू लागले नाम घेता तुझे साईनंद
मनी होतो माझ्या आनंद नाम घेता तुझे साईनंद ॥ २ ॥

महामारीचा आजार पळविला
दासगणूला विठ्ठल भेटविला
आंगठ्यातुन गंगा यमुना निथळू लागल्या
दास गणूना तिर्थ लाभले नाम घेता तुझे साईनंद
मनि होतो माझ्या आनंद नाम घेता तुझे साईनंद ॥ ३ ॥

— सौ. सुशिला सयाजीराव साळुंखे
२३२, गुरुवार पेठ, सातारा.

# भक्ति

— सौ. उषा चंद्रशेखर जोशी
पूर्व-६, सरस्वति कॉलनी,
औरंगाबाद-४३१ ००१.

वेदांत भक्तिचे, उपासनेचे अनेकानेक प्रकार दाखविले आहेत. सर्व सामान्य माणूस आजच्या ह्या विज्ञान युगात ते सारे प्रकार बघून तर स्तिमितच होतो. भक्ति ही विधात्याने उपजतच मानवाच्या अंतःपटलावर न मिटणारी अशी कोरून ठेवली आहे. प्रत्येकात तिचा उद्रेक होतच असतो. कुणी मातृभक्त असेल, कुणी पितृभक्त असेल, कुणी देवभक्त असेल, कुणी स्वभक्त असेल, तर कुणी गुरूभक्त असेल. पण महत्त्वाची गोष्ट अशी की, स्वतःला नास्तिक म्हणवून घेणाऱ्यांमध्येही भक्तिची 'उर्मि व भावना' ही असतेच! स्वतःला नास्तिक म्हणवून घेणाऱ्या व्यक्तिला असह्य वेदनांचा रोग असेल वा एखादी जखम होऊन त्याच्या वेदनांचा त्रास होत असेल तर कण्हताना 'आई ग! आई ग!!' असे स्वर त्याच्या तोंडून आपोआपच बाहेर पडतात. एखादा ठेचाळून पडला तर "अरे बापरे" वा भीतीदायक प्रसंगाला "बापरे" असे शब्द आपोआप बाहेर पडतात. म्हणजेच "आई-बाप" ह्यांचे विषयी सखोल हृदयात रूळत असलेल्या निष्ठेचेच हे प्रतिक नाही का म्हणता येणार? वैद्य, डॉक्टर, वकील, व्यापारी ह्यांचेशी होणारे व्यवहार कशाचे द्योतक आहेत? परस्परांवर असलेली विश्वासयुक्त भक्तिच! केवळ विश्वास फलदायक होवू शकत नाही परंतु भक्तियुक्त विश्वास निश्चितच फलदायी झाल्यावाचून राहत नाही. जेथे एकदा अनुभव घेवून ठाम मत ठरते व त्याला घट्ट चिटकून कुठल्याही अवस्थेत वृत्ती ढासळत नाही, अतुट राहते. त्याचेच नाव 'भक्ति'.

श्री. संत नामदेवांनी श्री. पांडुरंगांचे मूर्तीला जेवावयास लावले असे आपण वाचतो, ऐकतो. प्रत्यक्ष श्री. पांडूरंग मूर्ती जेवली किंवा नाही हे ज्याच्या त्याच्या मतिप्रमाणे ज्याने त्याने ठरवावे. परंतु श्री. नामदेवांना त्यांच्या भक्तिप्रमाणे श्री. पांडूरंग जेवले ह्याचे मात्र समाधान लाभले, हे नाकारता येणार नाही. भावना व श्रद्धा ह्या केवळ मनाच्या चंचलतेवर अवलंबून नसून, चित्ताचा वेध घेणारी जी उर्मी निर्माण होते, त्या भावनेची खोलवर ठसा उमटवणारी वृत्ती म्हणजे निष्ठा वा श्रद्धा अशी माझी केवळ वैयक्तिक धारणा आहे. पोथी पुराणात, वा वडीलधाऱ्या माणसांच्या बोलण्यातून आम्ही ऐकत आहोत की, "विश्वासो फलदायकः" ह्या म्हणी प्रमाणे विश्वासाने फल लाभले की विश्वास ठेवणारी व्यक्तिच श्रेष्ठ असते. कुठलेही तर्ककुतर्क वा संशय न ठेवता विश्वासाने मार्ग चालत राहिल्यानेच फल लाभते. व्यवहारात हीच बाब महत्त्वाची आहे व ती ज्याचे जवळ आहे तोच श्रेष्ठ होय. निष्कपट व विशुद्ध भावाने विश्वास ठेवून चालणारा विजय मिळविल्यावाचून रहात नाही, हे त्रिवार सत्य आहे. हे श्री सद्‌गुरु साईबाबांनी आम्हास दिले आहे ते श्रद्धा व सबुरीच्या रूपाने.

# कृपेची सावली

— कु. सुरेखा धोंडू होबळे
हळदोणवाडी-मये,
डिचोली, गोवा.

४ जून १९८५ चा तो दिवस! त्या दिवसाची आठवण झाली की आजही डोळ्यात आनंदाश्रू तरळतात. ॲपेंडिक्सचा आजार झाल्याने दि. ३ जून १९८५ रोजी मला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ४ जूनला ॲपेंडिक्स वरील शस्त्रक्रिया होती. अणि त्याच दिवशी सकाळी माझा एस.एस.सी. चा निकाल होता. मी पास होईन की नाही ह्या शंकामिश्रित भयाने मला ग्रासले होते व त्याचबरोबर मुखी साईनामाच्या जपामुळे मी उत्तीर्ण होईन अशी आशाही माझ्या मनात पल्लवित झाली होती. जर मी नापास झाले असते तर साहजिकच माझ्या शरीर स्वास्थावर परिणाम झाला असता व शस्त्रक्रिया तर त्याच दिवशी संध्याकाळी होती. म्हणून साऱ्यांनाच चिंतेने ग्रासले होते. माझ्या शेजारच्या कॉटवरील रुग्ण मुलगीही दहावीत होती. बहुदा तिचीही माझ्यासारखीच मनोवस्था झाली असावी, हे मी तिच्या चेहऱ्यावरून ताडले. तिची बहीण रिझल्ट पहावयास गेली होती. बऱ्याच उशिरापर्यंत ती न परतल्याने माझ्या हृदयाचे ठोके जोरजोरात व विद्युत वेगाने वाजू लागले. परंतु साईबाबांची कृपा होती म्हणूनच की काय तेवढ्यात आनंदाची बातमी (आम्ही दोघी उत्तीर्ण झाल्याची) घेऊन ती परतली. एवढेच नव्हे तर ॲपेंडिक्सची शस्त्रक्रियाही व्यवस्थितपणे पार पडली. अशीच साईबाबांची कृपासावली सर्वांवर राहो हीच साईबाबांच्या चरणी इच्छा!

## ग्रंथ परिचय

# ‘श्री साईनाथ काव्य मंजिरी’

श्रीमती रुक्मिणी बेंद्रे, अंमळनेर, जि. जळगांव यांनी लिहिलेला, ‘श्री साईनाथ काव्य मंजिरी’ हा काव्य संग्रह म्हणजे साईभक्तांना एक अपूर्व देणगी आहे. ह्या काव्य संग्रहात साईबाबांवरील २६ कविता असून, ह्या छोटेखानी काव्य संग्रहाची सुरुवात ‘गणेश रुपाने’ तर शेवट ‘निरोप’ ह्या कवितेने होतो. कवियत्रीने हा संग्रह आदी, मध्य, अंत ह्या सूत्रात सुरेख गुंफला आहे. ह्या संग्रहाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, यात कवियत्रीने सामाविष्ट केलेली प्रत्येक कविता लय व ताल ह्या तत्वांवर रचलेली आहे. कोणत्या कवितेचे गायन कोणत्या चालीत करावे याचाही कवियत्रीने निर्देश केलेला आहे.

★ काव्यसंग्रहाचे नाव — श्री साईनाथ काव्यमंजिरी.

★ कवियत्री — श्रीमती रुक्मिणी बेंद्रे, अमळनेर, जि. जळगाव.

★ पृष्ठे ४२.

# 'श्री साईरंगस्वाद'

श्री. पांडुरंग शंकरराव भुजबळ उर्फ श्री साईरंग महाराज लिखित 'श्री साईरंगस्वाद' हा ग्रंथ अलिकडेच प्रसिद्ध झाला आहे. मानवाचे आंतर व बाह्य जीवन सुखी, समृद्ध व समाधानी व्हायचे असेल तर विज्ञानाच्या प्रगतीला आध्यात्माची जोड असणे आवश्यक आहे. याचे प्रत्यंतर ह्या ग्रंथाचा आस्वाद घेत असताना सतत होत राहते. श्री. साईरंग महाराज यांनी गेली अनेक वर्षे ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे यांचे सूक्ष्मरितीने अवलोकन, चिंतन, मनन करून त्यांतील यशस्वी जीवनाच्या साध्यासाठी मानवाला सन्मार्गाने वाटचाल करावयास लावणारे निदर्शक सुविचार, वाक्ये त्यांनी वेचली व ती 'श्री साईरंगस्वाद' ह्या ग्रंथात संकलित केली आहेत. म्हणूनच हा ग्रंथ मानवाला जीवन जगण्याची कला शिकवितो असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. याची सत्यता पुस्तकातील, *'माणसाने माणसाचा अभ्यास करणे हाच जगातील सर्वश्रेष्ठ अभ्यास, माणसाला माणसाने जाणणे हीच जगातील सर्वश्रेष्ठ विद्या, हेच जगातील सर्वश्रेष्ठ शास्त्र, हीच जगातील सर्वश्रेष्ठ कला, हेच जगातील सर्वश्रेष्ठ ज्ञान आणि माणसाने माणसात ईश्वराचे दर्शन घेणे हीच ईश्वराची सर्वश्रेष्ठ पूजा —* स्वाद २९४' ह्या एका सुविचारावरूनच पटते. अशाप्रकारचे एकंदर ५८५ सुविचार ह्या ग्रंथात सामाविष्ट केलेले आहेत. ह्या पुस्तकास थोर विचारवंत प्राचार्य श्री. शिवाजीराव भोसले यांची प्रस्तावना लाभली आहे. परमार्थ व प्रपंच यांचा समन्वय घडवून जीवनाला पूर्णाकार देण्यासाठी दिपस्तंभ ठरणारे हे पुस्तक साईभक्तांनी संग्रही ठेवण्याजोगे असेच आहे.

★ पुस्तकाचे नाव — श्रीसाईरंगस्वाद

★ लेखक — श्री.पांडुरंग शं.भुजबळ
३७७, सोमवार पेठ, सातारा-२.

★ किंमत — १० रुपये

★ पृष्ठसंख्या — ८०

परिचय कर्ता : श्री. सुनील द. राणे

●

## रामनवमी उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीचा श्री रामनवमी उत्सव, दि. ६-४-१९८७ ते ८-४-१९८७ या कालावधीत, श्री क्षेत्र शिरडी येथे साजरा होणार आहे.

# श्री खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

'अनुवादक — साईनंद

**शुक्रवार १२-१-१९१२**

मी सकाळी लवकर उठलो आणि प्रार्थना केली. नेहमीप्रमाणे मी जेव्हा कामकाजास प्रारंभ केला तेव्हा नारायणरावांचे चिरंजीव गोविंद व बंधु भाऊसाहेब आले. ते काही वेळापूर्वी होशंगाबादहून अमरावतीला आले होते परंतु त्यांना मी व माझी पत्नी तेथे न भेटल्यामुळे ते आम्हाला पाहण्यासाठी येथे आले. आम्हाला एकमेकांना पाहून आनंद झाला व आम्ही गप्पागोष्टी करण्यास बसलो. बापूसाहेब जोग अन्य कामात व्यग्र असल्याने योगवसिष्ठाची सुरुवात आम्ही थोड्या उशिराने केली. साई महाराजांना बाहेर जाताना व पुन्हा मशिदीत परतताना आम्ही पाहिले. ते प्रसन्नमुख होते आणि त्यांनी मला आलटून पालटून चिलीम ओढण्यास दिली. त्यामुळे माझ्या अनेक शंकांचे निरसन झाले आणि मला उत्साह वाटू लागला. दुपारच्या आरतीनंतर आम्ही जेवण घेतले आणि काही मिनिटे मी विश्रांती घेतली. दिक्षितांना मशिदीत येण्यास रोजच्यापेक्षा विलंब झाल्याने नेहमी पेक्षा उशिराने त्यांनी रामायण वाचण्यास आरंभ केला. पाठ मोठा व कठीण असल्यामुळे आम्ही तो पूर्ण करू शकलो नाही. त्यानंतर साई महाराजांना आम्ही मशिदीत पाहिले. ते संगीत वाजवित होते. तेथे नाचणाऱ्या दोन मुली गात व नृत्य करीत होत्या. त्यानंतर तेथे शेजआरती झाली.

**शनिवार १३-१-१९१२**

मी सकाळी लवकर उठलो आणि काकड आरतीला उपस्थित राहिलो. साई महाराजांनी दिवसभरात कोणताच शब्द उच्चारला नाही आणि त्यांनी नेहमी ते करतात तसे योगिक चमत्कारही केले नाहीत. खांडवाचे तहसिलदार येथे आले आहेत. रंगनाथांचे योगवसिष्ठ वाचत असताना आम्ही त्यांना पाहिले. साई महाराजांना बाहेर जात असताना व पुन्हा परतत असताना त्यांना आम्ही पाहिले. तेथे काल ज्यांनी गीत म्हटले त्या मुली होत्या. त्यांच्या उत्कृष्ठ गायना बद्दल त्यांना बक्षिस म्हणून गोड पदार्थ देण्यात आले. त्यानंतर त्या निघून गेल्या. दुपारची आरती उत्साही वातावरणात पार पडली. मेघाला अद्याप बरे वाटत नाही. माधवराव देशपांडेंचे बंधु बाबाजी यांना त्यांच्या पत्नीसह न्याहारी करिता आमंत्रित करण्यात आले होते. खांडव्याचे तहसिलदार सुसंस्कृत माणसाप्रमाणे दिसतात. त्यांनी योगवसिष्ठाचे वाचन केले. दुपारी थोडी विश्रांती घेतल्यानंतर दिक्षित यांनी भावार्थ रामायणाचे वाचन केले. तो पाठ (बालकांडातील ११ वा पाठ) योग वसिष्ठाचा सारांश होता आणि तो फारच उत्कंठा वाढविणारा होता. साई महाराज जेव्हा फेरफटका मारण्यास बाहेर पडले तेव्हा आम्ही त्यांना पुन्हा बघितले. त्यांच्या मनःस्थितीत बदल झाल्यासारखे वाटत होते. कुणीतरी असे समजले असते की ते रागावले आहेत. परंतु प्रत्यक्षात ते तसे नव्हते.

**रविवार १४-१-१९१२**

मी सकाळी लवकर उठलो, माझी प्रार्थना संपविली आणि बापूसाहेब जोग आणि राम मारुती बरोबर रंगनाथांच्या वसिष्ठाचे वाचन करण्यास बसलो. साई महाराजांना बाहेर जाताना पाहून झाल्यावर आम्ही ते पुन्हा चालू ठेवले. ते परतल्यानंतर मी मशिदीत गेलो आणि पाहिले तर त्यांची स्नानाची तयारी चाललेली होती. म्हणून मी परतलो, दोन पत्रे लिहिली आणि पुन्हा गेलो. त्यांनी मला त्यांच्या करिता बापूसाहेब जोग यांनी आणलेला तिळगुळ दिला; त्यांनी बळवंताला देखील दिला. मेघाची तब्येत ठीक नसल्याने दुपारची आरती थोड्या उशिराने झाली. तीळ संक्रांत असल्याने या दिवशी खाद्यपदार्थ भरलेले ताट लोक आणतात, याला पारोस म्हणतात. त्याला उशिर झाला होता. दरम्यान आम्ही परतलो व आम्ही आमचे दुपारचे जेवण घेतले. त्यावेळी दुपारचे चार वाजले होते. त्यानंतर दिक्षित यांनी रामायण वाचले परंतु आम्ही त्यात अधिक प्रगती करू शकलो नाही. दुपारी मी जेव्हा साईबाबांकडे गेलो तेव्हा ते कुणाला त्यांच्याजवळ येऊ देत नव्हते. त्यामुळे मी बापूसाहेब जोगांच्या खोलीकडे वळलो. आणि संध्याकाळच्या नमस्कारासाठी अगदी वेळेवर पोहोचलो. खांडव्याचे तहसिलदार अजून येथे आहेत. श्री. गुप्ते हे आपले बंधु व कुटुंबिया-समवेत आले आहेत. ते म्हणतात की त्यांचा व माझे ठाण्याचे मित्र बाबा गुप्ते यांच्याशी संबंध आहे. मी त्यांच्या सोबत गप्पागोष्टी करण्यास बसलो. संध्याकाळी शेजआरती, भीष्मांचे भजन व दिक्षितांचे रामायण झाले. आम्ही अल्प प्रमाणावर मकर संक्रांतीचा सण साजरा केला.

## भीषण दुर्घटनेतून बाबांनीच वाचविले

**— श्री. विनायक लेले**

ॐ शांती सोसायटी, वसंतवाडी,

संत नामदेव पथ, डोंबिवली (पूर्व).

दिनांक १ नोव्हेंबर १९८६, वेळ सांयकाळी सुमारे ७ ते ७। वाजण्याची. आम्ही घरातील सर्व मंडळी "घरोघरी मातीच्या चुली" हे दूरदर्शनवरील नाटक पहाण्यात दंग आहोत. माझा मुलगा चिं. मयुरेष वय ७ वर्षे व चि. निखिल वय ४ वर्षे हे दोघेजण घराबाहेर फुलबाज्या व अनार इत्यादी फटाके लावत आहेत. इतक्यात माझा धाकटा मुलगा चि. निखिल याने हातातली पेटती फुलबाजी गंमत म्हणून सहज वर फेकली. त्यामुळे आकाश कंदिलाची संपूर्ण वायर जळली, कंदील पेटला व आतील वीजेचा दिवा सुद्धा स्फोट होऊन चक्काचूर झाला. जवळच माझी दोन मुले फटाके लावत होती पण दोघांना किंचीत सुद्धा लागले नाही. ही बाबांची कृपा! तसेच माझा मोठा मुलगा चि. मयुरेष हा हातातील कापडी पिशवीत फटाके घेऊन अनार लावत असता फुलबाजीची ठिणगी उडाल्यामुळे पिशवी जळली. केवळ दयेचा सागर असे माझे बाबा पाठीशी असल्यामुळेच माझा मुलगा सुखरूप राहिला. अन्यथा फटाक्याचा स्फोट होऊन भीषण दुर्घटना घडली असती याची कल्पनाच करवत नाही.

असे हे दयाघन साईबाबा सर्व प्राणीमात्रांचे रक्षण करोत हीच प्रार्थना!

# थोर महात्मे

— श्री. बबन डी. येरम
१/५, कल्याणजी देवजी चाळ,
चिरागनगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०८६.

'महात्मा' या शब्दाचा सरळ अर्थ आहे महान असा आत्मा. या सिद्धांतानुसार केवळ परमेश्वरालाच महात्मा ही संज्ञा लागू पडते वा शोभून दिसते. कारण सर्व जीवांपेक्षा केवळ ईश्वरच श्रेष्ठ आहे. म्हणून त्याचा आत्मा श्रेष्ठ आहे.

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयास्थित।

(गीता १०/२०)

'हे अर्जुना, मी सर्व प्राणीमात्रांच्या हृदयी स्थित सर्वांचा आत्मा आहे.'

परंतु जो पुरुष ईश्वरी तत्वाला जाणतो, अर्थात ईश्वर प्राप्त करतो तोही महात्माच आहे. अशा महात्म्यांचा संग दुर्लभच आहे.

दुःखाची गोष्ट ही आहे की, आजकाल काही लोक स्वार्थ साधण्यासाठी कोण्या साधारण मनुष्याला महात्मा समजून त्याच्या पायी लागतात. थोर महात्मे मिळणे दुर्लभ योग आहे आणि जर सापडले तर त्यांना ओळखणे अधिकच कष्टप्रद होय.

ज्यांचा संग अमोघ, ज्यांच्या दर्शनाने, भाषणाने व आचरणाने जो प्रभावित होतो, तो 'महात्मा' समजावा. परमेश्वराची सदैव स्मृती, विषयांपासून वैराग्य, सत्य, न्याय व सदाचारात प्रीती, चित्तात प्रसन्नता, शांती इत्यादी सद्गुण महात्म्यांजवळ असतात. परंतु पाखंडी लोकही वरील गुणांचे पालन करून लोकांना फसवू शकतात. म्हणून खऱ्या महात्म्यांना ओळखणे फार कठिण आहे.

## महात्म्यांची लक्षणे

सर्वत्र समदृष्टी असलेले संत वा महात्म्ये यांच्या ठिकाणी राग-द्वेष यांचा अभाव असतो. संपूर्ण भूतमात्रामध्ये आत्मबुद्धी असल्यामुळे सर्वांबद्दल प्रेम असते. म्हणून सर्वांचे हित ते चिंतीत असतात. (त्यांच्या चरणी दुःखी भक्त आला की ते स्वतः दुःखी होतात, त्याचे हे कारण आहे. व नकळत त्यांच्या आशीर्वादाने भक्ताचे संकट दूर होते.) त्यांचे अंतःकरण अति पवित्र असल्यामुळे त्यांच्या हृदयी भय, शोक, उद्वेग, काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादी दोष दिसत नाहीत. तर शांती, सरळता, समता, सुहृदयता, शीतलता, संतोष व उदारता हे गुण प्रकर्षाने दिसतात. (साईबाबांची करूणामय मूर्ती वा दृष्टी भक्तांना अशीच प्रफुल्लीत, प्रेमदायक व आनंदमय दिसते की नाही? अर्थात होय.

## महात्म्यांचे आचरण

सात्विक व्यक्तीसारखेच आचरण या महात्म्यांचे असते. तरीदेखील सूक्ष्म निरीक्षण केले असता त्यांची अवस्था आणि त्यांचे आचरण अधिक महत्त्वपूर्ण व दैदिप्यमान असते. त्यांच्या ठिकाणी असत्याला स्थान नसते. व्यक्तिगत स्वार्थही नसतो. कोणाच्या मनाला लागेल असे ते वागत नाहीत. सर्वत्र परमेश्वरी स्वरूप पाहात असल्यामुळे स्वाभाविकच सर्व जीवांच्या हितासाठीच ते झटत असतात. निःस्वार्थी भाव असल्यामुळे

त्यांची वाणी व आचरण यांचा लोकांवर अतिशय प्रभाव पडतो. त्यांचे आचरण अत्यंत हितकारी असते. म्हणून लोकही त्यांचेप्रमाणे आचरण करतात. त्यांच्या कृतीत सत्य, न्याय व ज्ञानपूर्णता असते. कधीकाळी बाह्य दृष्टीने लोकांना ते क्रोधी दिसले तरी अंतर्यामी प्रेमळच असतात. (श्रीसाईबाबांनी रागाने आपटलेला सटका डोळ्यासमोर येतो.) तसेच ते अहं व मायेपासून दूर असल्यामुळे त्यांचं वागणं पक्षपातरहित, प्रेममय व शुद्ध असतं.

**महिमा**

अशा महापुरुषांचा महिमा काय वर्णावा? ज्यांच्या केवळ पदस्पर्शाने वायुमंडल पवित्र होते, ते आपल्या प्रभावाने एखाद्या उजाड रानाचं तीर्थस्थान करतील, नंदनवन उभारतील. समर्थ स्वामींचे अक्कलकोट, गजानन महाराजांचे शेगाव आणि साईबाबांची शिरडी ही आजच्या आधुनिक युगातील भाविकांची श्रद्धास्थाने आहेत, जी महात्म्यांच्या पुण्याईने निर्माण झाली आहेत.

********

# विशुद्धावस्था

जन्म-मृत्यू मधील अंतर, यासी जीवन देती नाव।
हवे-नकोची ही तर घरघर, मर्मावरची घाव ।। १ ।।
जग हे अवघे येथील कुंपण, बंधनातली धाव।
हे तर सारे असे विडंबन, ज्ञानाचाच अभाव ।। २ ।।
मृत्यू कळेना जीवनातला, म्हणून जीवाची हाव।
सदा बिलगुनी राही भयाला, अंधारातील डाव ।। ३ ।।
निस्पृहतेचे जीवन करिते, स्वार्थाचा पाडाव।
तेचि मृत्युला हतबल करिते, शुद्ध ठेऊनी भाव ।। ४ ।।
क्षणाक्षणाला नवेच जीवन, मीपणास ना ठाव।
जिवाशिवाचे होता मीलन, दुःखाला नच वाव ।। ५ ।।
राग-द्वेषा नसेच थारा, वासनेस घेराव।
तरीच करिते जीवन-धारा, प्रेमाचा वर्षाव ।। ६ ।।
समभावाला इथे आसरा, कल्याणाचा गांव।
शुद्ध मनाने गाई वारा, शांतिचाच प्रभाव ।। ७ ।।
ज्ञात्यापासूनी मुक्ती तियेला, भेदाचा न सराव।
झटकूनी अवघे घटक स्मृतिला, नच करिते अटकाव ।। ८ ।।
विश्वची अवघे स्वयेची नटला, सत्यसृष्टिचा राव।
त्यासी तराया हवा कशाला, प्रापंचिक पडाव ।। ९ ।।

**— श्री. शाम जुवळे**
जनार्दन भुवन, ९, छबिलदास रोड,
दादर (प.), मुंबई-४०० ०२८.

# ज्ञानेश्वरांचे अभंग आणि ध्वन्यार्थ

**— श्री. पांडुरंग भाटकर**

श्री. ज्ञानेश्वरांच्या अभंगांचे हे वैशिष्ट्य आहे की, त्यांच्या अभंगांतील साध्या वाक्यांत किती व्यापक अर्थ एकवटला आहे, याचे प्रत्यंतर घडते.

**वर्षत सकळ मंगळी। ईश्वर निष्ठांची मांदियाळी।**
**अनवरत भूमंडळी। भेटतू भूता॥**

अनवरत भूमंडळी भेटतू भूता म्हणून परमेश्वरास हाक देणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या विशाल अंतःकरणाचा प्रकाश शोधण्याचा प्रयत्न करताना समोर उभं राहातं ते दयार्द्र हृदय. असिम अशा भावनांचा अविष्कार करताना उजळून येणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेचा दीप एका शाश्वत तेजाची उधळण करत अंतर्मनात विलिन होते आणि पुलकित झालेले मन आळवू लागते-

**इवलेसे रोप लाविले द्वारी। त्याचा वेलू गेला गगनावरी।**
**मोगरा फुलला मोगरा फुलला। फुले वेचिता अतिभारु कळियांसी आला॥**

ज्ञानेश्वरांच्या अभंगातून व्यक्त होणारे परमेश्वर भक्तीचे, सगुणोपासनेचे निर्मळ रुप, त्याचा अखंड स्त्रोत साऱ्या अंगभर, गात्रागात्रांतून वाहू लागतो. ज्ञानोबांच्या अभंगातून व्यक्त होणारे भक्तीचे स्वरूप इतके विशाल आहे की, त्याचा वेल गगनावर गेलाय. आपल्या अध्यात्मवाणीतून याचा सुरेख अविष्कार ते येथे करतात. ज्ञानेश्वरांनी येथे योजलेले मोगऱ्याचे रुपक किती समर्थनिय आणि सुंदर आहे. मोगऱ्याचा चित्ताकर्षक, मंद, आल्हादक सुवास मनास जेवढा भावतो तेवढाच सज्जनांच्या, भक्तांच्या मनास भक्तीचा हव्यास असतो. मोगऱ्याच्या सुवासाने जेवढे मन प्रसन्न होतं तेवढंच भक्तिनेही. मोगऱ्याचे रुपक योजून ज्ञानेश्वरांनी भक्तीमार्गाचे ज्ञानी भक्तास असलेले एक वेगळेच आकर्षण प्रत्ययास आणले आहे.

ज्ञानेश्वरांच्या अभंगांचा रसिकतेने विचार करताना आपणास चटकन जाणवते की, त्यांनी आपल्या अभंगांत भक्तीचे सूत्र अत्यंत कौशल्याने, तरलतेने गुंफलेले आहे. एखाद्या सतारीचे बोल जसे लहरत जाताना मनावर लहरी उठवून जातात तद्वतच ज्ञानेश्वरांचे अभंग वाचताना भक्तिमार्गाचे एक अनाकलनिय सूत्र आपल्या अंतर्मनात एका अननुभूत जाणिवेने झंकारत जाते. एका सहज समाधीच्या, आत्मचिंतनाच्या अविरत धारांत आपण ओलेचिंब भिजून जातो. भक्त आणि परमेश्वर यातलं अद्वैतच तेथे संपतं. आणि नेणिवेच्या सहजस्फूर्त आवेशाने ज्ञानेशांचे कविमन गाऊ लागते —

**तुज सगुण म्हणू की निर्गुण रे।**

सगुण आणि निर्गुण, आकार आणि अनाकार यातलं द्वैत तेथेच संपतं. परमेश्वराशी एकरूप झाल्याची जाणिव होते. त्याच्या त्या निरामय विश्वरूपात आपलं रुप मिसळून जातं. त्या अव्यक्त विराट रुपात आपलं व्यक्त रुप सामावलं जातं. आत्मा आणि परमात्मा यांतला सुसंवाद साधला जातो आणि मग ज्ञानेश्वरांतला ज्ञानी भक्त गावू लागतो-

**रुप पाहता लोचनी। सुख झाले वो साजणी ।।**

सर्वगुणसंपन्न, निर्गुण-निराकार परमात्म्याचे रुप पाहाताच एका वेगळ्या अुर्मिने अंतःकरण अुचंबळून येते. स्वान्तसुखाच्या,आत्मानंदाच्या, परमेश्वरस्वरुपी एकरुप झाल्याच्या आनंदलहरींनी मन वेडावून जाते. आत आणि बाहेर या ब्रम्हानंदाच्या अखंड सरी कोसळू लागतात. त्या अविरत धारांत ओलाचिंब होवून तो भक्तिरसात डुंबून जातो. एक अनाकलनीय आनंद साऱ्या रोमरंध्रांतून ओसंडून जातो. ज्ञानेश्वरांतल्या भक्ताचे एक आगळेवेगळे स्वरूप आपणास येथे दिसते.

अमृतानुभव लिहिणारे तत्वज्ञानी मन, ज्ञानेश्वरी लिहिणारे योगी मन आणि अभंग लिहिणारे एका वेगळ्या आत्मानुभूतीत रममाण होवून जीवनसर्वस्व अर्पिणारे मन यांचा सुंदर आविष्कार ज्ञानेशांच्या या अभंग रचनेत दृगोचार होतो. भाषासौष्ठव, भाषाप्रौढी व भाषाविलास यांचे सम्यक दर्शन ते आपणास घडवितात आणि प्रपंचातून परमार्थाचा एक मोठा मंत्र देवून जातात. ज्ञानेशांचा 'नीतिबोध' अतिशय सुरेख असा त्यांच्या अभंगात व्यक्त होतो.

**अवघाची संसार सुखाचा करिन। आनंदे भरिन तिन्ही लोक ।।**

असे सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांचे ब्रीद येथे ठायीठायी व्यक्त होताना दिसते आणि मन मोहून जाते.

'चिद्विलास' हा ज्ञानेशांच्या अभंगांचा प्राण आहे. चित्शी विलासाचे सूत्र गुंफून त्यांनी येथे परमेश्वराशी सुसंवाद साधला आहे. त्यांच्या विराण्यांतून याचा सुंदर, रमणिय अविष्कार दिसतो —

**घणु वाजे घुणघुणा। वारा वाहे रुणझुणा।**
**भवतारकु हा कान्हा। वेगी भेटवा का ।।**

परमेश्वरास कृष्णरुपात कल्पून येथे त्याच्या भेटीची तळमळ, ओढ विरहिणीच्या व्यथेतून साकारली आहे. येथे वेगवेगळ्या नादसंवेदनांतून ही व्यथा अधिकच तिव्र होत जाते आणि कृष्ण भेटीची उत्कंठा अधिकच ताणली जाते. तेव्हा अधिर झालेले मन गाऊ लागते —

**कान्हो वनमाळी। वेगी भेटवा का ।।**

अकल्पिताचा स्पर्श झालेल्या संवेदनशील भावनांचे तरल चित्र डोळ्यांसमोर सरकून जाते आणि शिणलेल्या मनाने एक ओलागार स्पर्श अनुभवत पापण्यांचे काठ नकळत मिटतात.

विरहिणीची व्यथा सांगताना तीला अचानक दृष्यमान होणारे त्या अनादी-अनंताचे चित्रही ते रेखाटून जातात —

**पांडुरंग कांती, दिव्यतेज झळकती।**

असिम तेजाने अुजळलेले ते रुप मनात साठवताच येत नाही. तो तिच्याकडे पाहून हसतो, हसून तीला बोलावतो आहे. आणि ती आसुसलेल्या नेत्रांनी ते अवर्णनिय, तेजस्वी, दिप्तीमान रुप नजरेने पिण्यातच दंग झाली आहे. स्वतःचे भान, अस्तित्व विसरून परमेश्वरचरणी लीन होण्याचा भाव एका वेगळ्या प्रतिमेतून ते साकारतात आणि एक अननुभूत चैतन्याने कणन्कण फुलून येतो. ते कैवल्य आपल्यासमोर उभे राहाते

आणि आपण वेडावून ते रुप पाहाण्यातच दंग होतो. आणि त्याचे, त्या रुपाचे वर्णन करायला शब्दच अपूरे पडतात —

**तुझिये निढळी कोटिचंद्र प्रकाशे।**
**कमळनयन हास्यवदन हांसे ॥**

त्या मोहमयी निर्गुण निराकार रुपात आपण पूर्णपणे विलिन होतो. असंज्ञ अनुभूतींच्या प्रवाहात पूर्णपणे बुडून जाते. शिल्लक राहातो केवळ निव्वळ, निखळ आनंद, शुद्ध चैतन्याचा अनुभव.

विविध शैलीने लिहिणारे ज्ञानेश्वर भक्तांच्या मनीचे गूज रेखाटताना गुरुचे माहात्म्यही वर्णन करून जातात —

**गुरु हा संतकुळीचा राजा**

असे अवचितपणे रेखाटणारे मन विविध अनुभूतींतून अभिव्यक्त होताना एक वेगळीच पातळी गाठतं आणि—

**विठ्ठल रखुमाईचे भांडणी। कोण करी बुझावणी।**
**निवृत्ताचे चरणी। शरण ज्ञानदेव ॥**
**विठठल रखुमाईचे भांडणी बुझावणी कोण करणार?**

कारण, तो अस्तित्वात नाहीच. तो त्यांच्यातच विलिन होवून गेलाय. त्याला वेगळं अस्तित्वच नाही. याचे भान ठेवूनच ज्ञानेश्वर निवृत्तीनाथांचे चरणी लीन होतात.

**मनाचिये गुंती गुंफियेला शेला।**
**बाप रखुमादेवीवरु विठ्ठली अर्पिला ॥**

असे म्हणणारे कवीमन आपलं सारंच सर्वस्व त्या विठ्ठलाचे चरणी अर्पण करून बसतं. अखंड भक्तिभावाचा घुमणारा हा स्त्रोत एका अनादीकालापासून विलिन होतो आणि आत्मरंगी रंगले मन तुकोबाच्या वाणीतून गावू लागते —

**आनंदाचे डोही आनंद तरंग.**

## खारकर भगिनी साईचरणी विलीन

कु. वत्सला परशुराम खारकर या ता. ८-१२-८६ रोजी व त्यांच्या अनेक वर्षे अधू अवस्थेत आजारी असलेल्या भगिनी कु. सरल प. खारकर या ता. २-१-८७ रोजी साईनिवास, सायन, मुंबई-२२. येथे निधन पावल्या. या दोन्ही भगिनी साईभक्त होत्या व त्या अधू असूनही श्री साईनाथांची सेवा करीत असत. विशेषतः कु. सरलताई या अनेक वर्षे आजारी होत्या व पोटावर पाट घेऊन त्या साईबाबांची काव्यरचना व गद्यलेखन करीत असत. आपल्या या अधू भगिनीला कु. वत्सलाताई पंगू असूनही त्यांची सेवा करीत असत. खारकर भगिनींचे अनेक लेख व कविता श्री साईलीला मधून प्रकाशित झालेल्या आहेत.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

# ऑल इंडिया साई समाजाचे यशस्वी अधिवेशन

ऑल इंडिया साई समाजाचे २३ वे अधिवेशन मैलापूर, मद्रास येथे समाजाचेच जागेत दिनांक २९-३०-३१ जाने. १९८७ रोजी साजरे करण्यात आले. भारतातील ठिकठिकाणच्या साई मंदिरांचे संस्थापक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकर्ते, प्रतिनिधी इ. मंडळी फार मोठ्या संख्येने हजर होती. अधिवेशनाचे उद्‌घाटन गुरु. ता. २९-१-८७ रोजी सायं. ७ वा. करण्यात आले. कार्यवाह श्री. मुथ्थू वेंकटरामन यांनी सर्वांचे स्वागत करणारे भाषण केले व त्यानंतर संदेश वाचन झाले.

अधिवेशनाचे उद्‌घाटन झाल्यावर "अशा अधिवेशनांचे महत्व व वैशिष्टय" या विषयावर श्री. वेंकटरामन, श्री. टी. केशवराव अध्यक्ष, ऑल इंडिया साई समाज, श्री. एम. रंगाचारी, श्री. गोपालन, श्री. नरसिंहबाबा, करूर, श्री. गोविंद बाबा, श्री. बॅनर्जी, श्री. मुदलियार, श्री. शेषाद्री, श्री. सदानंद चेंदवणकर, कार्यकारी संपादक, श्री साईलीला, डॉ. श्री.दि. परचुरे इ. ची माहितीपूर्ण व मार्गदर्शनपर भाषणे झाली.

याप्रसंगी डॉ. पी. विठ्ठल यांचे शुभहस्ते डॉ. परचुरे व सदानंद चेंदवणकर यांनी प.पू. नरसिंह स्वामीजींच्या श्लोकबद्ध नामावलीवर आधारित 'श्री साई सहस्त्र नामावली' या विष्णू सहस्त्र नामावलीचे धर्तीवर तयार केलेल्या पोथीचे रितसर प्रकाशन करण्यात आले.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमांचे सूत्रधार अध्यक्ष श्री. सदानंद चेंदवणकर हे होते. यादिवशी "ठिकठिकाणच्या साई संस्थांचे विविध उपक्रम" या विषयावर अनेकांनी भाषणे केली.

अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी श्री. जी.आर. इनामदार, मुंबईचे प्रख्यात साईभक्त हे अध्यक्ष होते. यावेळी साई संस्थांच्यावर आणखीन साई संस्थांची मंडळी बोलली. श्रीमद्‌भगवद्‌गीता व श्री साई सत्‌चरित या दोन महान ग्रंथांचा तुलनात्मक विचार मुंबईच्या एका साईभक्ताने श्रोत्यांसमोर मांडला.

दि. १ फेब्रु. म्हणजेच अधिवेशनाचे चौथे दिवशी लेखक-कवी दिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या विश्वस्त समितीच्या प्रकाशन विभागाचे अध्यक्ष श्री. विश्वासराव खेर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी श्री. एम. रंगाचारी, साईबाबा संस्थान, शिरडीचे समिती सदस्य श्री. प्रकाश कारखानीस, सौ. इंदिरा खेर, श्री. केशवराव, श्री. वेंकटरामन इ. ची बोधप्रद भाषणे झाली. दुपारी श्री. रंगाचारी यांचा ते ८० वर्षांचे झाल्याबद्दल समाजातर्फे हृद्य सत्कार करण्यात आला.

या चार दिवसांचे अधिवेशनाला जोडूनच समाजाच्या मंदिरात श्री साईबाबांची सुंदर मूर्ती विधीयुक्त स्थापन करण्याचा ऐतिहासिक सोहळा समारंभही ठेवण्यात आला होता; व त्याप्रसंगी प्रचंड गर्दी समाजाचे मैलापूर येथील मंदिरात भल्या पहाटेपासून झाली होती. सबंध दिवसभर गर्दीचा ओघ चालूच होता. वाहतूकीचे खास नियंत्रणही करण्यात आले होते.

या पाचही दिवसांच्या कार्यक्रमाला भारतातून सुमारे पाचशेवर साईभक्त मंडळी हजर होती. मुंबई-महाराष्ट्रातून ५० वर साईभक्त मंडळी हजर होती. भक्तांच्या निवास, भोजन

व जलपानाची सर्व ती व्यवस्था समाजाने अतिशय चोख ठेवली होती. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या समितीतील चार सदस्य श्री. खेर, श्री. कारखानीस, श्री. गोपीनाथ कोते पाटील व कु. रेखाताई दिघे या पाचही दिवसांच्या कार्यक्रमास हजर होते. साऊथ इंडियाचे अनुप जलोटा म्हणून प्रसिद्धी मिळविलेल्या गायकाने गाईलेली साईबाबांच्या भजनांच्या ध्वनिफितीकेचे प्रकाशन कु. रेखाताई दिघे यांच्या हस्ते झाले व संस्थानला भेटी दाखल दिलेली ध्वनिफितीका संस्थान समिती सदस्य श्री. प्रकाश कारखानीस यांनी स्वीकारली. मॉरिशसचे साईभक्त श्री. ली व हैद्राबादचे साईभक्त श्री. एम. रंगाचारी यांनाही कु. दिघे यांच्या हस्ते भेटीदाखल ध्वनिफितीका देण्यात आल्या. समाजातर्फे सर्व प्रतिनिधींचा योग्य सत्कारही समाजाचे मानद चिटणीस श्री. मुथ्थु वेंकटरामन यांनी हार, श्रीफल, मानसरोवरातील जल व नऊ नद्यांचे मिश्रीत जलाची बाटली व प.पू. श्री. नरसिंह स्वामीजींनी लिहिलेल्या 'चार्टर्स ॲण्ड सेईंग्ज' या नव्यानेच प्रकाशित झालेल्या आवृत्तीची सुरेख प्रत देऊन करण्यात आला. समारंभाला साईंचे दर्शन घेतलेले डॉ. गजाननराव दाभोलकर व श्री. शंकर हरीभाऊ चौबळही हजर होते. व त्यांनी आशिर्वादपर भाषणे केली. अधिवेशन प्रसंगी दिल्लीचे साईभक्त व वेस्ट ॲण्ड टॉकीजचे मालक श्री. आर.एस. चिटणीस यांनी श्री साईचित्रांची कॅलेंडर्स प्रत्येक प्रतिनिधीला दिली. तसेच मुंबईच्या गीता प्रिंटींग प्रेसचे मालक श्री. एम.डी. राजन यांनी श्री साईबाबांचे सुंदर रंगीत चित्र वाटले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

ऑल इंडिया श्री साई समाजाचे २४ वे अधिवेशन येत्या ९, १० व ११ मे १९८७ या दिनी गरखल, कसौली, हिमाचल प्रदेश येथे भरविण्यात येत असून रौप्य महोत्सवी अधिवेशन शिरडी किंवा मद्रास येथे भरविण्यात येणार आहे.

एकंदरीत समाजाचा हा सोहळा यशस्वीपणे संपन्न झाला याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तितके थोडेच.

**— साईनंद**

# बाबांनी मला जिवदान दिले

**— श्री. सुरेंद्र कोळेकर**
सचिन इलेक्ट्रॉनिक्स,
राजापूर, जि. रत्नागिरी-४१६ ७०२.

३० नोव्हेंबर ८३... वार शुक्रवार... या दिवसाची आठवण झाली की अंगावर काटा उभा राहातो. याच दिवशी बाबांनी मला जिवदान दिले.

जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी

या बाबांच्या वचनाची मला आठवण झाली. मी माझ्या दुकानात रेडिओ-टेप दुरूस्त करत असताना माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे काम करत होतो. त्या दिवशी नजरचुकीने

लाईटचा स्वीच चालू राहिला. मी जमिनीवर उभा असताना अचानक मला शॉक लागला. त्यावेळी त्या रेडिओ टेपचे-गिऱ्हाईक तेथे उभे होते. मला शॉक लागल्याचे त्या गिऱ्हाईकाच्या लक्षात येताच ते गिऱ्हाईक दुकानाबाहेर पळाले. मला वाचवायला तेथे कुणीही नव्हते.

मी जेथे काम करतो तेथे माझ्या समोर देवाचे फोटो लावलेले आहेत. त्यात माझ्या श्री साईबाबांचा फोटो आहे. ज्यावेळी मला शॉक लागला त्यावेळी मी मनात म्हणालो की, माझं आयुष्य आता संपले. असे म्हणत असतानाच समोर बाबांचा फोटो माझ्या नजरेस पडला. त्याच वेळी माझ्या पायाचे बोट स्टुलाच्या खुराला लागले. व मी जमिनीवर न पडता अलगद स्टुलावर पडलो. जर मी जमिनीवर पडलो असतो तर मला नक्कीच जबर दुखापत झाली असती. पण माझी साई माऊली माझ्याकरिता धावत आली आणि मला जिवदान तर दिलेच शिवाय काही दुखापत होवू दिली नाही.

माझा जोडधंदा वुडकटरचा आहे. असेच एक दिवस मी बॅटम चिरत असताना माझ्या कटर मशिनचा कंडेन्सर निकामी झाला. त्यामुळे कटर मशिन बंद पडले. मी नाराज झालो. कारण मला पन्नास फुट बॅटम चिरून द्यायची होती. मी मनात बाबांना म्हणालो, बाबा माझी ही ऑर्डर आता अर्ध्यावरच राहाणार आहे. परंतु बाबांची काय ती किमया! मी बॅटम मोजली. असता ती बरोबर पन्नास फुट झाली.

●

# विष हे अमृत झाले

— सौ. माधवी विजय देशपांडे
८५/२, आंग्रे-निवास,
आझादवाडी, कोथरूड,
पुणे-४११ ०२९.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट! माझा दहा वर्षांचा लहानमुलगा प्रसाद याला खोकला झाला होता. नेहमीप्रमाणे औषधात उदी घालून मी त्याला दिवसांतून तीन वेळा औषध दिले. रात्रीचा डोस त्याच्या बाबांनी त्याला दिला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, त्या बाटलीत खोकल्याचे सिरप नसून कोंड्याचे औषध आहे. कोंड्याची औषधाची बाटली फुटल्यामुळे ते औषध खोकल्याच्या सिरपच्या रिकाम्या बाटलीत काढून ठेवले होते. पण त्या खोकल्याच्या सिरपच्या बाटलीवर कोंड्याच्या औषधाची चिठ्ठी लावायला मी विसरले होते. हे अक्षरशः ओरडलेच, "तू याला विष दिलेस." त्या औषधाचा वास घेतल्यानंतर माझ्या सर्व काही लक्षात आले. प्रथम त्याला ताबडतोब उदी, तीर्थ दिले व नंतर रात्री १० वाजता धावपळ करीत डॉक्टरकडे गेलो. डॉक्टर म्हणाल्या, हे विष आहे व याचा कोणताही दुष्परिणाम होऊ शकेल म्हणून तुम्ही याला उद्या शाळेत पाठवू नका व सतत त्याच्यावर लक्ष ठेवा. पण दुसऱ्या दिवशी सुद्धा त्याला काहीही त्रास झाला नाही. याचे कारण श्री साईंची उदी. ते औषध उदी घालून घेतले होते. म्हणून म्हणते, विष हे अमृत झाले। उदीचे प्राशनाने ॥

# बाबांनी हाक ऐकली

— सौ. लिना आनंद भांगले
पिरामल नगर,
गोरेगाव (प.), मुंबई.

मी माझ्या मुलींना श्री साईलीलातील लेख वाचून दाखवते. त्यामुळे त्यांच्या मनात श्रीबाबांबद्दल भक्ती निर्माण झाली आहे.

रविवारी ता. ३० सप्टेंबर ८५ रोजी माझ्या मोठ्या मुलीचे चि. पिंकीचे अपेंडिक्सचे ऑपरेशन झाले. ती आठ वर्षाची आहे. आम्ही सर्व घाबरून गेलो होतो. पण श्रीबाबांच्या कृपेमुळे ऑपरेशन व्यवस्थित पार पडले. दोन दिवस ती तरतरीत वाटली. त्यानंतर मात्र तिला रात्री पासून उलट्यांचा त्रास सुरू झाला. दर दोन मिनिटांनी उलट्या! औषध दिलं की, तेही उलटून जायचं. उलटी थांबावी म्हणून बर्फ चोखायला दिला तरी बर्फाचे पाणी उलटून जायचे. माझा जप चालू होता. चि. पिंकीला विभूती लावली. बाबांचा फोटो उशीजवळच ठेवला होता. रात्र अशीच संपली. सकाळी डॉक्टर आले. त्यांनी नर्सना पिंकीच्या नाकात ट्यूब घालण्यास सांगितले. हे ऐकून आम्ही आणखीच घाबरलो.

चि. पिंकी खूप भित्री. टी.व्ही. वर काही ऑपरेशन वगैरे दाखवले जात असेल तर ती डोळे मिटते. म्हणून तिचे ऑपरेशन झाले हे आम्ही तिला कळू दिले नव्हते.

पण बुधवारी सकाळी तिने जे धैर्य दाखविले ते पाहून हृदय हेलावले. मी साईबाबांना विनवत होते, 'तिला सहनशक्ती द्या.' रात्रभर उलट्यांनी हैराण आणि त्यातच आता नाकात नळी. त्यामुळे चि. पिंकी घाबरली होती. "मी तुम्ही सांगाल ते करीन, पण तुम्ही नळी हळूहळू घाला" ती नर्सना विनवू लागली. त्याचवेळी वॉर्डबाय येऊन रक्तपासणी व सलाईनसाठी तिच्या हाता-पायाकडील शिरा शोधण्याकरिता सुई टोचू लागले. ते दृश्य अंगावर शहारे आणणारे होते. साईबाबा... साईबाबा मला वाचवा, मला वाचवा! चि. पिंकीने आर्त हाका मारायला सुरुवात केली. तिला हे सर्व सहनशक्तीबाहेरचं होतं. कुणालाच ते पाहवेना. सर्वांच्या डोळ्यात पाणी आले. तो प्रसंग आठवला की आतासुद्धा डोळ्यात पाणी येते व अंगावर काटा उभा राहतो. नाकात नळी घातल्यावर पोटातली घाण थोडी थोडी करून बाहेर काढण्यात आली. त्यामुळे उलट्या बंद झाल्या. हळूहळू तिला आराम वाटत गेला. चि. पिंकीने साईबाबा, साईबाबा म्हटलेले बाजूच्या रुग्णाच्या नातेवाईकांनी ऐकले होते. त्यांनी दुपारी शिर्डीचा प्रसाद आणून दिला. त्याच दिवशी शिर्डीहून तो कुणीतरी आणला होता. तसेच साईबाबांची अंगठी व फोटोही आणून दिला व तिला म्हटले, 'बाबांवर श्रद्धा ठेव, तू लवकर बरी होशील.' चि. पिंकी म्लान हसली व तिने ती अंगठी लगेच बोटात घातली. तिच्याच मापाची होती ती! बाबांनी तिची हाक ऐकली.

त्यानंतर घरी थोडे दिवस विश्रांती घेतल्यावर तिला शाळेत पाठवले. तिचा वर्ग (सर्व ३ रीचे वर्ग) तिसऱ्या मजल्यावर असल्यामुळे आम्हाला काळजी वाटत होती. पण शाळेत गेल्यावर समजले की तिचा 'अ' वर्ग फक्त दुसऱ्या बिल्डींगमध्ये पहिल्या मजल्यावर बदलण्यात आला आहे. ही त्या साईंचीच कृपा!



# बाबा, पुन्हा कधी हो येणार?

— **कु. तेजस्विनी दामोदर तारळेकर** एम.ए.
कृष्ण कुंज, घ.नं. १७०९,
'ई' वॉर्ड, राजारामपुरी,
७ वी गल्ली, कोल्हापूर.

साधारणपणे दीड-दोन वर्षांपूर्वीची ही घटना. आमच्या घरी-दारी श्रीसाईबाबा तरुण फकीराच्या रुपात येऊन गेले. ती घटना अशी —

दररोजची काही साधना म्हणा वा उपासना म्हणा बाबा मजकडून करवून घेत असतात. त्यात वाचन, जमल्यास श्रवण, जप, पूजा, स्तोत्रे इत्यादिंचा समावेश होतो. अशीच श्री. र. श्री. पुजारी लिखित श्रीसाईमहात्म्य मी रात्रीच्या निवांत वेळी एकटीच वाचत होते. त्यावेळी वाचन सुरू असतानाच बाबांचा स्पष्ट आवाज माझ्या कानी आला, "मी सोमवारी तुझ्या घरी येणार आहे." तो दिवस गुरुवार वा शुक्रवार असावा. मी अतिशय आनंदित झाले आणि सोमवारची वाट पाहू लागले.

घरातील सर्वांना मी बाबा येणार हा शुभसमाचार देवून ठेवला होता. सोमवार उजाडला. आम्ही सर्वजण बाबांच्या शुभागमनाची वाट पाहत होतो. दररोजचे सारे व्यवहार रोजच्यासारखे सुरू होते, पण लक्ष बाबांच्या आगमनाकडे होते. मी मनाने अत्यंत आनंदी होते, परंतु मला किंचित ताप आला होता. आंघोळ करावी की नाही याचा विचार करत करत शेवटी दुपारी मी आंघोळीस गेले आणि इकडे अगदी त्याच वेळी —

आमच्या गल्लीत बाबा तरुण फकीर रूपाने आले आणि भिक्षा मागू लागले. तो आवाज ऐकून माझी बहिण (सौ. शरयू भिमराव बेकनाळकर) त्यांना भिक्षा वाढण्यासाठी माडीवरून खाली गेली व रस्त्यावर जाऊन त्यांना भिक्षा वाढून आली. तिच्यापाठोपाठ ते फाटकातून आत आले आणि आमच्या दारापाशी उभे राहिले. जिन्यातून वर पाहत तिथेच उभ्या असलेल्या माझ्या बहिणीला त्यांनी विचारले, "और कौन है?"

हे सर्व घडत असताना बाबांच्या मायेचा पडदा माझ्या बहिणीच्या बुद्धीवर पडला असल्याने, 'समोर साक्षात् बाबा उभे राहून बोलत आहेत' ही जाणीव (ते येणार हे आधी माहित असताही) तिला झाली नाही. तिने सांगितले, "कोई नही!" त्या उत्तराबरोबर बाबा लगेच निघून गेले.

ही घटना घडण्यास ५/१० मिनिटे लागली असतील. तोवर मी बाथरूममध्येच होते. बाहेर आल्यावर बहिणीने सर्व सांगितले. सांगितल्याप्रमाणे बाबा दारी आले आणि माझी भेट झाली नाही. हे लक्षात आल्यावर मला खूप खूप वाईट वाटले. काहीच सुचेनासे झाले. माझी आई झोपली होती. तिही जागी झाली. थोड्या वेळाने लक्षात आले की, बाबांना शोधून तरी पाहू! आसपासच्या सर्व रस्त्यांवर हिंडून हिंडून मी शोध घेतला, पण कुठेही दर्शन घडले नाही.

घरी परतले. काहीतरी मोठा ठेवा हरवल्यासारखे अत्यंत वाईट वाटत होते. संपूर्ण

साईमहात्म्य एका बैठकीत वाचून काढायचे आधी मनात ठरवले होते. ते लगेच वाचायला बसले. मनच लागत नव्हते. आधी सांगितल्याप्रमाणे बाबा दारी येऊनही भेट झाली नाही ही चुटपुट वाटत होती. हृदय पिळवटून मला रडूच कोसळले. अक्षरशः रडतरडत मी पोथी वाचत होते. श्री. प. पू. डोंगरे महाराज सांगतात, "हँसना हो तो भगवान के लिए हँसो, और रोना हो तो भगवान के लिए रोओ!" तशी त्यादिवशी मी माझ्या भगवानासाठी - बाबांसाठी रडत होते.

नंतर पुढेपुढे विचार करीत असताना मला माझ्या चुका कळत गेल्या. त्यादिवशी सकाळपासून मी बाबांच्या भेटीसाठी इतर काहीही न करता बाबांचा जप, स्मरण, चिंतन, वाचन, श्रवण करत राहवयास हवे होते. पण मी मात्र ही मनाची तयारी न करता आंघोळ करून देहाच्या स्वच्छतेच्या कर्मकांडात अडकून पडले. असो.

त्यानंतर आजपर्यंत बाबांनी माझी भक्ति वाढविली आहे, दिवसेंदिवस वाढवत आहेत. इच्छा, स्मरण होईल तेव्हा छबीरूपाने घरी येणे, उदीप्रसाद येणे, वारंवार दर्शन, त्यांच्या अस्तित्वाची जाणीव, स्वप्नदर्शन, पुजेत, सेवेत अधिक आनंद येणे हे सर्व घडते आहे. तरीही मी बाबांच्या पुनरागमनाची वाट पाहते आहे. त्यांची भेट व्हावी यासाठी उत्सुक आहे. सांगा ना हो बाबा, पुन्हा कधी येणार?

# कल्पतरू

**— सौ. जयवंती महादेव कदम**
बी.ई.एस.टी., महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,
२९/२३९, गोरेगाव (प.), मुंबई.

अनंत कोटी ब्रम्हांड नायक राजाधिराज योगीराज सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय! ही वचने रोज आमच्या मुखी असतात, ह्या वचनांचे आम्ही मनापासून नित्य चिंतन करतो. त्यामुळेच आमचे जीवन सुरळीत चालले आहे. गेली बारा वर्षे मी साईबाबांची नित्यनेमाने पूजा करीत आहे. म्हणूनच मी माझ्या चार मुलांचे विवाह व्यवस्थित पार पाडू शकले.

माझी मुलगी मंदा हिला तिच्या विवाहा नंतर नोकरी मिळाली. परंतु नोकरीत कायम करण्याच्या वेळी अनंत अडचणी येऊ लागल्या. त्या सर्व अडचणींना तोंड देताना मी साईबाबांचे नाव घेत असे. बाबांच्या कृपेने चि. मंदाचे नोकरीमध्ये व्यवस्थित चालले आहे. तिला रहाण्यासाठी स्वतःचे घर नव्हते; तेही मिळाले.

माझी दुसरी मुलगी सुनंदा हिला बँकेचा कॉल आला. परंतु तिची परिक्षेची तारीख चुकल्याने ती ठरलेल्या वेळी परिक्षेला बसू शकली नाही. मी साईबाबांचा धावा केला आणि काय आश्चर्य! तिची परीक्षा घेण्यात आली व ती त्या परिक्षेत पासही झाली. आता तिचे लग्न झाले असून ती सुखात आहे. अशीच बाबांची कृपा सर्वांवर राहो हीच त्यांच्या चरणी प्रार्थना!

# श्रद्धा आणि सबूरी

**— श्री. रमेश कुलकर्णी**
परंडा रोड, पाण्याच्या टाकीजवळ,
बार्शी, जिल्हा-सोलापूर.

दि. ८ फेब्रुवारी १९८५ या दिवशी मी श्री साईबाबांचे नाव घेऊन बांधकाम सुरू केले. मी ज्या वेळेस बांधकाम सुरू केले त्या वेळेस बांधकाम पूर्ण होईल असे वाटले सुद्धा नव्हते. मजजवळ केवळ १० ते ११ हजार रु. इतकेच पैसे बँकेमध्ये खात्यावर जमा होते. परंतु जेव्हा मी घराचे बांधकाम सुरू केले तेव्हा मला कळले की, बांधकामामध्ये किती अडचणी येतात. जेव्हा स्लॅब टाकायचा होता तेव्हा पैशावाचून बांधकाम अडून राहिले होते. आता काय करावे असा विचार करीत असतानाच मला माझ्या साडूकडून ५०००/- रुपये मिळाले व स्लॅबचे काम पूर्ण झाले.

मी बांधकाम सुरू केले तेव्हा असे बोललो होतो की, माझे संपूर्ण बांधकाम जर साईकृपेने पूर्ण झाले तर माझ्या घराला मी "साईकृपा" हे नाव देईन. व शिर्डी येथे जाऊन साईबाबांचा मोठा फोटो आणून त्याची प्रतिष्ठापना करून मगच वास्तू शांती करीन. त्याप्रमाणे मी सर्व केले.

आणखी एक गोष्ट म्हणजे मी साईबाबांचा फोटो पूर्वी मनात योजल्याप्रमाणे पॅसेजमध्ये ठराविक ठिकाणी लाविन असे मनोमन योजले होते. परंतु घरच्यांनी तो फोटो मला मोठ्या हॉलमध्ये लावण्यास सांगितले. फोटो हॉलमध्ये लावताना मी फोटोसहीत शिडीवरून खाली पडलो व माझ्या खांद्याला मार लागला. मला वाटले की, निश्चित फ्रॅक्चर झाले. म्हणून मी डॉक्टरकडे गेलो व स्क्रिनिंग केले. परंतु त्यांनी हाड वगैरे काही मोडले नसून नुसता मुका मार लागलेला आहे असे सांगितले. तेव्हा कुठे मला बरे वाटले. विशेष म्हणजे मी एवढ्या उंचावरून खाली पडूनसुद्धा साईबाबांचा फोटो फुटला नाही किंवा काहीसुद्धा फोटोला झाले नाही. मी नंतर तो फोटो पूर्वी मनामध्ये योजल्याप्रमाणे पॅसेजमध्ये लावला.

त्याचप्रमाणे मला जर दुसरी मुलगी झाली तर मी तिचे नाव श्रद्धा ठेवीन असे बोललो होतो. त्याप्रमाणे मला मुलगी झाली व मी तिचे नाव श्रद्धा ठेवले.

**श्री साईलीला**

एप्रिलचा अंक हा ६६ व्या वर्षाचा प्रथमांक व रामनवमी विशेषांक म्हणून प्रकाशित होईल. मुखपृष्ठावर श्रींचे नयन मनोहर चित्र.

# मला टी.सी.च्या कचाट्यातून सोडविणारी व्यक्ती कोण होती?

— श्री. बी.व्ही. सावन्त
(बी.ए.एस्.एच्.एस्.एस्.)
साहित्य-विशारद, अनुवाद पंडित,
१८६/६८७२, कन्नमवार नगर नं. २,
विक्रोळी (पूर्व), मुंबई-४०० ०८३.

ही एक सत्य घटना गेल्या पावसाळ्यातील आहे. त्या दिवशी सकाळपासूनच जोरदार पाऊस कोसळत होता. त्यामुळे रोजच्यापेक्षा मध्य-रेल्वेच्या गाड्या जास्त उशीराने धावत होत्या. मला दादरहून विक्रोळीला जायचे होते. पण गाड्या उशिराने येत असल्यामुळे व दादर स्थानकावरील तुफान गर्दीमुळे मला गाडीत चढताच येत नव्हते. म्हणून ३-४ गाड्या सोडून दिल्या, पण प्रत्येक वेळी गर्दी वाढतच होती. अखेरीस वैतागून मी 'प्रथम श्रेणीच्या' डब्यात शिरलो. मी रेल्वेमध्येच नोकरीस असल्यामुळे, जर टी.सी. ने पकडले तर फार तर डबा बदलून उतरून जावयास सांगेल, अशी माझी अपेक्षा होती.

मी दादरहून 'धीम्या' गाडीने कुर्ल्यापर्यंत आलो. व कुर्ला स्थानकावर दोन टी.सी. आमच्या डब्यात शिरले. पहिल्या वर्गात सुद्धा फार गर्दी होती, त्यामुळे तिकिटे तपासता-तपासता, घाटकोपर स्थानक जवळ आले. मी मनातल्या मनात साईबाबांचा धावा करीत होतो की, जर घाटकोपर स्थानक येईपर्यंत टी.सी. ने मला विचारले नाही, तर मी घाटकोपरलाच उतरेन. पण दुर्दैवाने त्यांनी माझा रेल्वेपास पहावयास मागितला व द्वितीय श्रेणीचा पास म्हणून स्वतःजवळ ठेवला. त्या डब्यात माझ्यासारखे आणखी दोघेजण होते. आम्हा तिघांना घेऊन ते घाटकोपर नं. १ च्या स्टेशनमास्तरच्या केबिनमध्ये घेऊन गेले व तिघांचेही रेल्वे पास केबिनमधल्या रोजच्या टी.सी. जवळ दिले. त्यांना, आम्हा तिघांनाही प्रथम वर्गामधून प्रवास केल्याबद्दल प्रत्येकी २५/- रु. दंड घ्यावयास सांगितले. व ते दोघेही पुन्हा तिकिटे तपासणीसाठी निघून गेले.

आम्ही केबिनमधील दोन्ही टी.सी.ना पावसामुळे उशिराने येणाऱ्या गाड्या व तुफान गर्दी यामुळे नाईलाजाने प्रथम वर्गाच्या डब्यात चढावे लागले हे समजावून सांगत होतो. पण ज्यावेळी टी.सी. आम्हा तिघांना केबिनमध्ये आणीत होते त्यावेळी सफेद पायजमा व सदरा घातलेली एक व्यक्ती आमच्यामागून त्या केबिनमध्ये आली. केबिनमधील टी.सी. ना त्या व्यक्तिने आपले कार्ड दाखवून सांगितले की, हे दोघेही माझ्या ऑफिसात काम करतात व हे अत्यंत प्रामाणिक असल्यामुळे त्यांना दंड न घेता सोडून द्या. असे सांगून ती व्यक्ती आमच्याकडे न पहाता सरळ फलाटावर गेली. आम्हाला टी.सी. ने पुन्हा प्रथम वर्गात चढू नका असे सांगून आमचे रेल्वे पास आम्हाला परत दिले. आम्ही ताबडतोब त्या व्यक्तिचे आभार मानण्यासाठी एक व दोन नंबरच्या फलाटावर त्यांना शोधू लागलो; पण ती व्यक्ती कोठेच दिसेना. बरे, तेवढ्या वेळात एकही रेल्वे

गाडी एक किंवा दोन नंबरवरून गेलेली दिसली नाही. मी माझ्या बरोबरच्या माणसाला विचारले की, तू मघाच्या व्यक्तिला ओळखतोस का? पण त्याने सांगितले की, ती व्यक्ती तुमच्या परिचयाची असेल, असे मी समजत होतो. आम्ही दोघांनीही त्या व्यक्तीला रेल्वेच्या ऑफिसमध्ये कधीच पाहिले नव्हते. किंवा ओळखसुद्धा नव्हती

मग बराच वेळ विचार केल्यावर मला वाटले की, मनातल्या मनात गाडीमध्ये मी साईबाबांचा धावा केला. म्हणून तर मला सोडविण्यासाठी साईबाबा दुसरा वेष परिधान करून आले नसावेत ना! तसे नसते तर आम्हाला सोडविणारी ती व्यक्ती कोण होती? व क्षणात अदृश्य का झाली? भक्तासाठी इतके कष्ट साईबाबांखेरीज आणखी कोण घेऊ शकेल?

# संस्थानच्या 'अंधत्व निर्मूलन' कार्याची राज्यमंत्र्यांकडून प्रशंसा

शिरडी - 'श्री.साईबाबा संस्थानच्या पुढाकाराने गेल्या १० वर्षात सुमारे ३५०० रुग्णांना नेत्र दृष्टी देऊन अंधत्व निर्मूलन कामी जो सहभाग घेतला, तो प्रशंसनीय आहे. अंधत्व निर्मूलन कामी सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेतल्यास शासन त्यांना सहाय्य करील' असे आश्वासन पाटबंधारे राज्यमंत्री ना. अण्णासाहेब म्हस्के यांनी शिर्डी येथे दिले.

श्री.साईबाबा संस्थान,शिर्डी, नगर जिल्हा परिषद व मुंबई लायन्स क्लबच्या वतीने नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र शस्त्रक्रिया शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री. साईबाबा संस्थानचे विश्वस्त श्री. भिमाशंकर खांबेकर होते. या नेत्र शिबिरात ३५४ रुग्णांवर नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आली.

प्रारंभी श्री. साईबाबा संस्थानचे विश्वस्त श्री. भिमाशंकर खांबेकर यांनी स्वागत करून प्रास्ताविक भाषणात संस्थानच्या उपक्रमाची माहिती दिली.

ना. अण्णासाहेब म्हस्के पुढे म्हणाले की, शिर्डी या आंतरराष्ट्रीय किर्तीच्या देवस्थानाचे महत्त्व ध्यानात घेता शासन सुद्धा स्वच्छ शिर्डीसाठी प्रयत्न करील. त्यासाठी विश्वस्त मंडळाने सुसूत्र पद्धतीने योजना तयार केल्यास आम्ही त्यास मूर्त स्वरूप देण्याचा निश्चितपणे प्रयत्न करू.

यावेळी मुंबई लायन्स क्लबचे अध्यक्ष श्री. जे.बी. श्रॉफ यांनी ना. म्हस्के, विश्वस्त श्री. खांबेकर, डॉ. तेलंग, श्री. शिवलकर यांचा सत्कार केला.

याप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी श्री. बी.बी. मुंडे, आमदार दादा पा. रोहमारे, लायन्स क्लबचे अध्यक्ष श्री. श्रॉफ, डॉ. ए.व्ही. शिवलकर यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संयोजन श्री. साईनाथ हॉस्पिटलचे डॉ. पी.एस. देशपांडे यांनी केले.

# शिरडीवृत्त नोव्हेंबर १९८६

या महिन्यात श्री साईबाबांच्या दर्शनासाठी बाहेरगावची भक्तमंडळी बरीच आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली. ती खालीलप्रमाणे —

**किर्तन :** १) श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान गवई किर्तनकार, प्रवचनकार यांची किर्तने एकादशी व महत्वाच्या दिवशी झाली.

२) श्री. ह.भ.प. शिवनाथ महाराज, मु. लिहाया, अमरावती.

३) श्री. ह.भ.प. वसंतबुवा राधाकृष्ण शेंदर्णीकर, सांगली.

४) श्री. ह.भ.प. लक्ष्मणबुवा वाकचौरे, शिरडी.

**प्रवचन :** १) श्री. ह.भ.प. वसंत रा. पाबरे, ठाणे.

**भजन, गायन, वादन इ. :-** १) श्री. राजन पटेल, सायन २) श्री. मोहन विश्वनाथ यडोलकर, विक्रोळी ३) श्री. विश्वनाथ मो. शिदोडकर ४) श्री. अनुराग श्रीवास्तव, गोरेगाव ५) श्री. अशोक पांडे, कोपरगाव ६) श्री. दत्तात्रय तुकाराम दयाळ, सातारा ७) श्री. ठाकूर भुपालसिंह, जबलपूर ८) श्री. दुर्गेश व्यौहार, जबलपूर ९) श्री. जादुगार प्रिन्स धर्मेंद्र, सोलापूर १०) श्री. विजय शंकर शेटकर, भांडूप. ११) श्री. रतनलाल शर्मा, धंतोली नागपूर १२) श्री. दत्तात्रय लक्ष्मण साठले, मुंबई १३) श्री. लक्ष्मण रामचंद्र चव्हाण, गिरगाव १४) श्री. सुरेंद्र सक्सेना, नवी दिल्ली १५) श्री. फत्तेसिंग, नवी दिल्ली १६) श्री. अरुण ओंकारनाथ सोमाणी, संगमनेर १७) श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण काणकेकर, जोगेश्वरी १८) श्री. नारायण महाराज भजनी मंडळ, कुर्ला १९) सौ. शशीकला सदाशिव कुलकर्णी, डोंबिवली २०) श्री. गुरुदास नरहरी नाईक, चिंचवाडा २१) श्री. के.व्ही. रमण्णैय्या, खमण २२) श्री. पांडुरंग वामन भोसले, वडाळ २३) श्री. दत्तप्रासादिक भजनी मंडळ, प्रवरानगर २४) श्री. राजेंद्र थेटे २५) श्री. परशुराम थेटे २६) श्री. बाळासाहेब थेटे २७) श्री. विलास थेटे २८) श्री. भिमराज पवार २९) श्री. जगन्नाथ पवळ ३०) श्री. जगन्नाथ कुलथे ३१) श्री. दिलीप चक्रवर्ती, सांताक्रुज ३२) श्री. प्रभाकर लक्ष्मण जाधव, जामगांव ३३) सौ. रेखा नागेश प्रभू, प्रभादेवी ३४) सौ. सुनंदा दादासाहेब पाटील, कोल्हापूर ३५) श्री. श्यामचरण बाबा, नंदीयाल ३६) सौ. कुमुदिनी मुंडकर, पुणे.

**— लक्ष्मीपूजन कार्यक्रम —**

शनिवार दि. १.११.८६ रोजी सायंकाळी ५ ते ६ लक्ष्मीपूजन कार्यक्रम मा. कार्यकारी अधिकारी, श्री. रा.द. बन्नेसाहेब यांच्या हस्ते संपन्न झाला. धुंपारती झाल्यानंतर तिर्थप्रसाद वाटण्यात आला.

**कार्तिकी एकादशी :** सालाबादप्रमाणे कार्तिकी एकादशी निमित्त बुधवार, दि. १२.११.८६ रोजी रात्री ७ ते ९ किर्तन झाले. रात्री श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून मिरवून आल्यानंतर रात्री ११ वाजता शेजारती झाली.

**तुळशी विवाह :** गुरुवार दि. १३.११.८६ रोजी सालाबादप्रमाणे दारकामाईत तुळशी विवाह कार्यक्रम संपन्न झाला. साईभक्त व संस्थान कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुलांनी फटाके, भुईनळे वाजवून आनंद व्यक्त केला.

**हवापाणी :** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून, रोगराई काही नाही. थंडीचे प्रमाण वाढले आहे.

# डिसेंबर १९८६

या महिन्यात नाताळची सुट्टी असल्याने श्री साईबाबांच्या दर्शनासाठी भक्तांच्या गर्दीचे प्रमाण अधिक वाढले होते. शाळा, कॉलेजच्या बऱ्याचशा सहली आल्या होत्या.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे —

कीर्तन :- १] ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी (गवई) यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली. २] ह.भ.प. सहादू दिगंबर शिंदे, बार्शी, ३] ह.भ.प. केशव शिवाजी राणे, दादर.

प्रवचनः- ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी

भजन, गायन, वादनः- १] श्री. गणेश भजन मंडळ, नागपूर २] श्री. जयवंतराव कुलकर्णी, मुंबई ३] श्री. अरविंद म्हात्रे, मुंबई ४] श्री. धनराज पाटील, मुंबई ५] श्री. विजय व्यास, सुरत ६] श्री. बी. सत्यनारायण, सिकंदराबाद ७] श्री. एम. मुक्तेश्वर, सिकंदराबाद ८] श्रीमती जयवाणी, हैद्राबाद ९] श्री. आर. प्रतापराणा, तुमकोर १०] श्री. दत्तप्रसाद भजनी मंडळ, काटे पिंपळगांव ११] सौ. आसावरी वायकुळ, घाटकोपर, १२] श्री. के.डी. पवार, पंढरपूर १३] श्री. ए.एन. शिंदे १४] श्री. एस.आर. स्वामी १५] श्री. बी.डी. शेळके १६] श्री. ए.टी. फराटे १७] श्री. एच.के. मोरे, पंढरपूर १८] श्री. श्रीधर कीर, जादुगर, मुंबई १९] श्री. बाळकृष्ण कीर २०] सौ. शिल्पा कीर २१] सौ. सावित्रीबाई कीर २२] श्री. नरेश लक्ष्मण सोमण, नागपूर २३] श्री. गुरुकृपा भजनी मंडळ, अंधेरी २४] श्री संत मल्हारराव कोहाड, मुंबई २५] श्री. नरेंद्र एस. कोहाड २६] श्री. एस.एन. बोरगांवकर, लातूर २७] श्री. बाबू गोविंदराव बोरगांवकर २८] श्री. राम कमलाकर बोरगांवकर २९] सौ. सरोज बाबू बोरगांवकर ३०] श्री. अनिल बेरळेकर आणि पार्टी, कोल्हापूर ३१] सौ. मंगला बेरळेकर ३२] श्री. आबू वरमुदिकर २३] श्री. प्रमोद इनामदार २४] श्री. सुनील विचारे ३५] श्री. रमेश दहीगडे ३६] श्री. अरुण पोवार ३७] श्री. दिनेश पंडित ३८] कुमार राजू ३९] श्री. जे.के. ४०] कु. शुभांगी पेंडसे ४१] कु. शारदा ४२] कु. बेबी पिंकी ४३] श्री. अण्णा कदम व पुढील सतरा डेकोरेटर्स ४४] श्री. दत्ताराम कदम ४५] श्री. वसंत जोशी ४६] श्री. विलास पावसकर ४७] श्री. मुकुंद पाटील ४८] श्री. यशवंत नाईक ४९] श्री. शशांक तावडे ५०] श्री. रविश तावडे ५१] श्री. अनिल चव्हाण ५२] श्री. मणिंदरसिंग ओबेरॉय ५३] श्री. सुरेश हिर्लेकर ५४] श्री. सुरेश अंजर्लेकर ५५] श्री. शशी दळवी ५६] श्री. सतीश राव ५७] श्री. सुरेश पोयरेकर ५९] श्री. रवी चव्हाण ६०] श्री. बारकू शेठ

६१] श्री. गोपालनारी सत्संग मंडळ, खार ६२] श्री. किशोर रामचंद्र श्रोत्रीय, भोपाळ ६३] श्री. आर.प्रताप राजू ६४] श्री. अंबादास गोपाळे बेदरे, पाकाटा ६५] श्री. मयुरेश महिला भजनी मंडळ, घसवड ६६] एस. झाशी राणीबाई, मद्रास ६७] डॉ. श्रीनिवासन, मुंबई ६८] श्री. के.टी. टिकू, विलेपार्ले ६९] श्री. डॉ. मधुकर भगवान गावडे, बदलापूर ७०] श्री. अशोक भगवान गावडे ७१] श्री. किरणकुमार दुधाळकर, निर्माता, नाटक 'सबका मालिक एक' ७२] श्री. श्याम परळकर ७३] श्री. दिनानाथ लाड ७४] श्री. गंगाराम आंबेकर ७५] श्री. नारायण बारी ७६] श्री. शांताराम मोरे ७७] श्री. रविंद्र तांबे ७८] श्री. मधुसुदन ७९] श्री. राम कोतापकर ८०] श्री. श्रीपाद सावंत ८१] श्री. अरुण मोंडकर ८२] श्री. नंदू आचरेकर ८३] श्री. सतीश नारिंग्रेकर ८४] श्री. भाई शिंदे ८५] श्री. ज्ञानेश्वर आंगणे ८६] श्री. मधुसुदन आंगणे ८७] श्री. प्रमोद मयेकर ८८] श्री. अजीत दाभोळकर ८९] श्री. अमितकुमार ९०] श्री. प्रदीप कदम ९१] श्री. शाकीर ९२] श्री. आशाकिरण ,९३] श्री. अरुण निकम ९४] कु. सुमन शिरवळकर ९५] कु. स्मिता कोतापकर ९६] श्री. प्रदीप नवटे ९७] कु. तेजा किरण ९८] श्री. चंद्रशेखर कामेटकर ९९] श्री. बाबा आंबेरकर १००] श्री. समसू और साथी १०१] श्री. गंगाराम आंबेकर १०२] श्री. विलास वर्दम, मेकप सर्व्हिस १०३] श्री. नारायण चारी १०४] श्री. भाई शिंदे १०५] श्री. सुभाष कोरगांवकर १०६] कुमार कयोमस नेव्हल मास्टर १०७] श्रीमती होमाय नव्हील मास्टर १०८] श्री. नेव्हील रो मास्टर १०९] श्रीमती सुचित्रा आंबेरकर ११०] श्री. अरुण गोसावी १११] श्री. मनोज वर्दम ११२] श्री. चंद्रकांत शिंदे ११३] श्री. बरची अहमद ११४] श्री. दौलत शर्मा, मुंबई ११५] श्री. रमेश दुबे, इंदौर.

**दत्तजयंती कार्यक्रम :-** सालाबादप्रमाणे सोमवार दि. १५.१२.८६ रोजी दत्तजयंती साजरी करण्यात आली. दुपारी ४.३० ते ६.०० पर्यंत संस्थान पूजारी (गवई) श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी यांचे दत्तजन्म आख्यान कीर्तन झाले. ६.०० वा. दत्तजन्म कार्यक्रम झाला. त्यानंतर धुपारती झाली.

रात्रौ ९.१५ वा. 'श्रीं'च्या रथाची गावातून मिरवणूक निघाली. मिरवणूक परत आल्यानंतर ११.०० वाजता शेजारती झाली.

**हवापाणी:-** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवेत गारवा असतो.

# जानेवारी १९८७

या महिन्यात साईभक्तांची श्रींच्या दर्शनासाठी गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

कीर्तन:- (१) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी, कीर्तनकार, प्रवचनकार, गवई यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाच्या दिवशी झाली.

(२) ह.भ.प. विश्वनाथ महाराज, सहाणे, सुराळा

(३) ह.भ.प. सौ. ललीतप्रभा कुलकर्णी, गणेशपुरी.

प्रवचन :- ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

भजन, गायन, वादन इ.:- (१) श्री. रतनलाल शर्मा, धंतोली, नागपूर (२) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई (३) श्री. नंदकुमार सारंगधर, गिरगाव (४) श्री. बाळासाहेब कुलकर्णी, लक्ष्मीवाडी (५) कु. अंजली वासुदेव दिक्षित, पुणे (६) कु. अजय वासुदेव दिक्षित (७) वासुदेव दिक्षित (८) श्री. हरीमोहन दिक्षित (९) श्री. पांडुरंग विश्वनाथ बोरे, ढोरजा (१०) कुमार गणेश बाळासाहेब कुलकर्णी (११) श्री. शामलाल विश्वनाथ ठाकूर (१२) श्री. रामचंद्र भाऊ खलीम (१३) श्री. आचार्य भारद्वाज (१४) श्री. पी.बी. रामाराव (१५) श्री. बापू मनोहर जाधव, माढा (१६) कु. कुसुम नरुला, दिल्ली (१७) श्री. नरसेन कपूर (१८) श्रीमती वेदावती एम. गोपाल, हैदराबाद (१९) श्री. दत्तात्रय गजानन खडक बाण, बदलापूर (२०) श्री. अरुण ओंकारदास सोमाणी, संगमनेर (२१) श्री. रमेश गजानन पारकर, वडाळा (२२) श्री. सदानंद कुलकर्णी, गणेशपूरी (२३) श्री. मोहन मुकूंदा म्हात्रे, वसई (२४) ओम आदीनाथ भक्तीप्रासादिक भजन मंडळ, मुंबई (२५) श्री. दत्तगुरु प्रासादिक भजनी मंडळ, जोगेश्वरी (२६) श्री. राकेश मधुर, मेनपुरी (२७) श्री. एकनाथ मिराशी, मुंबई (२८) श्री साईनाथ भजनी मंडळ, अंधेरी (२९) श्री. आर. प्रताप राजू, पावगदा (३०) श्री. गणपत बाळाजी जाधव, शिरडी (३१) श्री. विठ्ठल तानाजी महाले, अंधेरी (३२) सौ. गीता जावडीकर, मालाड (३३) श्री. अरुण गुप्ते, वसई (३४) यंग बॉय स्पोर्ट क्लब, वडाळा (३५) श्री. साईधाम भजनी मंडळ, मुंबई (३६) नागेश्वर भजनी मंडळ, मोशी (३७) श्री. शंकरराव टीकाराम कोचूरे तमाशा मंडळ, धुळे (३८) श्री. राजकुमार बार्शीकर, पुणे (३९) श्री. गंगाधर धोंडीबा जाधव, पुणे (४०) श्री. सुधीर फडके [सतारवादक], पुणे (४१) श्री. धनंजय वसवे (४२) सौ. रेखा मडावी (४३) श्री. जयंत जगन्नाथ नगरकर, पुणे (४४) श्री. अशोक जगन्नाथ आढाव, पुणे (४५) श्री. नंदकुमार दत्तसेवक (४६) शैलाताई भागवत (४७) श्री. एम्. रामकृष्णन, हैदराबाद (४८) श्री. के.एस. सरमळकर, बोरीवली (४९) श्री. ए.बी. मिता, टोकियो, जपान.

हवापाणीः शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवेत गारवा असतो.

**प्रजासत्ताक दिन** :- दि. २६ जानेवारी १९८७ रोजी सकाळी ७-३० वाजता संस्थानमध्ये सरंजाम बागेत मा. कार्यकारी अधिकारी श्री. रा.द. बत्रेसाहेब यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. गावातील प्रतिष्ठित नागरिक, श्रींच्या दर्शनासाठी आलेले साईभक्त, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थीनी, संस्थान कर्मचारी, बॅण्डपथक, होमगार्डस् पोलीस उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. उपस्थितांना चहापान दिल्यानंतर कार्यक्रम समाप्त झाला.

बक्षीस समारंभ :- सन १९८६ सालाकरिता उत्कृष्ठ स्वच्छता कामगारासाठी ठेवलेले सौ. सुशीलाबाई शंकरराव गोडखिंडी पारितोषिक [चांदीचे पदक] श्री. हिरालाल मंगतू घारू, कायम स्वच्छता कामगार, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांना देण्यात आले.

तसेच सन १९८६ सालाकरिता साईनाथ रुग्णालयातील उत्कृष्ठ कामगारासाठी ठेवलेले श्री. अशोक शंकरराव गोडखिंडी पारितोषिक [चांदीचे पदक] सौ. मंगला बाबूराव मोरे, कायम परिचारिका, साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांना देण्यात आले.

# रेल्वे बुकिंग आऊट एजन्सी

श्रीक्षेत्र शिरडी येथे भारताच्या कानाकोपऱ्यातून श्री साईबाबांच्या दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने साईभक्त नियमितपणे येत असतात. साधारणपणे प्रवासासाठी सुलभ साधन रेल्वेशिवाय दुसरे नाही. 'शिरडी' हे रेल्वे स्थानकानजिक नसल्याने मनमाड अगर कोपरगांव यांसारख्या रेल्वे स्थानकांचा आधार घ्यावा लागतो. ऐनवेळी रेल्वे हुकणे अगर तिकीट न मिळणे यामुळे मुक्काम पडणे यांसारख्या गैरसोयींना तोंड द्यावे लागल्याने भक्तांच्या या अडचणींचा विचार करून श्री साईबाबा संस्थान, मध्य रेल्वे व दक्षिण-मध्य रेल्वेचे अधिकारी यांच्या संयुक्त प्रयत्नाने साईबाबा संस्थानच्या चौकशी व निवासस्थान कार्यालयात मध्य व दक्षिण मध्य रेल्वेचे बुकिंग काऊंटर दि. ६-९-८५ पासून सुरू करण्यात आलेले असून त्या ठिकाणी खालील गाड्यांकरिता आरक्षणाचीही सोय करण्यात आलेली आहे. तसेच भारताच्या सर्व प्रमुख शहरांची रेल्वेची तिकीटेही येथे उपलब्ध आहेत.

| गाडी नं. | गाडीचे नाव | कोठून | कोठे | आरक्षण कोटा |
|---|---|---|---|---|
| | | | | द्वितीय श्रेणी |
| २०२ अप | पंचवटी एक्सप्रेस | मनमाड | मुंबई | १० सीट |
| ३५२ अप | भुसावळ-बॉम्बे पॅसेंजर | मनमाड | मुंबई | ४ बर्थ |
| ५५२ अप | अजंठा एक्सप्रेस | मनमाड | सिकंदराबाद | १० बर्थ |
| ९६ अप | एलोरा एक्सप्रेस | मनमाड | निझामाबाद | १४ बर्थ |
| | एलोरा एक्सप्रेस | मनमाड | निझामाबाद | ४ सीट |
| ४ डाऊन | कलकत्ता मेल अलाहाबादमार्गे | मनमाड | कलकत्ता | २ बर्थ |
| २९ डाऊन | हावडा एक्सप्रेस नागपूर मार्गे | मनमाड | हावडा | २ बर्थ |
| ५७ डाऊन | अमृतसर एक्सप्रेस | मनमाड | अमृतसर दिल्ली | ४ बर्थ |

त्याचप्रमाणे इतर स्थानकांसाठी कोटा मिळविण्याकरिता संस्थान प्रयत्नशील आहे. उपरोक्त गाड्या मनमाड रेल्वेस्थानकावरून पकडण्यासाठी एस.टी. महामंडळाच्या नियमित बससेवाही शिरडी येथून उपलब्ध आहे.

# घोषणा

श्री साईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दरवर्षी फेब्रुवारीनंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | | |
|---|---|---|
| १ प्रकाशनाचे स्थळ | — | साई निकेतन,<br>८०४ बी,डॉ. आंबेडकर मार्ग,<br>दादर, मुंबई ४०० ०१४. |
| २ प्रकाशनाचा कालावधी | — | मासिक |
| ३ मुद्रकाचे नाव | — | श्री. एम. डी. राजन |
| राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| पत्ता | — | गीता ऑफसेट, बी - २३,<br>रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,<br>नायगाव, क्रॉस रोड, वडाळा,<br>मुंबई-४०० ०३१. |
| ४ प्रकाशकाचे नाव | — | श्री. रा. द. बन्ने |
| राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| पत्ता | — | साई निकेतन<br>८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग,<br>दादर, मुंबई-४०० ०१४. |
| ५ संपादकाचे नाव | — | श्री. रा. द. बन्ने |
| राष्ट्रीयत्व | — | भारतीय |
| ६ हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागदार यांची नावे व पत्ते | — | श्री साईबाबा संस्थान<br>शिरडी<br>(धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. रा. द. बन्ने यानुसार असे घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

श्री. रा. द. बन्ने
(प्रकाशकाची सही)
कार्यकारी अधिकारी

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ६-५० |
| २. | —"— | इंग्रजी | १४-५० | ५-२५ |
| ३. | —"— | हिंदी | ८-५० | ५-२५ |
| ४. | —"— | गुजराथी | १९-०० | ५-२५ |
| ५. | —"— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६. | —"— | तेलगु | — | — |
| ७. | —"— | तामीळ | — | — |
| ८. | —"— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —"— | हिंदी | १०-५० | ४-०० |
| १२. | —"— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६-०० | ४-०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —"— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —"— | गुजराथी | — | — |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —"— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —"— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —"— | तेलगु | — | — |
| २१. | —"— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | — | — |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-६५ | ३-५० |
| २५. | —"— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —"— | हिंदी | १-६५ | ३-५० |
| २७. | —"— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —"— | तेलगु | २-०० | ३-५० |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | १-५० | ३-५० |
| ३१. | —"— | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| ३२. | —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |

**Regd: No. MH/BYE/26**
**LICENCE No. 19**
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७″ × २२″ | ३-५० | ३-५० |
| २. | —″— | १४″ × २०″ | १-५० | ३-५० |
| ३. | —″— | ७″ × १०″ | ०-६० | ३-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४″ × २०″ | ०-८० | ३-५० |
| ५. | मूर्ती फोटो | १४″ × २०″ | १-५० | ३-५० |
| ६. | —″— | १०″ × १४″ | ०-९० | ३-५० |
| ७. | —″— | ७″ × १०″ | ०-६० | ३-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

मुद्रक : श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी - २३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक :** श्री. रा.द. बत्रे, साई निकेतन,
डॉ. आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी.,दादर, मुंबई - ४०० ०१४.